आधुनिक भारतातील राजकीय विचार प्रवाह

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २८२०



REFBK-0023000

प्रा. सुनील आडगांवकर

संदर्भ
निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

7 JUL 1981
13 DEC 1981
16 DEC 1984
8 NOV 1989

(क्र.मां.प.)
५०००-४-८०

निबंध
२८२०
संदर्भ शाखा
१३।११।८०
२३०००

आधुनिक भारतातील राजकीय विचार प्रवाह

REFBK-0023000

प्रा. सुनील आडगांवकर

शारदा प्रकाशन

नांदेड

© लेखक

प्रकाशक : सौ. नंदा. सु. मामीडवार
शारदा प्रकाशन,
वजिराबाद, नांदेड ४३१ ६०१

मुद्रक : श्री मधुकर सां. मामीडवार
सचिन प्रिंटर्स, चिखलवाडी कॉर्नर
नांदेड. ४३१ ६०१

मुखपृष्ठ : एस. टी. चौधरी

प्रथमावृत्ती : जून १९८०

किंमत : १६ रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
2426
दि. 2000
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

लेखकाचे निवेदन

भारतीय राजकारणातील विचार प्रवाहाचे मूळ स्वातंत्र्य आंदोलनात सापडते. या राष्ट्रीय आंदोलनात अनेक विचारप्रवाह उदयास आले व विकसित झाले. याच विचार प्रवाहाचे सातत्य स्वातंत्र्योत्तर काळात टिकविण्यात आले आहे. स्वातंत्र्य लढ्याच्या काळात सुधारक, विचारवंत व राजकीय नेते यांनी परिस्थिती सापेक्ष व कालानुरुप विविध प्रकारची तत्त्वप्रणाली मांडली व आपल्या कृतीच्या राजकीय कार्याची दिशा निश्चित केली. स्वप्नरंजनापेक्षा कृतीशीलता व सिद्धान्तापेक्षा प्रत्यक्ष व्यवहाराला प्राधान्य देणाऱ्या सुधारक विचारवंतांनी व तत्त्वज्ञ राजकर्त्यांनी समाजकारण व राजकारण तसेच राजकारण व राजकीय तत्त्वज्ञान यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न स्तुत्य प्रयत्न ठरावा यात संशय नाही.

भारतीय राजकीय तत्वप्रणालीचे एक वैशिष्ट्य व त्यातील अंगभूत दोष म्हणजे भारतीय विचारवंतांनी राजकारण व राजकीय तत्वज्ञान यात सांगड घालण्याचा प्रयत्न केला त्यामुळे राजकीय तत्वज्ञानाचे सैद्धान्तिक सामर्थ्य व तत्वज्ञानाच्या विकासाला एक प्रकारे अडथळा येऊ शकतो. राजकीय क्षेत्रातील व्यवहार्य तडजोड तत्वज्ञानाच्या क्षेत्रात योग्य ठरत नाही. तत्वप्रणालीत नेहमी व लहरीनुसार बदल घडवून आणले तर सैद्धान्तिकरणाची प्रक्रिया कुंठीत होते. सैद्धान्तिक चौकट मोडकळीस येण्याचा धोका निर्माण होतो. अर्थात सैद्धान्तिक विचार प्रणालीची गतिशीलता व लवचिकता यांना बाध न आणता राजकारणात तत्वप्रणालीशी जुळवून घेणे योग्य ठरते. भारतीय विचारवंतानी तत्वप्रणालीशी प्रतारणा न करता आपल्या कार्याची दिशा ठरविली. त्यामुळे कृतीप्रवण व व्यवहार्य विचारप्रवाह उदयास येऊ

शकले. भारतीय राजकारणातील दहशतवाद, क्रांन्तिवाद, मवाळ व जहाल विचारप्रवाह उदारमतवाद, धर्मसापेक्ष व धर्मनिरपेक्ष विचार प्रवाह राष्ट्रीय आंदोलनातील कार्यामागील वैचारिक प्रेरणा दर्शविणारे आहेत. तत्व व कृती यांची सांगड घालणारी भारतीय राजकीय विचार प्रणाली विविधतेने नटलेली असली तरी ही विचारप्रणाली विसंगतीच्या दोषापासून मुक्त नाही. परस्पर विरोधी विचारप्रवाह व राजकीय शक्ती यांचा मेळ घालताना, भारतीय तत्वज्ञराज्यकर्त्यांनी तत्व व कृती यांच्या संबंधित निष्ठा व दृष्टिकोन बदलेले आहेत व त्याचा परिणाम त्यांच्या विचार मंथनावर झालेला आहे असे असले तरी बहुसंख्य सुधारक विचारवंतांनी तत्वज्ञ राजनितीज्ञांनी विविध विचारप्रवाह आकारास आणले आहेत व त्यांचा प्रवाह विद्यमान राजकारणावरही पडलेला आहे हे मान्य करण्यास हरकत नसावी.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील क्रांतिकारी चळवळीला दहशतवाद म्हणणे कितपत संयुक्तिक ठरेल ; हा एक प्रश्न आहे. कारण स्वातंत्र्य आंदोलनातील क्रांतिकारी चळवळीत जरी गुप्त पद्धतीचा व शस्त्रसामर्थ्याचा वापर होत होता, तरी ही चळवळ राष्ट्रीय संघटनेद्वारे सुरू होती. क्रांतिकारकाच्या कार्यात सुसुत्रता व संघटितपणा आणण्यासाठी भूमिगत संघटनाचे जाळे पसरले होते. या चळवळीला जनतेचा नैतिक पाठिंबा होता. बहुसंख्य लोकांनी क्रांतिकारकांच्या कार्याला प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे साहाय्य केले होते. जन आंदोलनाचा एक भाग म्हणून क्रांतिकारक ब्रिटिश राजवटी विरूद्ध सामर्थ्याचा वापर करत होते. म्हणूनच ब्रिटिश राज्यकर्ते जरी क्रांतिकारकांच्या चळवळीला दहशतवादी चळवळ म्हणून असले तरी भारतीय लोकांच्या दृष्टीने ही चळवळ राष्ट्रीय प्रेरणेवर आधारलेली क्रांतिकारी चळवळ होती. अजूनही या चळवळीला क्रांतिकारी चळवळच म्हटले जाते. म्हटले पाहिजे.

भारतातील क्रांतिकारी चळवळीचे स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट करणे अवघड जाते. कारण क्रांतिकारी दहशतवादावर अधिकृत व सहजपणे उपलब्ध होणारी कागद पत्रे कमी प्रमाणात आहेत. ब्रिटिश राजवटीच्या काळातील गुप्तचर विभागाची सर्व माहिती प्रसिद्ध झालेली नाही. काही कागदपत्रे गोपनीय ठेवण्यात आली तर काही कागदपत्रे

नष्टही झाले असल्याची शक्यता आहे. ब्रिटिश शासनाविरूद्ध सामर्थ्याचा वापर करणारी दहशतवादी नेते आपली कार्ये गुप्तपणें करत होते. या संबंधीचा लेखी पुरावा शक्यतोवर ठेवायचा नाही ही त्यांची कार्यपद्धती होती. गुप्तता हेच त्यांच्या कार्याचे प्रमुख सुत्र होते. क्रांतिकारकांचा सिद्धान्तापेक्षा कृतीवर अधिक विश्वास होता. अर्थात गांधीवाद्याना व व्यक्तीशः पंडित नेहरूंना जरी दहशतवादी चळवळ निष्फळ व दिवाळखोरीची वाटत होती, तरी जनतेचा नैतिक पाठिंबा या चळवळीला होता. राजकीय क्षितीजावर महात्मा गांधीचा उदय झाल्यानंतर अहिंसक व शांततापूर्ण प्रतिकार चळवळ सर्वत्र प्रचलित झाली व परिणामतः भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील क्रांतिकारी दहशतवादी चळवळीचा जोम ओसरला. परंतु तिचे नैतिक बळ कमी झाले नाही. जनमानसातील क्रांतिकाराविषयीचे प्रेम कमी झाले नाही. आदर कमी झाला नाही उलट, क्रांतिकारकांचे 'हुतात्म' जनतेला प्रेरक व प्रेरणादायीच ठरले.

प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी शारदा प्रकाशन संस्थेने स्वीकारली त्याबद्दल लेखक प्रकाशकाचे आभार मानत आहे. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील विविध विचार प्रवाहाचे विश्लेषण करताना, सर्वश्री. डॉ. घारे डॉ. सुधाकर देशपांडे, डॉ. देव, उस्मानिया विद्यापीठातील प्रपाठक डॉ. राजूरकर यांच्याकडून लेखकाला उपयुक्त सूचना माहिती मिळाली त्याबद्दल लेखक त्यांचाही ऋणी आहे. श्री. कासराळीकर यांनी हस्तलिखीते तपासून दिली त्यांचाही ऋणनिर्देश येथे करीत आहे.

लेखक

दि. २१/६/१९८०

सुनील आडगांवकर

अनुक्रमणिका

१) दहशतवाद	१–२१
२) आंदोलनाचे राजकारण	२२–४४
३) धर्मसापेक्ष विचारप्रणाली	४५–५४
४) धर्मनिरपेक्ष विचारसरणी	५५–६२
५) पुनरुज्जीवनवाद व चळवळ सुधारणा	६३–७१
६) मुस्लीम संप्रदायवाद	७२–८९
७) हिन्दुवाद	९०–११२
८) समारोप	११३–१२७

१. दहशतवाद
TERRORISM

दहशतवादी विचारसरणी मानवी समाजाच्या इतिहासाइतकीच जुनी आहे. मानवी समाजाच्या सर्वक्षेत्रात दहशतवादाचा वापर झालेला आहे. राजकीय क्षेत्रातील दहशतवाद हा नवीन नाही. राजकीय सत्ता प्राप्त करण्यासाठी सशस्त्र क्रांती करणे, कट कारस्थाने करणे, बंडाळी घडवून आणणे, शारीरिक व मानसिक छळ करणे, दहशत बसविण्यासाठी धमक्या व लुटालूट करणे आदी तंत्राचा वापर सर्व देशाच्या राजकीय इतिहासात झालेला आढळून येतो. सत्ता संपादनाच्या राजकारणात दहशतवादाने कधी जहाल स्वरूप तर कधी मवाळ स्वरूप धारण केले आहे. विध्वंसक तंत्राला कधी वैधतेची बैठक लाभली आहे, तर कधी अवैधतेचा दोष लावला गेला आहे. राजकीय विध्वंस अथवा राजकीय विध्वंसक कार्याचे समर्थन, त्यामागील उदात्त प्रेरणा लक्षात घेऊन केले जाते. जूलमी राजाला फासावर लटकविणे अथवा जूलमी राजे घराण्यातील सदस्यांचा शिरच्छेद करणे अथवा त्यांना तुरूंगात डांबणे यासारखे प्रकार सर्वत्र घडल्याचे दिसते म्हणूनच दहशतवादात अपेक्षित व अनिवार्य असलेला विध्वंस व हिंसाचार एक कटू वास्तवता म्हणून ओळखली जाते. दहशतवादातील विध्वंसक व हिंसक कार्याना वैधता देणे कितपत योग्य ठरेल हा महत्वाचा प्रश्न आहे. राजकारणाच्या

क्षेत्रातील दहशतवादात राजकीय हिंसाचाराचा प्रश्न अतिशय जटील व गंभीर प्रश्न समजला जातो.

आधुनिक काळात विशेषत: अलिकडच्या काळात दहशतवाद्यांनी नवी तंत्रे शोधून काढली आहेत. सत्ताधारी राज्यकर्त्यांना पळवून नेणें, त्यांचे अपहरण करून, त्यांच्या खुनाच्या धमक्या देणे व राजकीय व अन्य प्रकारच्या मागण्या शासनाकडून मान्य करून घेणे शासनावर दबाव आणण्यासाठी दहशतीचा मार्ग अवलंबला जातो. विविध ठिकाणच्या देशातील राजदूतांच्यावर हल्ला चढविणे दुतावासात बॉम्ब टाकणे परकीय जेष्ठ नेत्याच्या भेटीच्या वेळी उपद्रव निर्माण करणे, विविध राजकीय कैद्याच्या मुक्ततेसाठी हिंसक दबाव शासनाधिकाऱ्यावर आणणे, दळणवळणाच्या मार्गाचा विध्वंस करणे आदी तंत्राचा वापर दहशतवाद्याकडून होतो.

विमानाचे अपहरण करणे व विमानाच्या प्रवाशाचे जीवित धोक्यात घालणे आदी प्रकार दहशतवाद्याच्या हातून नेहमी घडत असतात. राजकीय कैद्याची सोडवणूक करण्यासाठी दहशतवादी विमानाच्या अपहरणाचे घातक अस्त्र वापरतात. या तंत्राचा वापर आर्थिक राजकीय व अन्य हेतुसाठीही केला जातो.

दहशतवाद : एक विचार प्रवाह

भारतीय राजकीय विचार प्रणालीत दहशतवादाला (Terrorism) आगळे असे स्थान आहे. ' दहशतवाद ' हा एक वैशिष्टपूर्ण असा विचारप्रवाह आहे. भारतातील ' जहालवादा ' पेक्षा आपले भिन्नत्व स्पष्ट करणारी ती एक कार्यप्रवाही विचारधारा आहे. स्वातंत्र्य आंदोलनात एका दृष्टीकोनाचे प्रतिनिधित्व करणारी ही ' विचारधारा ' भारतीय विचार प्रवाहातील एक स्त्रोत समजला जातो. या विचार प्रवाहात सावरकर एक क्रांतीकारी प्रेरणेचे प्रतिनिधीत्व करतात. राष्ट्रवादाची, निस्वार्थ तत्वप्रणालीची प्रेरणा दहशतवादी क्रांतीकारकाजवळ होती म्हणूनच त्याच्या कृतीला जरी सर्व मान्यता मिळाली नाही तरी त्याच्या नि:स्वार्थ व राष्ट्रीय बाण्याबद्दल कोणीही शंका घेतली नाही. क्रांतीकारकाचा मार्ग व पद्धती इच्छित उद्दिष्टचे साध्य करील की नाही याबद्दल अनेकजन सांशक होतेच.

आधुनिक भारतीय विचार प्रणालीत 'दहशतवाद' हा एक विचारप्रवाह म्हणून ओळखला जात असला तरी या विचार प्रवाहातून पद्धतशीर राजकीय तत्वज्ञान आकारास येऊ शकले नाही. क्रांतीकारकांनी आपल्या कृतीचे तात्विक समर्थन करताना विविध विचार प्रणालीचे साहाय्य घेतले. गीतेसारख्या ग्रंथातून कर्मवादामागील उद्देश निष्ठा स्पष्ट केली. कृतीमागील सद् हेतुचे नैतिक तत्वज्ञान सांगितले. राष्ट्रवादी प्रेरणेचे अधिष्ठान स्पष्ट करून क्रांतीकारकांनी आपल्याजवळ कृतीचे तत्वज्ञान आहे असे भासविले. सारांश 'दहशतवादाला' खास तात्विक अधिष्ठान देण्यात स्वातंत्र्य आंदोलनातील क्रांतीवीर अपयशी ठरले. सैद्धांतिक वादापेक्षा कृतीच्या परिणामकारकतेवर त्यांचा भर अधिक होता. म्हणून साधन सूचितेच्या तात्विक चर्चेत क्रांतीकारकानी भाग घेतला नाही. परकीय राजवटीविरुद्ध केलेली कृती त्याच्या दृष्टीने सर्वथा समर्थनीय ठरत होती. परकीय राजवटीविरूद्ध संघर्ष देताना त्यांनी योजलेली पद्धती व अनुसरलेले मार्ग योग्य होते अशी स्वयंसिद्ध नैतिकतेची विचारसरणी ते मांडत असत. म्हणून 'दहशतवाद्यांनी' आपल्या कार्यामागील वैचारिक प्रेरणेचे ताठर व पोथीनिष्ठ तत्वज्ञान बनविण्याचा प्रयत्न केला नाही. कोणत्याही सैद्धांतिक चौकटीत त्यांनी आपली कार्यपद्धती बनविण्याचा प्रयत्न केला.

दहशतवादाचे नैतिक अधिष्ठान –

दहशतवाद्यांनी स्वतःचे असे आत्मनिष्ठ नीतिमत्तेचे तत्वज्ञान बनविले होते. दहशतवादी राष्ट्रीय बाण्याचे असल्यामुळे व स्वार्थ त्यागी वृत्तीने ते सर्व प्रकारच्या राजकीय कृती करीत असल्यामुळे त्या कृतीच्या परिणामापेक्षा कृतीच्या पाठीमागे असलेली स्वार्थ त्यागी वृत्ती महत्वाची मानली जावी असा त्याचा नैतिक युक्तिवाद होता. कोणत्याही फळाची अपेक्षा न करता केलेल्या कृतीचा प्रभाव कर्त्यावर पडत नाही कारण त्याने ती कृती निष्काम मनोवृत्तीने केलेली असते हे गीतेचे तत्त्वज्ञान दहशतवादाच्या परिणामाच्या समर्थनार्थ पुढे मांडले जाते. त्याच प्रमाणे कौस्तिकी उपनिषदात (Kausitki Upanisad) असे प्रतिपादन करण्यात आले आहे की मुक्त आत्मा हा कृतीच्या बऱ्यावाईट परिणामापासून अलिप्त राहतो. जो कोणी मला (परमेश्वराला)

जाणून घेतो. त्याच्या कोणत्याही कृतीमुळे त्याला इजा पोहचू शकत नाही. त्याने चोरी केली काय की गर्भ मारला काय, तसेच पितृहत्या केली काय किंवा मातृहत्या केली काय त्याने कोणतीही वाईट कृती केली तरी त्याचा चेहरा पापाने काळा पडणार नाही. या विचारसरणीचा गोषवारा असा की कर्त्यांच्या कृतीच्या मागे असलेली प्रवृतीच अशी असते की, त्याच्या सर्व कृती नीतिनिरपेक्ष बनतात. शिवाजीने केलेल्या अफझलखानच्या वधाचे समर्थन करतांना शिवाजीची कृती ही सामान्य नीतिमत्तेच्या चौकटीच्या बाहेर आहे. अफझलखानचा वध करण्यात शिवाजीने पाप केले होते का ? या प्रश्नाचे उत्तर 'महाभारतात' सापडेल. परमेश्वर स्वरूप कृष्णाने गीतेत सांगितले आहे की, जर आपल्या कृती स्वार्थ त्यागाने प्रेरित झालेल्या असतील तर आपल्यावर आपल्या रक्तसंबंधी व्यक्तीच्या व शिक्षकांच्या हत्येचा दोष लागत नाही आणि म्हणूनच त्यानी आपल्या राष्ट्रबांधवाना असे आवाहन केले की, त्यानी दडविधानाच्या चौकटीबाहेर जाऊन व भगवत्गीतेच्या पवित्र तत्वाच्या दृष्टिकोनातून श्रेष्ठ व्यक्तीच्या कृतीचा विचार करावा. लोकमान्य टिळकांनी गीतेतील नीतीनिकषाचे स्पष्टीकरण केलें आहें.

भारतातील जहालवादी ब्रिटिश अधिकाऱ्याच्या हत्येचे समर्थन याच दृष्टिकोणातून करीत. म्हणून आदर्श उद्दिष्ट साध्य करण्याच्या उत्साहात समाजाच्या कल्याणाच्या ध्येयाने प्रेरित होऊन ज्यावेळी व्यक्ती एखादी कृती करते त्यावेळी कोणते साधन व कोणता मार्ग अवलंबावा यासंबंधी फारसे लक्ष देता कामा नये, कारण उदात्त ध्येयाच्या सिद्धतेसाठी साधनाच्या स्वरूपाचे महत्व कमी आहे. कारण शेवटी उद्देशच साधनाच्या स्वरूपाचे समर्थन करतो अशा प्रकारे दहशतवाद्याची नैतिक कल्पना फक्त कृतीच्या मागील दहशतवाद्याच्या नैतिक संकल्पनेत प्रेरणाची दखल घेतली जाते. कृतीच्या परिणामाकडे पूर्णत: दूर्लक्ष केले जाते. त्यातून काही सामाजिक व राजकीय प्रश्न निर्माण झाले आहेत. केवळ परिवर्तन करण्याच्या उत्साहात आपण सर्व नैतिक तत्वे वाऱ्यावर सोडून देतो, त्यातूनच मानवी समाजात शतकानुशतके युद्ध, विध्वंस, कटकारस्थाने उद्भवतात व मानवाचे जीवन अधिक दु:खी बनते, हे खरे आहे

की भगवतगीता व तिचे आधुनिक पुरस्कर्ते अज्ञेयवादी दृष्टिकोन स्वीकारून तसेंच आत्मिक जाणीव ठेऊन प्रस्थापित नीतिमत्तेच्या चौकटीच्या बाहेर जाऊन विचार करण्यास सांगतात. अर्थात स्वार्थत्यागी वृत्तीतही कोठेतरी अजाणपूर्वक स्थायी प्रेरणा दडलेली असते. म्हणूनच असा ईशारा दिला जातो की, (Kansitalai Upanishad) मध्ये मांडलेले तत्वज्ञान गांभीर्याने सर्वत्र प्रसारित केले तर प्रस्थापित सामाजिक, नैतिक व धार्मिक संस्था लयास जातील.

दहशतवाद : कृतीचे तत्वज्ञान

दहशतवादी क्रांतिकारकांचा सिद्धातांपेक्षा कृतीवर अधिक विश्वास होता. म्हणूनच दहशतवाद्यांनी स्वतःची अशी सुस्पष्ट व सुबद्ध अशी तत्वप्रणाली निर्माण केली नाही. एखाद्या सिद्धान्त तत्वाचा आग्रह धरला नाही, तशी आपले भिन्नत्व व पृथकत्व स्पष्ट करणारी विचारसरणी मांडली नाही. अशा प्रकारच्या विचारसरणीचा प्रचार केला नाही. त्यानी विचारापेक्षा कृतीला प्राधान्य दिले व सिद्धान्तापेक्षा ध्येयाला सर्वस्व मानले. विविध मार्गानी व पद्धतीने क्रांतीकारक कार्ये करणाऱ्या दहशतवाद्यात कृतीची व हेतुची एकता होती. ही कृतीची व हेतुची एकता त्यांच्या दृष्टीने महत्वाची होती म्हणूनच त्यांच्यातील वैचारिक भूमिकेतील तफावत कार्य सिद्धीच्या आड येत नव्हती. क्रांतिकारक चळवळीत घोषणेपेक्षा उघड प्रचारापेक्षा गुप्तता पाळणे हे दहशतवाद्यांचे प्रमुख सुत्र होते. दहशतवाद्याच्या गुप्ततेच्या तंत्रामुळेच त्यांच्यातील वैचारिक संघर्ष सिद्धांत रुपाने आकारास येऊ शकला नाही. त्याच्या क्रांतीकारक योजनामागील वैचारिक भूमिका स्पष्ट करणारे कागद पत्रे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होऊ शकले नाही. दहशतवादावर जी काही कागदपत्रे उपलब्ध आहेत ती अगदी कमी प्रमाणात उपलब्ध झालेली आहेत. त्यावरुन दहशतवाद्याची तत्वप्रणालीसंबंधी निश्चित कल्पना येऊ शकत नाही.

दहशतवाद –

भारतातील दहशतवाद्यांनी आणि क्रांतीकारकांनी ब्रिटीशाच्या अत्याचाराला चोख उत्तर दिले. ब्रिटिश अधिकाऱ्याच्या जूलमी कृत्याचा बदला घेणे व प्रसंगी त्यांना धडा शिकविणे हा क्रांतीकारकाचा राजकीय

उद्देश होता. केवळ सूड भावना हीच प्रवृत्ती नव्हती. म्हणूनच क्रांतीकारकांनी सूडाचे तत्वज्ञान मांडलेले नाही. अत्याचाराला व दडपशाहीला चोख उत्तर देणाऱ्या क्रांतीकारकांनी शौर्य, राष्ट्रप्रेम आणि उदात्त त्याग यांचा आदर्श लोकांसमोर ठेवला – त्याचा प्रभाव जनमानसावर पडल्याशिवाय राहिला नाही.

लंडनमधील ओल्ड बॅलेच्या सुनावणीत मदनलाल धींग्रा ह्यांनी एक निवेदन देऊन आपल्या कृत्याचे समर्थन पुढीलप्रमाणे केले.

" Young patriots are being sent to life's imprisonment for doing only that for nation which English youth are being taught to do for England. My Countrymen are being oppressed simply because we are poor and weak. I have done this in revenge. My country's womenfolk are being molested. Lakhs of my countrymen are every year dying of starvation. In the last fifty years millions of rupees, immeasurable wealth, has been plandered away from my country. I see this always before my eyes. When I see the English people shedding crocodile tears for the miseries and plight of the Russians and the Congo people, I feel an unbearable hatred for their pretension – – – The English would have done the same thing had the German been in occupation of England - - - Because of that tyrannical rule imposed by England over India, I have done this retribution. "

परकीय साम्राज्यवादाला विध्वंसक प्रतिकार करण्याची आवश्यकता दहशतवाद्यांनी लक्षात घेतली होती. आपल्या विध्वंसक प्रतिकाराचे नैतिक समर्थन क्रांतीकारकांनी निरनिराळ्या प्रकारे केले आहे. क्रांतीवीर मदनलाल धींग्रा यांनी आपल्या कृतीचा राजकीय संदर्भ देऊन, त्या कृतीचे नैतिक समर्थन करण्याचा प्रयत्न केला. मदनलाल धींग्रा म्हणतात –

I admit that the other day I attempted to shed English blood intentionally and on purpose, as a humble protest against the inhuman transportation and hunging of Indian youths. In this attempt I consulted none but my own conscience – conspired with none but my owe duty. I believe that a nation, unwillingly held down by foreign bayonets, is in a perpetual state of war. Since open battle is rendered impossible, I attacked by surprise – – – I drew forth and fired a revolver. As a Hindu I feel that the slavery of my nation is an insult to my God. Her cause is the cause of Sri Ram. Her service is the service of Srikrishna. Neither rich nor able, a poor son like myself can offer nothing but his blood at the alter of mother's deliverance and so I rejoice at the prospect of my martyrdom. The only lession required in India is to learn how to die and the only way to teach it is by dying alone. This war will continue between India and England – as long as Hindu and English races last (If the present unnatural relation does not cease.) The soul is immortal and if everyone of my countrymen takes at least two lives of Englishmen before his body falls, the mother's salvation is a day's work. Until our country is free Sri Krishna stands exhorting: if killed you attain the heaven, if successful you win the earth. It is my fervent prayer – " May I be reborn of the same mother and may I re–die in the same sacred cause till my mission is done and she stands free for the good of humanity and to the glory of God.

सशस्त्र संघर्ष –

साम्राज्यवादी शक्तीविरुद्ध संघर्ष देण्यासाठी, विशेषतः ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढा देण्यासाठी विध्वसंक डावपेचांचा आश्रय घेण्यास हरकत नसावी. राष्ट्राच्या स्वातंत्र्य लढ्यात विध्वसंक संघर्षाला स्थान असणे हे सुभाषचंद्र बोस यांनी विविध राष्ट्राच्या स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासाचे दाखले देऊन स्पष्ट केले. देशामध्ये जेव्हा परकीय सत्ता असते तेव्हा तिच्या विरुद्ध लढण्यासाठी तिच्या शत्रुराष्ट्राचे सहाय्य घेणे ही राजकीय नितीमत्तेच्या चौकटीत बसणारी गोष्ट आहे असे परंपरागत राजनीतीचा इतिहास सांगतो, म्हणून ब्रिटिश विरोधी फॅसिस्ट शकती, जर्मनी, इटली व जपान या राष्ट्राची मदत घेऊन ब्रिटिश राजवटीशी संघर्ष देण्याचा राजकीय डाव सुभाषचंद्र बोस यांनी आखला. त्यासाठी त्यानी इंडियन नॅशनल आर्मीची संघटना बांधली व साम्राज्यवाढी शक्तीशी राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळेपर्यंत संघर्ष देण्याचा उद्देश समोर ठेवला. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी दिलेला सशस्त्र लढा हे राष्ट्रीय आंदोलनाचे एक तंत्र आहे. त्याला उठाव, अथवा दंड म्हणता येणार नाही कारण जगातील अनेक देशात स्वातंत्र्यासाठी विध्वंसक लढा व सशस्त्र क्रांती झालेली आहे व त्यातून राष्ट्र स्वतंत्र्य बनले आहे. या संबंधी परकीय राजवटी विरुद्ध परकीयांचे सहाय्य घेणे राजकीय दृष्टचा अनैतिक अथवा नीतिबाह्य ठरत नाही.

ब्रिटिश राजवटीतील धूर्त आणि कावेबाज राजकर्त्याशी संघर्ष देतांना नैतिक दृष्टिकोनाचे अवडंबर माजविता कामा नये ही भूमिका सुभाषचंद्रानी घेतली म्हणून त्यांनी विध्वंसक डावपेचाचा वापर करण्याचे ठरविले. त्याच बरोबर फॅसिस्ट राष्ट्राचे साहाय्य मिळविण्यासाठी प्रयत्न केले. सुभाषचंद्र बोस ह्यानी विध्वंसक डावपेच वापरले व फॅसिस्ट शक्तीचे सहाय्य घेतले म्हणून त्यांना फॅसिस्ट म्हणता येणार नाही. त्यांनी फॅसिझमच्या सर्व विचार प्रवाहाना मान्यता दिली नव्हती. फॅसिस्ट विचारप्रणालीतील वंशवाद, लोकशाही विरुद्ध आणि प्रतिगामी शक्तीचे पुनरूज्जीवन सुभाषचंद्र बोस यांना मान्य नव्हते. सुभाषचंद्र बोस यांच्या राजकीय विचारसरणीत प्रखर राष्ट्रवाद, राष्ट्रीय समाजवाद व लोकशाही तत्वप्रणालीचा समन्वय झालेला आढळतो. इंडियन पॉलिटिकल

कॉन्फरन्स लंडन येथे भरली होती. त्यावेळी १० जून १९३३ रोजी सुभाषचंद्र बोस यानी तेथील भाषणात सांगितलें की, स्वतंत्र भारतात भांडवलशाही, जमीनदारी व जातीयवाद यांना स्थान असणार नाही. स्वतंत्र भारतात सामाजिक व राजकीय लोकशाही प्रस्थापित केली जाईल " १ जानेवारी १९४१ रोजी फॉरवर्ड ब्लॉकची मार्गदर्शक तत्वे स्पष्ट करताना सुभाषचंद्र बोस यांनी आपली समाजवादी, लोकशाही-निष्ठ व साम्राज्यविरोधी विचारसरणीची दिशा स्पष्ट केली आहे.

दहशतवादी चळवळ –

भारतातील दहशतवादी चळवळीचा आरंभ एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात झाला. पण त्यापूर्वीही ब्रिटिश राजवटी विरुद्ध लष्करी बंडाचे तुरळक प्रयत्न झाले. १८९४ साली दामोदर चाफेकर आणि त्यांचे वडील बाळकृष्ण चाफेकर यांनी ' हिन्दु धर्माचें संरक्षण ' नावाचा समाज स्थापन केला त्यानी पूना प्लेग कमिशनर रॅन्ड, या अत्याचारी ब्रिटिश अधिकाऱ्याचा खुन केला व तेव्हापासून दहशतवादी चळवळीला गती मिळाली.

१९०६ नंतर दहशतवादी चळवळीने ठिकठिकाणी जोम धरला दहशतवाद्यानी संघटना बांधण्यास सुरवात केली व त्याना राष्ट्रवादी नेत्याकडून प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रेरणा मिळत गेली. १९०७ मध्ये लाला लजपत राय आणि अजितसिंग (भगतसिंगचे काका) याना काळ्या पाण्याची शिक्षा झाली व त्यातून जनक्षोभ निर्माण झाली व दहशतवादी चळवळीने निराळे वळण घेतले. लाला हरदयालसिंग यानी क्रांतिकारकांना प्रोत्साहन दिले. दिनानाथ जे. एन. चतर्जी, अमिरचंद हे त्याचें शिष्य होते.

१९०७ साली क्रांतिकारकांनी देशाबाहेर इंटरनॅशनल सोशालिस्ट कॉन्फरन्स समोर मॅडम कामा यानी भाषण दिले व तिने १८ ऑगस्टला भारतीय स्वातंत्र्याचे चिन्ह म्हणून तिरंगी झेंडा फडकवला.

बंगालमध्ये क्रांतिकारक चळवळ अधिक लोकप्रिय बनली. अलिपूर कटाच्या प्रकरणी श्री अरविंद घोष याना गोवण्यात आले तसेच २४ तरुण क्रांतीकारकावर आरोप ठेवण्यात आले. अर्थात अरविंदाचे भाऊ बिरेन्द्र कुमार घोष क्रांतीकारी होते, श्री अरविंद यांची

क्रांतीकारांना सहानुभूती लाभली होती. स्वामी विवेकानंदाचे भाऊ भूपेन्द्रनाथ दत्त हे युगांतर मधून क्रांतीकारी चळवळीचा प्रचार करीत होते. बंगालमध्ये ' अनुशिलन समिती ' क्रांतीकारकांचे केन्द्र समजले जात होती. बंगालमध्ये कन्हयालाल दत्त आणि खुरीराम बोस यांना आर्थिक लोकप्रियता लाभली होती.

१ जुलै १९०९ रोजी मदनलाल धिंग्रा यांनी सर कर्झन विली याचा खून केला. मदनलाल धिंग्रा यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. त्याचे कृत्य देश सेवेच्या प्रेरणेने प्रभावित झाले होते. फासावर चढण्या-पूर्वी त्यांनी केलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले होते की मातृभूमीची सेवा ही ईश्वर सेवा होय. "

क्रांतीवादी दहशतवादाच्या संघटना –

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात संविधानिक आंदोलनाच्या पद्धतीचा वापर केला जात असतानाच काही राष्ट्रप्रेमी व्यक्तीनी ब्रिटीश राजवटीविरूद्ध सशस्त्र प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला होता. विशेषतः पहिल्या महायुद्धाच्या काळात व त्यानंतर ब्रिटिश राजवटीविरूद्ध निर्माण झालेल्या असंतोषाच्या वातावरणात दहशतवादी चळवळीने पंजाब, बंगाल व उत्तर प्रदेश याठिकाणी मूळ धरले. या चळवळीला तेथील जनतेचा मूक पाठिंबा मिळाला या चळवळीचे सर्व कामे भूमिगत असल्यामुळे दहशतवादी चळवळ ही भूमिगत संघटनेचे रुप सहज धारण करु शकली. हया संघटनेचे राष्ट्रव्यापी जाळे बनू शकेल इतकी संघटित होऊ लागली होती. उत्तर प्रदेश आणि पंजाबमध्ये " हिंदुस्थान रिपब्लिकन असोशिएशन " ची स्थापना करण्यात आली. त्याचप्रमाणे पूर्वकडील भारतात ' न्यू व्हायलन्स पार्टी ' नावाचा पक्ष स्थापन करण्यात आला. या दोन्ही संघटना सशस्त्र क्रांतीद्वारे स्वातंत्र्य प्राप्तीची आकांक्षा उराशी बाळगून होत्या. परकीय ब्रिटीश राजवटीविरुद्ध विध्वंसक हालचाली या संघटनेमार्फत करण्यात आल्या साम्यवादाच्या क्रांतीच्या संकल्पनेने आकर्षित झालेल्या काही व्यक्ती सशस्त्र राष्ट्रीय संघर्षाकडे वळल्या त्यांनी कलकत्त्यामध्ये " यंग कॉम्रेड – लीग " स्थापन केली. या संघटनेचे नेते निरंजनदास सेनगुप्ता हे होते. अशा प्रकारे स्वातंत्र्य पूर्व काळात क्रांतीकारकांच्या संघटना ठिकठिकाणी अस्तित्वात आल्या.

क्रांतीकारक दहशतवादाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे परकीय राजवटीला प्रत्यक्ष विरोध करणे होय. हा विरोध सकृद्दर्शनी विधायक आणि विध्वंसक आहे याचा विचार क्रांतीकारक दहशतवादी करीत नसत. कारण परकीय राजवट ही अनिष्ट व दुष्ट असल्यामुळे ती उलथून पाडणे हेच राष्ट्रीय कर्तव्य असल्यामुळे दहशतवादी आपल्या कृत्यांच्या तात्कालिक परिणामाची नैतिक बाजू विचारात घेत नव्हते. साधन सुचितेचे अवडंबर क्रांतीकारानी कधीच माजविले नाही. परकीय राजवटीविरुद्ध 'जशास तसे', 'टोल्याला प्रतिटोला' हा त्याच्या कार्याचा मार्ग होता. हीच त्यांची कार्यपद्धती होती. जहालवाद्याप्रमाणे शासनाला कोंडीत पकडून शासनावर दडपण आणण्याचे डावपेच दहशतवाद्यांनी अवलंबले नाही. टप्याटप्याने वा आस्तेकदम विरोधाचे तंत्र अथवा पद्धत काटेकोरपणाने क्रांतीकारकानी अवलंबली नाही. क्रांतीकारक दहशतवाद्यांची सर्व कृत्ये परकीय राजवटीच्या अन्यायाविरूद्धचे उत्स्फूर्त उद्रेक ठरले. असे असूनही क्रांतीकाराच्या चळवळीत संघटन, नियोजन व धोरण यांना स्थान होते. क्रांतीकारकाची कार्य करण्याची पद्धती, कार्यामागील राष्ट्रीय प्ररणा आणि डावपेचातीय नियोजन यात सुसंगती दिसून येत होती.

नक्षलवादी चळवळीचा उद्रेक भारतातील अशा भागातच झाला. ज्याठिकाणी गरीब शेतकरी कामगाराचे शोषण करणारी जमिनदारी पद्धती अस्तित्वात होती. या नक्षलवादी चळवळीला परकीय साम्यवादी शक्तीची फूस व साहाय्य लाभत असले तरी ती प्रस्थापित शोषण पद्धतीविरूद्धची विध्वंसक प्रतिक्रीया होती हे सत्य नाकारता येत नाही. या दहशतवादी चळवळींने पश्चिम बंगाल, बिहार व तेलंगण भागात नवी राजकीय आव्हाने निर्माण केली. कायद्याच्या लगामाने या चळवळीवर अंकुश ठेवण्यापेक्षा या चळवळीने उभे केलेल्या राजकीय आव्हानाला कसे तोड देता येईल हा प्रश्न निर्माण झाला. या चळवळीचे विध्वंसक स्वरूप जरी गंभीर भासत असले तरी या चळवळीची व्याप्ती काही प्रदेशा पुरतीच मर्यादित राहिली. विध्वंसक चळवळीची व्याप्ती मर्यादित असली तरी या चळवळीत दडलेल्या संभाव्य धोक्याकडे दुर्लक्ष करता येत नाही स्वकीय राजवटी विरूद्धची ही दहशतवादी चळवळ

स्वातंत्र्यपूर्व काळातील परकीय राजवटीविरुद्धच्या स्वकीयाच्या दहशतवादी चळवळीइतके नैतिक सामर्थ्य व नैतिक समर्थन लाभणे शक्य नाही. स्वांतंत्र्यपूर्व काळातील हुतात्म्याच्या नेतृत्वाखालील चाललेली क्रांतीकारक – दहशतवादी चळवळ परकीय राजवटीविरूद्ध देशभक्ताची चळवळ ठरली. तर परकीयाच्या चिथावणीद्वारे व सहकार्याने चाललेली नक्षलवादी चळवळ स्वकीयाच्या शासनाविरुद्धचा विध्वंसक उद्रेक ठरला.

नक्षलवाद्याचा – " दहशतवाद " –

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात पश्चिम बंगाल, बिहार व तेलंगण येथे उदयास आलेली नक्षलवादी चळवळीचा उल्लेख एक दहशतवादी चळवळ म्हणून करता येईल. कारण या चळवळीतील नेत्यांनी दहशतवादी तंत्राचा अवलंब केला आहे. नक्षलवादी चळवळीचा प्रभाव अलिकडच्या दशकात दिसून येत असली तरी तिची पाळेमुळें स्वातंत्र्यानंतर सक्रीय बनलेल्या साम्यवादी षड्यंत्रात रूजलेली असल्याचे दिसून येते. ही नक्षलवादी चळवळ डाव्या साम्यवादी पक्षाशी क्रांतीकारक विचारसरणीने आपले नाते प्रस्थापित करते. सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करणारी नक्षलवादी चळवळ साम्यवादातील क्रांतीकारक विचार प्रवाहाने प्रभावित झालेली असून तिच्यावर माओच्या विचाराची छाप पडली आहे. साम्यवादाची क्रांतीची संकल्पना माओच्या कृतीशील संघर्षाची विचारसरणी व गुरीला युद्धतंत्राच्या मिलाफाने नक्षलवादी चळवळीच्या विचारसरणीचे व तंत्राचे स्वरूप निश्चित झाले आहे. साम्यवादी चळवळीचा दहशतवादी अवतार म्हणून या चळवळीकडे पाहिले जाते.

दहशतवाद : निष्फळ व दिवाळखोर –

दहशतवादी क्रांतीकारकाच्या कार्यामागील राष्ट्रनिष्ठा व स्वार्थत्यागी वृत्ती याबद्दल तरी भारतातील नेमस्त वृत्तीने नेते शंका व्यक्त करत नसत तरी देखील त्यांना दहशतवाद्याची कार्यपद्धती व हिंसक मार्ग मान्य नव्हते. लोकमान्य टिळकांनी जहालवादी राजकारण केले, त्याना देखील दहशतवाद्यांची कृत्ये काही प्रसंगी व काही संदर्भात आततायी स्वरूपाची भासत होती म्हणून तरूण क्रांतीकारकाच्या विध्वं-

सक राजकीय कार्यांसंबंधी ते वेळोवेळी दक्षतेचा इशारा देत असत कारण दहशतवादी चळवळीच्या अपेक्षित परिणामाबद्दल खात्री देण्यासारखी त्या वेळची परिस्थिती नव्हती उलट दहशतवादी क्रांतीकारकाच्या चळवळीमुळे प्रतिक्रियात्मक ब्रिटिश शासनाची कृती सुसंघटित राजकीय प्रयत्नच विफल करेल अशी त्यांना भीती वाटत होती जहालवादी राजकारणात सर्व प्रकारची 'जोखीम' पत्करण्यास तयार होत परंतु त्याना 'राजकीय दिवाळखोरी' मानवणारी नव्हती संविधानिक आंदोलनाचे पुरस्कर्ते तर दहशतवादाचा धिक्कार व सार्वजनिक निषेध करीत असत. पंडित जवाहरलाल नेहरुंना दहशतवाद ही निष्फळ व दिवाळखोर राजकीय पद्धत वाटत होती. महात्मागांधीनी अनुसरलेली अहिंसक राष्ट्रिय चळवळ हीच नेहरुंना राष्ट्रीय आंदोलनातील योग्य राजकीय पद्धत भासत होती. सरते शेवटी गांधीप्रणीत अहिंसक चळवळ सर्व मान्य ठरली.

जहालवाद्याचे दहशतवाद्याबरोबर संबंध –

ब्रिटिश शासनाविरुद्ध उफाळून वर आलेल्या आंदोलनात जहालवादी पंथ व दहशतवादी पंथ संघर्ष देत होते. परकीय राजवटीला विरोध करण्याचे त्याचे मार्ग भिन्न असले तरी उद्दिष्ट समान होते परकीय राजवटीतील अत्याचारी कृत्यांना विरोध करणे व परकीय राजवटी विरुद्ध जनमत तयार करणे ही दोन्ही कार्ये जहालवादी व दहशतवादी पंथातील नेते व कार्यकर्ते करीत होते. त्यांचा स्वार्थ त्याग, देशभक्ती व सद्हेतू या बद्दल शंका घ्यावयाचे कारण नव्हते, म्हणूनच लोकमान्य टिळकांनी सशस्त्र क्रांतीकारकांशी गुप्तपणे प्रेमाचे संबंध ठेवले होते ते त्यांना वेळोवेळी सहानुभूती आणि सहाय्य करीत ही गोष्ट स्पष्ट होती

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील दहशतवादी चळवळीला नैतिक अधिष्ठान प्राप्त झाले होते. ही दहशतवादी चळवळ राजकीय चळवळीचे एक उग्ररुप होते. या दहशतवादी पंथातील नेते ब्रिटिश राजवटीतील अत्याचाराला सामर्थ्याने उत्तर देऊ इच्छित होते. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी संघर्ष देण्याची तयारी त्यांची होती. व्यक्तिगत स्वार्थापेक्षा सर्वस्वाचा त्याग करण्याची वृत्ती क्रांतीकारकात होती म्हणूनच जहाल पंथातील नेत्यांना दहशतवादी क्रांतीकारक जवळचे वाटत, त्यांच्याबद्दल

त्यांना अपार सहानुभूति वाटत असे.

जहालवाद्यांनी व दहशतवादी क्रांतीकारकांनी ब्रिटिश राजवटीचा निषेध केला. त्यांचे तत्वज्ञानच मुळी निषेधाचे तत्वज्ञान होते. परकीय शासनाविरुद्ध निषेध नोंदविताना त्यांनी असहकार चळवळीला पाठिंबा दिला, असहकार चळवळीचा पुरस्कार केला. परकीय राजवटी विरुद्ध प्रतिकात्मक निषेध नोंदविण्यासाठी व्यक्तीनी आपल्या पदव्या व मानाची स्थाने सोडावी असा त्यांनी अग्रह धरला, शासकीय कार्याला व शासनाच्या मदतीने झालेल्या कार्याला ऐच्छिक आर्थिक सहाय्य देऊ नका असे आवाहन त्यानी केले त्याच प्रमाणे स्वातंत्र्य प्रेमी लोकांनी शासकीय नोकऱ्यांचा त्याग करावा अशी सूचना त्यांनी केली. सारांश, ब्रिटिश राजवटीशी दहशतवादी व जहालवादी संप्रदायाचे संबंध विरोधकाचे होते. हे संबंध दुरावत जाऊन शत्रुत्वाचे बनले होते तरी ब्रिटिश शासनाविषयी या दोन्ही पथातील भूमिका भिन्न भिन्न स्वरूपाची होती क्रांतीकाराचे रक्तरंजित राजकारण व जहालवाद्याचे उग्र राजकारण, दहशतवाद्याचा सशस्त्र प्रतिकार व जहालवाद्याचा संघटित विरोध दोन्ही पंथातील कार्यपद्धतीचे व दृष्टिकोनाचे भिन्नत्व स्पष्ट करतात

क्रांतीकारक ' उग्रवाद ' –

आर्य समाजाने स्वातंत्र्य चळवळीत दिलेलें योगदान ऐतिहासिक दृष्टचा महत्वाचे ठरले. आर्यसमाजातील स्वातंत्र्य सैनिक व हुतात्मे उग्रराष्ट्रवादाच्या परंपरेतील होते. ब्रिटिशांना विरोध करून स्वातंत्र्य संपादन करणे व राष्ट्रीय स्वातंत्र्याची प्रेरणा सतत जागृत ठेवणे. या ध्येयासाठी आर्यसमाजातील काही व्यक्तीनी स्वातंत्र्य लढ्यात बलिदान केले. त्यावेळच्या आर्यसमाजातील नेत्यानी क्रांतीकारकाकडून स्फूर्ति घेतली. लाला लजपत रॉय, अरविंद घोष, सावरकर, सुभाषचंद्र बोस खऱ्या अर्थाने क्रांतीकारक होते त्यांनी स्वीकारलेल्या उग्रवादाला ' दहशतवाद ' म्हणून ब्रिटिशानी संबोधिले वस्तुत: हा ' दहशतवाद ' ब्रिटिशाच्या धोरणाविरुद्धची स्वाभाविक प्रतिक्रिया म्हणून अस्तित्वात आला. कारण ब्रिटिशानी भाषण स्वातंत्र्य व मुद्रण स्वातंत्र्यावर बंधने टाकली, राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी व्यासपीठ वापरण्यास प्रतिबंध केला.

निःशस्त्र लोकावर शस्त्राच्या बळावर अन्याय केला त्यावेळी ब्रिटिश राज्यकर्त्याविरुद्ध विध्वंसक मार्गाचा अवलंब करणे भाग पडले. या आंदोलनाला विध्वंसक स्वरुप केवळ प्रतिकात्मक व प्रतिक्रियात्मक होते दोनचार ब्रिटिश राज्यकर्त्यांचे खून पाडून स्वातंत्र्याचे स्वप्न साकार होणार नव्हते. परंतु त्यासाठी बळी जाणाऱ्या हुतात्माकडून स्वातंत्र्याची प्रेरणा प्रभावी बनणार होती या हुतात्माच्या मालिकेतून राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची प्रवृत्ती बळावली गेली व स्वातंत्र्य लढ्याला नवा जोम आला. एका बाजूने जालीयनवाला बाग सारखे हत्याकांड करून ब्रिटिश राज्यकर्त्यानी अत्याचाराची कमाल मर्यादा गाठली तर मदनलाल धिंग्रा, चाफेकर बंधू, वीर भगत सिंग ह्यानी त्याला जशासतसे स्वरुपाचे प्रत्युत्तर देऊ हुतात्म पत्कारले. सारांश, भारतातील ' क्रांतीकारक दहशतवाद ' हा ब्रिटिशाच्या अन्याय व देजबाबदार धोरणाचा परिणाम होता.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील जहालवादी व दहशतवादी संप्रदायातील नेत्यांच्या गटाला विभागणारी सीमारेषा पुसट होत गेलेली दिसते. लोकमान्य टिळकाचा कायद्याच्या चौकटीतील व संविधानात्मक आंदोलनाच्या चाकोरीतील जहालवाद इतका क्रांतीकारक व उग्रवादी बनला की त्यांची परिणती काहीवेळा दहशतवादात होणे अपरिहार्य होऊन बसले. बॅ. सावरकराचा उग्रवाद व ब्रिटिशाशी झुंज देऊन स्वातंत्र्य लढा जिकण्याचा आशावाद नेताजी सुभाषचंद्र ह्याच्या लष्करी प्रतिकाराचे मूर्त स्वरूप घेऊन अवतरला. म्हणूनच असा निष्कर्ष काढला जातो की, स्वातंत्र्य लढ्यातील जहालवाद, दहशतवाद व लष्करवाद राष्ट्रीय क्रांतीच्या विविध अवस्था दर्शवितो. महात्मा गांधीच्या निःशस्त्र सत्याग्रह चळवळीतील जन शक्तीत दडलेल्या नैतिक दमनात सर्व प्रकारच्या शक्तीचा अविष्कार झाला होता. महात्मा गांधीच्या राष्ट्रव्यापी सत्याग्रहाचे राजनैतिक व नैतिक दडपण उग्रपंथीयाच्या चळवळीचा परिणाम होता असे समजण्यात हरकत नसावी.

क्रांतीकारक उग्रवाद्यानी सनदशीर राजकारणा ऐवजी क्रांतीकारक प्रतिकाराचा मार्ग चोखाळणें पसत केले. कारण १९०६ सालची बारीसाल परिषद पोलीसानी उधळून लावली. बंगालची फाळणी

करण्याचा निर्णय ब्रिटिश शासनाने घतला. जालीयनवाला बाग हत्याकांड, तिन्नेवल्वी येथील गोळीबार इत्यादी ब्रिटिशाच्या प्रक्षोभक कृत्यामुळे क्रांतीकाराचा सनदशीर राजकारणावरील विश्वास उडाला ब्रिटिश राज्यकर्त्याची दडपशाही, निःशस्त्र लोकावरील अत्याचार, वृत्तपत्राची व संघटनाची मुस्कटदाबी इत्यादी कारणामुळे क्रांतीकारकांना गुप्त संघटना स्थापन करुन प्रतिकारार्थ शस्त्र हाती घेणे भाग पडले याच काळात सावरकराचे वडील बंधु यांनी 'अभिनव भारत' नावाची संस्था स्थापन केली. तिच्या शाखा इतरत्र स्थापन झाल्या. सारांश, भारतीय जनतेच्या असंतोषाचा उद्रेक क्रांतीकारक दहशतवादातून झाला या संबंधीच्या घटना जरी कमी असल्या तरी त्यांचा परिणाम राष्ट्रव्यापी चळवळीवर झाला. हुतात्मे ठरलेल्या क्रांतीकारकाचा त्याग फुकट जाणारा नव्हता. क्रांतीकारकाचे धाडस, खंबीरपणा, मृत्युविषयी बेपर्वाई, शौर्य स्फूर्तिदायक ठरले. अर्थात स्वातंत्र्य चळवळीच्या काळात क्रांतीकारकाना 'दहशतवादी' ठरवून जहालानी मवाळानी त्यांना जवळ केले नाही. परंतु भारतीयाची सहानुभूती त्यांच्या पाठिशी राहीली. त्याच्या त्यागाबद्दल सर्वत्र कृतज्ञता व्यक्त केली जात असे.

दहशतवाद्याचे कट कारस्थाने –

दहशतवाद्यांना भारतातील ब्रिटिश नोकरशाहीला कोलमडून पाडावयाचे होते. त्यासाठी त्यांनी ब्रिटिश अधिकारी वर्गात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. देशातील निरनिराळ्या ठिकाणी झालेले ब्रिटिश अधिकाऱ्यांचे खुन हा दहशतवादी चळवळीचाच एक भाग होता. त्यासाठी आखलेली कटकारस्थाने परस्परांशी संबंधीत होती एवढेच नव्हे तर ब्रिटिश नोकरशाहीतील जुलमी अधिकाऱ्यांचे खून पाडण्याचे एक देशव्यापी सत्र दहशतवाद्यांनी आखल्याचे दिसते. या दहशतवादी कृत्यामुळे ब्रिटिश नोकरशाही लंगडी बनून तिचे नीतिधैर्य खचले असा दहशतवाद्यांचा विश्वास होता. तसेच यातून राष्ट्रवादी जनता ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघटित होईल अशी त्यांना आशा वाटत होती.

अलिपोर कट –

अलिपोर कटाच्या प्रकरणी विरेन्द्रकुमार घोष (अरविंद घोष यांचे बंधु) ब्रिटिश विरोधी कारवायात गोवले गेले. अलिपोर कराची

झळ अरविंद घोष यांना पोहचली. अरविंद घोष यांनी ब्रिटिश प्रदेशातून फ्रेन्सच्या ताब्यात असलेल्या पांडेचरीत प्रवेश केला व तेथेच त्यांनी आपला आश्रम स्थापन केला. अलिपूर प्रकरणी बंगाल पोलीसांनी जहालवाद्याच्या कट कारस्थानाचा दुवा ओळखला व जहालवाद्यावर छापे टाकले.

नासिक कट –

नासिकच्या कटात सावरकरबंधुना गुन्हेगार ठरविण्यात आले ग्वालीयर कटानंतर नासिकमध्ये दोन कट शिजले. या तिन्ही कटात परस्पर संबंध होते. तिन्ही कटांचा परस्पर संबंध लक्षात घेता दहशतवाद्यांच्या कार्याची सुसुत्रता व त्यांचे देशव्यापी जाळे यांची कल्पना येते. एका कटामध्ये नोव्हेबर १९०९ मध्ये व्हायसरॉय लार्ड मिन्टो ह्याच्या मोटारीवर बाँब फेकण्याचा प्रयत्न झाला. त्याच प्रमाणे नासिक मध्ये ब्रिटिश जिल्हाधिकाऱ्याचा खून करण्यात आला. नासिकच्या कटकारस्थान प्रकरणी २४ डिसेंबर १९१० मध्ये विनायक दामोदर सावरकर यांना नासिकच्या पहिल्या कटात काळचापाण्याची (हद्दपारीची) शिक्षा ठोठावण्यात आली तर नासिकच्या दुसऱ्या कटात त्याचा संबंध असल्यामुळे ३० जानेवारी १९११ मध्ये त्यांना जन्मठेपेची शिक्षा देण्यात आले या दोन्ही शिक्षा त्याना एकाचवेळी भोगावयाच्या होत्या याचा अर्थ ५० वर्षाची जन्मठेपेची शिक्षा भोगावी लागणार होती.

लाहोर कट –

दहशतवादी चळवळीच्या भारतातील एकूण केन्द्रापैकी लाहोर हे केन्द्र होते. या ठिकाणी क्रांतीकारकांनी ब्रिटिश शासना विरूद्ध संघटन बांधण्याचा प्रयत्न केला या संघटनेला आर्य समाजातील काही नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी साहाय्य केले. १९२५ मध्ये नवजीवन भारत सभा नांवाची संस्था लाहोर येथे स्थापन करण्यात आली. त्यासंस्थेचे भगतसिंग हे सचीव होते. भगतसिंगच्या क्रांतीकारक भूमिकेची जडणघडण लाहोर मध्येच झाली. त्या ठिकाणीच त्यांनी पत्रकार म्हणून प्रताप या हिन्दी साप्ताहिकात काम केले. ज्यावेळी लाला लजपत रॉय हे सायमन कमिशन विरूद्ध निदर्शनाचे नेतृत्व करीत होते त्यावेळी एका पोलीस अधिकाऱ्याने त्याना मारहाण केली. त्याचा सुड घेण्याचे

भगतसिंग, चंद्रशेखर आझाद यांनी ठरविले. १८ एप्रिल १९२९ रोजी भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी सेन्ट्रल लेजिस्लेटिव्ह असेम्ब्लीवर बॉम्ब फेकला त्यावेळी कायदे मंडळात Public Safety Bill ची चर्चा चालू होती. दहशतवाद्याना ब्रिटिश शासनाला होणाऱ्या परिणामासंबंधी इशारा द्यावयाचा होता म्हणून बाँब टाकण्याचा कट रचण्यात आला. भगतसिंग यांच्यावर सौंडर्स खून प्रकरणास असेंब्ली बाँब प्रकरणास जबाबदार असल्याचे आरोप ठेवण्यात आले. लाहोर कटात (सौंडर्स खून प्रकरण) भगतसिंग बरोबर सुखदेव, राजगुरु, जतीनदास, अजय घोष, गया प्रसाद, शिव वर्मा, जयदेव कपूर, बिजय कुमार सिन्हा, किशोरीलाल महवीरसिंग, कमलानाथ तिवारी, भगवती चरण होरा याच्यावर आरोपी म्हणून खटले भरण्यात आले. भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोंजी फाशी देण्यात आली. संपूर्ण देशात ब्रिटिश राजवटीविरूद्ध असंतोषाची लाट उसळली.

मेनपुरी कट –

मेनपुरी कटात क्रांतिकारकाचे हात गुंतले होते. या प्रकरणी गेंदालाल दिक्षित, रामप्रसाद बिस्मिल, मुकूंदीलाल आणि शिव कृष्णा याना अटक करण्यात आली व त्यांच्यावर खटले भरण्यात आले त्यापैकी गेंदालाल हे तुरूंगाच्या हॉस्पिटलमध्ये मरण पावले. बिस्मिल हे भूमिगत झाले व मुकूंदीलाल याच्यावरील आरोप सिद्ध झाले.

काकोरी कट –

भारतातील क्रांतीकारकांनी क्रांतीकारी चळवळीला १९२५ मध्ये नवा जोम प्राप्त करुन दिला. या काकोरी (लखनौ जिल्हा) येथे क्रांतीकारकानी रेल्वे लूटली. या प्रकरणी सचिन्द्रनाथ संन्याल याना बनारस कटाचा आरोपी ठरवून त्याना जन्म ठेपेची शिक्षा देण्यात आली. काकोरी कटाशीही त्याचा संबंध होता. काकोरी कटात रामप्रसाद बिस्मिल, राजेन्द्र लाहीरी व रोशनसिंग यांना फाशीची शिक्षा झाली तर सचिन्द्रनाथ संन्याल, मन्मनाथ दुब्लीश, सुरेशचंद्र भट्टाचार्यजी आणि इतराना १ डिसेम्बर १९२७ रोजी कडक शिक्षा सुनावण्यात आल्या.

कानपूर कटात साम्यवादी नेते डांगे व त्याचे अनुयायी यांना

सशस्त्र बंडाच्या आरोपाखाली दोषी ठरविण्यात आले.

परकीय देशांचे साहाय्य –

भारतातील क्रांतीकारकांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी परकीयांचे साहाय्य घेण्याचा प्रयत्न केला. पहिल्या महायुद्धात भारतातील क्रांतीकारकांनी इंग्लंडविरूद्ध लढणाऱ्या जर्मनीकडून शस्त्रसामुग्री मिळविण्याचा प्रयत्न केला. जतीन मुखर्जी, जदूगोपालरॉय, नरेन्द्रनाथ भट्टाचार्य (एम. एन. रॉय म्हणून ज्यांना प्रसिद्धी मिळाली.) भोलानाथ चतर्जी, अतुल घोष, बिपीन गांगुली व नरेन्द्र चौधरी यांनी जर्मनीकडून भारतात ब्रिटीश राजवटीशी संघर्ष देण्यासाठी शस्त्रसामुग्री मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या पदरी निराशा आली कारण जर्मन अधिकाऱ्यांनी त्यांना सहकार्य दिले नाही दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रिटीश राजवटीविरूद्ध सशस्त्र लढा देण्यासाठी राष्ट्रीय लष्कर संघटन निर्माण करण्याचा प्रयत्न रासबिहारी व नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी केला त्यावेळी ब्रिटिशाशी संघर्ष देणाऱ्या जपान व जर्मनी या दोन देशाकडून लष्करी साहाय्य मिळविण्याचा प्रयत्न क्रांतिकारकांनी केला. वासुदेव बळवंत फडके.

दहशतवादी आंदोलनातील स्वयंप्रेरीत क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांनी परकीय राजवट, जुलूमशाही व अत्याचार याविरुद्ध एक अनन्यसाधारण मोहिम हाती घेतली. जूलमाने त्रस्त झालेल्या गोरगरीबासाठी काही तरी करावे. या उदात्त हेतुने क्रांतीकारक वासुदेव फडके यांनी सुख वस्तु जीवनाचा, तरूण पत्नीचा व व्यक्तिगत सुखाचा त्याग केला. ब्रिटिश शासनाशी संधान बाधुन संपत्ती जमा करणारे व्यापारी, जमिनदाराची संपत्ती लुटून ती गरीबांना वाटून देण्याचा एक अभिनव प्रयोग त्यांनी केला. त्यांनी स्वत:च्या सुखासाठी संपत्तीचा संचय केला नाहीउलट लुटलेली संपत्ती त्यांनी गरीबांना वाटली व ब्रिटिश शासनाला जेरीला आणले अर्थात वासुदेव बळवंत फडके यांनी अनुसरलेला मार्ग आधुनिक काळात सन्माननीय ठरणार नाही. परंतु पारतंत्र्याच्या काळात त्याच्या कृती मागील राष्ट्रीय प्रेरणा, जूलमाविरुद्ध लढण्याची वृत्ती आणि अन्यायाला प्रतिकार करण्याची प्रवृत्ती यात लोकांना आदर्श आढळला त्या वेळच्या लोकाच्या दृष्टीने वासुदेव बळवंत फडके यांच्या

कृतीत दोष नव्हता.

अर्थात वासुदेव बळवंत फडके यांना पुरेशे शिक्षण मिळाले नाही त्याच्या कार्याला विशिष्ट दिशा मिळू शकली नाही. त्यांच्या कार्यामागील उदात्त हेतु व आदर्श उद्दिष्टे याबद्दल जनतेत आदर होता. परंतु त्यानी अनुसरलेला मार्ग काळाच्या मागणीशी सुसंगत नव्हता.

दहशतवाद –

जहालवादी लोकमान्य टिळकांनी गणपती उत्सवासारखे सार्वजनिक उत्सव साजरे करण्यास सुरूवात केली. त्याच वेळी दहशतवाद्यांनी आपल्या आंदोलनात्मक राजकारणासाठी, धार्मिक उत्सवप्रसंगी सार्वजनिक व्यासपीठाचा वापर करण्यास सुरूवात केली. केवळ धार्मिक भावनाचा आधार घेऊन, पोथीनिष्ठ हिंदुवादाची प्रेरणा घेऊन दहशतवाद्यांनी ब्रिटिश विरोधी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सार्वजनिक उत्सव प्रसंगी होणाऱ्या नाटकातून ब्रिटिशांचा दडपशाही कारभार चव्हाट्यावर आणण्याच्या प्रयत्नात जहालवाद्याप्रमाणेच दहशतवादी देखील सामील झाले. त्यांनी ब्रिटिश राजवटीविरूद्ध द्वेष पसरविण्यास सुरुवात केली. सरतेशेवटी ब्रिटिश शासनाला १८७६ साली Dramatic Performance Act संमत करून प्रक्षोभक नाटकावर बंदी आणावी लागली. अन्ना मार्तंड जोशी लिखित श्री शिव छत्रपती विजय आणि अनंत वामन बर्वे लिखित ' लोकमत विजय ' या नाटकावर ब्रिटिश शासनाने बंदी आणली.

मुस्लीम ' दहशतवाद ' –

भारतातील राष्ट्रीय आंदोलनाच्या पर्वात शेवटी शेवटी मुस्लीम लीगने आणि या संघटनेच्या नेत्यानी ' दहशतवादा ' चा आधार घेतला व मुसलमान नेत्यांनी विध्वंसाच्या तत्व प्रणालीचा प्रसार केला. मुस्लीम लीगच्या विध्वंसक आंदोलनात रक्तपात, बालत्कार, मालमत्तेचा विध्वंस व लूट, सक्तीचे धर्मान्तर, कूट कारस्थाने, षडयंत्र आदी तंत्राचा वापर करण्यात आला – मुस्लीम लीगने ' प्रत्यक्ष कृती ' (Direct Action) च्या स्वरुपात विध्वंसक राजकारण सूरु केले १६ ऑगस्ट १९४६ रोजी मुस्लीम लीगने ' प्रत्यक्ष कृती ' चा आदेश दिला व परिणामत: कलकत्ता आणि शिलॉय येथे हजारो निष्पाप लोकाचा बळी

पडला. अदमासे ७००० लोक या विध्वंसक आंदोलनात बळी गेले. नौखाली येथील घटना या प्रकरणाला साक्ष आहे.

मुस्लीम नेत्यांनी ' सांप्रदायवादाचे ' राजकारण करून जातीय दंगली पेटवल्या. मुस्लीम लीगच्या नेत्यांचें विध्वंसक राजकारणाचे धोरण स्वातंत्र्यपूर्व काळात सांप्रदायिक दंगलीतून स्पष्ट होते. तत्कालीन जातीय दंगलीत मुस्लीम धर्मवेडचा नेत्यांनी जरी पुढाकार घेतला असला तरी त्या जातीय दंगलीच्या आगीत तेल ओतण्याचे काम मुस्लीम लीगने केले होते यात शंका नाही.

मुस्लीम लीगच्या ' दहशतवादाचे ' आर्थिक, राजकीय व नैतिक परिणाम घडून आले. मुस्लीम लीगच्या प्रत्यक्ष कृतीचा आदेश व त्यातून पेटलेल्या जातीय दंगलीचे स्वरुप इतके आमानुष व विध्वंसक होते की त्यामुळे मुस्लीम समाजाचें नांव बदनाम झाले व भारतीय मुसलमानाची प्रतिमा डागाळली गेली. कोटयावधी रुपयाची संपत्ती नष्ट झाली व तिची लूट झाली. मनुष्य हानी मोठ्या प्रमाणावर झाली. Encyclopaedia Britanica मधील आकडेवारी नुसार मार्च १९४८ पर्यंत जातीय दंगलीत ५००,००० लोक मारले गेले ६०००,००० हिन्दु व शिख पश्चिम पाकीस्तानातून निर्वासित म्हणून बाहेर पडले तर ६,५००,००० मुस्लमान भारतातून पाकिस्तान मध्ये गेले. १९५० पर्यंत ४,०००,००० हिन्दु पूर्व पाकिस्तानातून भारतात आले तर १,०००,००० मुस्लमान भारतातून बाहेर गेले.



२ आंदोलनाचे राजकारण

आंदोलनाचे राजकारणाचा इतिहास समाजइतका प्राचीन आहे. आधुनिक काळात मात्र आंदोलनाच्या राजकारणाने नवीन रूपे धारण केली आहेत व भागीदारीच्या शासनात जन आंदोलनाच्या राजकारणाने प्रभाव वाढविला आहे. आंदोलनाच्या राजकारणाचा असा खास सर्व मान्य असा सिद्धान्त नाही, तसेच आंदोलनाच्या राजकारणात सर्व मान्य अशी तत्वे प्रस्थापित झालेली असून ती काटेकोर रीतीने पाळली जातात असेही म्हणता येणार नाही. आंदोलनाच्या राजकारणाच्या सीमा रेषा आखणे देखील अवघड आहे विरोधाचे राजकारण, निषेधाचे राजकारण कुठे संपते व कुठे आंदोलनाचे राजकारण सुरु होते हे देखील सांगणे अवघड आहे. एकंदरीत आंदोलनाच्या राजकारणाचा सिद्धान्त अनेक पदरी असून त्याला अनेक संदर्भ आहे. असे असून ही आंदोलनाचे राजकारण एक वादग्रस्त असे तंत्र म्हणून राजकारणात ओळखले जाते. लोकशाही शासनात शासनाविरुद्ध प्रतिक्रीया व्यक्त करण्यासाठी जसा या तंत्राचा वापर केला जातो, त्याच प्रमाणे परकीय राजवटी विरुद्ध लढण्यासाठी आंदोलनाचे राजकारण खेळले जाते. लोकशाही राज्यात जसे आंदोलनाच्या राजकारणाला महत्व आहे तसेच हुकूमशाही राज्यातही हुकूमशाह आंदोलनाच्या राजकारणाचे तंत्र वापरत असतो. हिटलर देखील हे तंत्र वापरत असे. हिटलरचे तर असे मत होते की, " जो

कोणी रस्त्यावर काबू अथवा नियंत्रण ठेवेल तो राष्ट्रावर नियंत्रण ठेऊ शकले.

" It was one of Hitler's favourite maxims that " he who controls the streets controls the country."

आंदोलनाचा इतिहास मानवी समाजाइतकाच प्राचीन आहे. आंदोलन करण्याची वृत्ती मानवी समाजात आहे. आणि आंदोलनाची ही वृत्ती जशी व्यक्तीगत स्वरुपात पाहावयास सापडते. तशीच ती सामुहिक स्वरुपातही दिसून येते. व्यक्तीगत हेतुसाठी व्यक्तीने केलेली प्रतिक्रियात्मक कृती सत्त्याग्रहाचे स्वरुप धारण करेल किंवा निषेध नोंदण्यासाठी व्यक्ती इतर कृतीचा प्रकार अंमलात आणते तसेच सामुहिक स्वरूपात आपली प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी व्यक्तींचा समूह आंदोलनाचा मार्ग, अनुसरेल. रस्त्यावर लोकांना संघटित करून मोर्चे काढणे, विरोधकाना दहशत बसविणे, मागण्या सनदशीर मार्गाने मांडणे, निषेध नोंदविणे, शासनाशी असहकार पुकारणे, बहिष्कार घालणे, 'बंद'ची घोषणा देणे, संप पुकारणें इत्यादी.

आंदोलनाच्या राजकारणाने समाज जीवनाच्या सर्वक्षेत्रात प्रवेश केला आहे. औद्योगिक समूह, कामगार चळवळी, विद्यापीठ, शिक्षणाची सर्व क्षेत्र महिला संघटना, धार्मिक चळवळी, सामाजिक संस्था, सार्वजनिक क्षेत्र आदी.

विसाव्या शतकाच्या आरंभाला भारतात उदयास आलेला जहालवाद, क्रांतिवाद आणि दहशतवाद यांच्यामध्ये सीमारेषा आखणे अवघड होऊन बसते. हे तिन्ही विचारप्रवाह परस्पराशी संबंधीत आहेत. जहालवादाची परिणती क्रांतिवादात झाली व क्रांतिवादाचा अतिरेकी परिणाम म्हणून दहशतवाद उदयास आला. अनेक दहशतवादी आपणाला क्रांतिकारक समजत असत तर जहालवादी नेते राजकीय क्रांतिकारक समजत. अर्थात या तिन्ही विचारप्रवाहाचे प्रतिनिधित्व करणारे पंथ आपापल्या भूमिकेचे परिस्थितीनुरुप समर्थन करीत. उदाहरणार्थ दादाभाई नौरोजी मवाळवादाचे पुरस्कर्ते होते. ते आयुष्याच्या उतरार्धात जहालवादी बनले. ब्रिटिश राजवटीला इष्टापत्ती मानणारे व प्रसंगी ब्रिटिश राजवटीच्या फायद्याचे गुणगान गाणारे नौरोजी नंतर

ब्रिटिश राजवटीचे टीकाकार बनले. संपूर्ण स्वशासनाच्या ध्येयाचे समर्थक बनले. प्रसंक ब्रिटिश शासनाचे विरोधक बनले, परंतु त्यांनी शांततापूर्ण व संविधानिक मार्गाची कास सोडली नाही. शांततापूर्ण व संविधानिक कायद्याच्या चौकटीतच त्यांनी ब्रिटिश राजवटीवर टीका केली. तिच्यावर लोकमताचे दडपण आणले. लोकमान्य टिळक ब्रिटिश राजवटीचे विरोधक बनले. राजकीय क्षेत्रात क्रांतिकारक बदल करणे व परकीय राजवट कोलमडून टाकून तेथे स्वराज्याची स्थापना करणे हे ध्येय त्यांनी निश्चित केले. कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन ब्रिटिश राजवटीला प्रतिकार करण्याचे तंत्र त्यांनी अवलंबले. लोकमान्य टिळकाचा राजकीय क्रांतिवाद ब्रिटिश राजवटीच्या संदर्भात काही अशी मान्य करण्यास हरकत नाही. योगी अरविंद घोष जहालवादाचे पुरस्कर्ते होते आणि ब्रिटिश राजवटीविरूद्ध क्रांतिकारक उठावाचे कट्टर समर्थक होते. सशस्त्र क्रांतिकारक उठावाचे समर्थक व कर्ते बॅ. सावरकर, वी. के. घोष (श्री अरविंदाचे बंधु) आणि वी. एन दत्त (विवेकानंदाचे बंधु) दहशतवादी चळवळीचे अग्रणी होते. क्रांतिकारकाची राजकीय प्रेरणा व दहशतवादी नेत्याची शक्तीचा वापर करण्याची प्रवृत्ती दहशतवादी चळवळीच्या नेत्यात दिसून येते. म्हणूनच जहालवादी चळवळीची वैचारिक प्रेरणा व दहशतवादी चळवळीच्या नेत्यातील धाडसी कृती प्रवणता परस्परापासून अलग करता येत नाही. दहशतवादी चळवळीचे नेते स्वतःला क्रांतिकारक समजत. परंतु लोकमान्य टिळकासारखे नेते मात्र दहशतवादाच्या सर्व तंत्राना तत्वतः मान्यता देण्यास तयार नव्हते. राजकीय खून, कटकारस्थाने व जाळपोळ या सारख्या अतिरेकीपणाला लोकमान्यांनी उघड पाठिंबा दिला नाही. परंतु व्यक्तीगत स्वार्थाचा विचार न करता राष्ट्रासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास सिद्ध झालेल्या हुतात्म्याबद्दल त्यांच्या मनात सहानुभूती होती, आदर होता.

भारतीय राष्ट्रवाद : मवाळ व जहाल पंथाचे दृष्टीकोन –

भारतीय राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय चळवळ यांच्याशी मवाळ व जहाल पंथातील नेत्याचे असलेले नाते लक्षात घेताना मवाळ व जहाल पंथातील नेत्यांचे ब्रिटिश राजवटीशी असलेले संबंध चर्चेला घेणे

आवश्यक ठरते. राष्ट्रवादी चळवळीने जोम धरण्यापूर्वी मवाळ पंथातील नेत्यांचें परकीय राजवटीकडे पाहण्याचा दृष्टीकोन लक्षात घ्यावा लागेल. राजा राममोहनरॉय, केशवचंद्र सेन, महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, फिरोजशहा मेहता आदी मवाळ पंथीय नेते ब्रिटिश राजवटीशी सहकार्य करून राजकीय प्रगती करण्याचा विचार करीत होते. ब्रिटिश राजवटीकडून सवलती व हक्क मिळविण्यासाठी, सनदशीर, संविधानिक आणि शांततापूर्ण मार्गाचा अवलंब करावा असा आग्रह धरीत होते. ब्रिटिश राजवटीला " ईश्वरी वरदान " (काहीच्या मते ती इष्टापत्ति) मानण्याची त्यांची प्रवृत्ती होती. ब्रिटिश राजवटीचे फायदे व तिच्याद्वारे होणाऱ्या अनेकविध सुधारणा त्यांच्या दृष्टीनें महत्वाचे होते. अर्थात ब्रिटिश राजवटीसंबंधी उदारमतवादी दृष्टीकोन ठेवणारे सर्व मवाळ पंथातील नेते देशभक्त होते. त्यांच्या देशभक्तीसंबंधी संशय घ्यायला जागा नव्हती. ब्रिटिश साम्राज्याची प्रजा म्हणून भारतीयांना हक्क मिळावेत ही त्यांची मागणी होती. त्यासाठी त्यांनी ब्रिटिश राजवटीविरूद्ध संविधानिक शांततापूर्ण आंदोलन केले, अर्ज विनंत्या केल्या लोकमताचे ब्रिटिश शासनावर दडपण आणले. परंतु ब्रिटिश राजवटीचे शत्रुत्व घेऊन तिला क्रांतिकारक मार्गाने सुरूंग लावण्याचा प्रयत्न केला नाही. म्हणूनच त्यांना क्रांतिकारी राष्ट्रवादी न मानता देशभक्त म्हणणे संयुक्तिक ठरते असा एक विचारप्रवाह आहे.

याउलट, स्वामी दयानंद, स्वामी विवेकानंद, रविन्द्रनाथ टागोर अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल, लोकमान्य टिळक, लाला लजपतराय इत्यादी नेत्याचे विचार व कार्य राष्ट्रवादाने प्रेरित झाले होते. राष्ट्रीय चेतना प्रज्वलीत करुन परकीय राजवटीविरुद्ध संघर्ष देण्याचा पवित्रा या नेत्यांनी प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने घेतला होता. स्वराज्याला धर्म मानणारे व परकीय राजवटीला विरोध करणाऱ्या जहाल पंथातील नेत्यांनी राष्ट्रीय आस्मिता जागृत करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश राजवटीकडून होणाऱ्या सुधारणेपेक्षा ब्रिटिश राजवटीपासून किंवा परकीय राजवटीविरुद्ध स्वातंत्र्याचे महत्व त्यांना अधिक वाटले. राजकीय हक्क मिळविण्यासाठी संघर्ष देण्याचा त्याचा प्रयत्न राष्ट्रवादी प्रेरणांनी प्रभावित झाला होता. भारताचे सार्वभौम अस्तित्व व

ब्रिटिशाचे वर्चस्व यात तडजोड होऊ शकत नाही. तात्पर्य भारताला परकीय राजवट नष्ट करुन स्वराज्य स्थापन करावे लागेल अशी राष्ट्रवादी भूमिका त्यांनी घेतली.

परकीय राजवटीकडे पाहण्याचा जहालवाद्यांचा आणि मवाळवाल्यांचा दृष्टिकोन भिन्न होतो. जहालवाद्यांनी परकीय राजवटीला सातत्याने विरोध करण्याचे धोरण चालू ठेवले. लोकमान्य टिळकांनी तर कधी कायद्याच्या चौकटीत राहून ब्रिटिश शासनाला विरोध केला तर प्रसंगी कायद्याच्या चौकटीच्या बाहेर जाऊन ब्रिटिश राजवटीला विरोध केला व कायदेशीर परिणामाना तोंड देण्याची जोखीम पत्करली. जहालवद्यांनी नोकरशाहीच्या कार्यात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. या उलट मवाळ पंथातील नेत्यांनी प्रस्थापित नोकरशाहीशी विधायक सहकार्य केले, आणि शासन विरोधी भूमिका शक्य तेथे टाळली.

संविधानिक विकासाच्या चळवळीत मवाळवाद्याची भूमिका जहालवाद्यापेक्षा भिन्न होती. मवाळ पंथातील नेते प्रस्थापित संविधानात सुधारणा व्हावी व तिच्यात बदल व्हावे म्हणून शांततापूर्ण मार्गानी आंदोलन करीत होते. या उलट जहाल पंथातील लोकांना ब्रिटिश राजवटीनें प्रस्थापित केलेली सर्व व्यवस्थाच बदलून टाकवयाची होती. ब्रिटिश राजवटीतील संविधानिक सुधारणेवर संपूर्ण विश्वास ठेवण्यास जहालपंथातील नेते तयार नव्हते.

ब्रिटिश सत्तेशी शक्य असेल तेथे सहकार्य देण्याचे धोरण मवाळ पंथातील नेत्यानी अवलंबले. या उलट जहालपंथातील नेत्यांनी ब्रिटिश सत्तेला शक्य असेल तेथे विरोध करण्याचे तंत्र अवलंबले. मवाळपंथातील नेत्यानी संविधानिक आंदोलनाद्वारे शासनाला मागण्या मान्य करण्यास भाग पाडून स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न केला तर जहालवादी ब्रिटिशांना राष्ट्राबाहेर घालवून स्वातंत्र्य मिळविण्याची आकांक्षा उराशी बाळगून होते. अशा प्रकारे शासनाकडे विशेषतः परकीय राजवटीकडे पाहण्याचा दृष्टिकोन जहाल व मवाळ नेत्यांचा भिन्न असल्यामुळेच त्यांच्या राजकीय डावपेचात फरक पडत गेला. स्वदेश चळवळ व असहकार्याचे आंदोलन ही दोन्ही राजकीय हत्यारे जहालवाद्यांनी परकीय राजवटीला विरोध करण्यासाठी वापरली.

ब्रिटिश राजवटीकडे पाहण्याचा दृष्टिकोन –

भारतात इंग्रजाचे आगमण व त्यानी येथे प्रस्थापित केलेली राजवटया विषयी भारतीय विचारवंतानी संमिश्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. ब्रिटिश राजवटीकडे पाहण्याचा दृष्टिकोन व परकीय राजवटीला भारतात ठिकठिकाणीमिळालेला प्रतिसाद सारखा नाही. बगाल मधील ब्राम्हो समाजाने ब्रिटिश राजवटीचे स्वागत केले. ब्राम्हो समाजाचे नेते राजाराम मोहन रॉय व त्यांचे अनुयायी ब्रिटिशाच्या प्रगळीने दिपून गेलें होते. त्यांच्या कर्तृत्वाची मोहिनी ब्राहमोसमाजातील सदस्यांवर पडली होती. नेमस्त पंथातील काही नेत्यानी ब्रिटिश राजवटीला ईश्वरी वरदान मानले तर काही नेत्याना इंग्रजाचें भारतातील आगमन ' एक इष्टपति ' वाटत होती. लोकहीतवादी दादाभाई नौरोजी इत्यादी नेत्यांनी ब्रिटिश राजवटीचे इष्ट परिणाम मान्य केले होते. या उलट भारतातील क्रांती-कारक नेत्यांचा व जहाल पंथातील नेत्यांना ब्रिटिश राजवट एक शाप वाटत होता. टिळक, विष्णूशास्त्री चिपळूनकर यांनी स्वदेश, स्वधर्म आले स्वभाषा याचा पुरस्कार केला व परकीय राजवटीला विरोध केला. सारांश, ब्रिटिश राजवट कित्येकांना ईश्वरी वरदान वाटत होती, काही जणाना ती इष्टापत्ती वाटली तर काही नेत्याना ब्रिटिशाचे भारतातील आगमन हा शाप वाटला.

क्रांतीकारकांनी स्वकीय आणि परकीय हा भेद सर्व क्षेत्रात केलेला दिसून येतो. स्वराज्य विरूद्ध पारतंत्र्य भारतीय संस्कृती विरुद्ध पाश्चिमात्य संस्कृती, भारतीय धर्मा विरूद्ध परकीय धर्म यातील आंत-रिक विरोधाचे मूळ राष्ट्रीय आस्मिनेशी जोडून क्रांतीकारकानी राष्ट्रीय जागृतीचे व राष्ट्रीय जाणीवेचे धडे भारतीय लोकांना दिले. ब्रिटिश राजवटीला ' ईश्वरी वरदान ' मानणारे व ब्रिटिश राजवटीला ' इष्टपत्ती ' म्हणून संबोधणारे ' नेमस्त ' नेत्यापेक्षा राष्ट्रप्रेमाने व स्वार्थ त्यागाने परिपूर्ण अशा क्रांतीकारकाच्या कार्याभुळेच राष्ट्रीय एकात्मतेची चळवळ सामर्थ्यवान बनली. ब्रिटिश विरोधी भूमिका घेऊन स्वकीयाचा कैवार क्रांतीकारकांनी प्रथम घेतला. ब्रिटिश साम्राज्यवाद व भारतीय लोकांचे स्वराज्य यांतील आंतरविरोध स्पष्ट करुन साम्रा-

ज्यवादाला विरोध करण्यासठी दास्यात जखडलेल्या भारतीय जनतेने तयार झाले पाहिजे. ही जनमानसाची मनोभूमिका निर्माण करण्याचा क्रांतिकारकांचा प्रयत्न यशस्वी झाला.

नेमस्ताचे ब्रिटिश राजवटीशी संबंध –

राष्ट्रीय आंदोलनाच्या काळातही भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटिश राजवटीला ' शक्य तेथे विधायक सहकार्य देण्याचे व आवश्यक तेथे विरोध करण्याचे धोरण " कार्यवाहित आणले होते. सामाजिक व राजकीय सुधारणेच्या क्षेत्रात परकीय राजवटीकडून शासकीय मदत व वैधानिक सवलती मिळविणे हे या विधायक सहकार्याच्या धोरणामागील प्रमुख उद्दिष्टचे होती. ब्रिटिश राजवटीद्वारा काही चांगल्या गोष्टी घडत असतील, ब्रिटिशांच्या साहाय्याने सुधारणेचा कार्यक्रम अंमलात आणता येत असेल तर त्याचा फायदा घेतला पाहिजे हा व्यवहार्य दृष्टीकोन समान सुधारणेकडे कल असलेल्या नेमस्त विचारवंतानी बाळगलेली दिसतो. त्याचप्रमाणे राजकीय सुधारणेकडे वाटचाल करताना ब्रिटिशाशी संबंध बिघडवून त्याचा अकारण रोष पत्करणे नेमस्त पुढाऱ्यांना अनावश्यक वाटत होते. म्हणून केवळ परकीय राजवट म्हणून तिच्याविरुद्ध प्रखरतेने उभे राहण्याचे धोरण नेमस्तानी कार्यवाहित आणले नाही विशिष्ट राजकोय परिस्थितीत, विशेषतः जेव्हा ब्रिटिश राज्यकर्ते राजकीय सुधारणेचे मार भारतीय जनतेच्या पदरात टाकण्यास उत्सुक आहेत अशा प्रसंगी त्यांच्याशी (ब्रिटिश राज्यकर्त्यांशी) ' विरोधासाठी विरोध करणे ' राजकीयदृष्टचा सुज्ञपणाचे ठरणार नाही. हे काँग्रेसमधील नेमस्त गटातील नेत्यांनी चांगले ओळखले होते.

जहालवादी पंथातील नेत्यांना ' सामाजिक व राजकीय सुधारणेसाठी ब्रिटिशासमोर ' भिक्षापात्र ' घेऊन उभे राहणे आवश्यक तसेच योग्य वाटत नव्हते. म्हणून नेमस्तांच्या नेभळटपणावर व भिक्षुकी वृत्तीवर जहालवादी पंथातील नेत्यांनी टीका केली. ब्रिटिश राजवटीशी ' विधायक सुसंवाद ' साधण्याऐवजी जहाल पंथातील नेत्यांनी – लोकमान्य टिळक, बिपिनचंद्र पाल, अरविंद घोष यांनी आक्रमक पद्धतीचा वापर करण्याचे ठरविले. परकीय राजवटीविरूद्ध स्वराज्यासाठी संघर्ष देण्याचे आवाहन भारतीय जनतेला केले. १९०२ पूर्वीच टिळकांनी

निःशस्त्र प्रतिकाराचें तत्वज्ञान भारतीय लोकापुढे मांडले आणि महात्मा गांधीचा राजकीय क्षितीजावर उदय होण्यापूर्वीच लोकमान्य टिळकांनी असहकार चळवळीद्वारे आंदोलनाच्या राजकारणाला सूरूवात केली होती. त्यांनी पुढे मांडलेली चार सुत्री कार्यक्रमाच्या योजनेत स्वदेशी चळवळ, बहिष्कार मोहिम, राष्ट्रीय शिक्षण, निःशस्त्र प्रतिकार आदी राजकीय पद्धतीचा समावेश झाला होता. ब्रिटिश राजवटीवर राजकीय दडपण आणणे व ब्रिटिश नोकरशाहीला नमविणे व स्वराज्याकडे वाटचाल चालू ठेवणें हे टिळकप्रणीत राजकीय आंदोलनाची प्रमुख उद्दिष्टचे होती. ब्रिटिशाशी विधायक सुरुवात साधने लोकमान्य टिळक व त्यांच्या सहकाऱ्यांना अनावश्यक वाटत होते

जहालवादी नेत्यांचा व मवाळपंथीय नेत्यांचा ब्रिटिश राजवटीकडे व राज्यकर्त्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन निरनिराळ्या प्रसंगी व्यक्त झालेला आहे. जहाल राष्ट्रवादी नेत्याच्या दृष्टिकोनात राजकीय वास्तवता प्रतीत होते तर मवाळपंथीय नेत्यांच्या विशेष गोखले प्रभूतीच्या दृष्टिकोनात " स्वप्नील आशावाद " व्यक्त झालेला दिसतो.

व्हिक्टोरिया कारकीर्दीच्या सुवर्णमहोत्सव प्रसंगी लोकमान्य टिळकांनी खालील प्रमाणे प्रतिक्रिया व्यक्त केलेली दिसून येते.

The sixtieth anniversary not of our prosperity, but of our decline..... All of us have now become equally powerless that dispirited and we are becoming so weak and lifeless that any body may lord it over us or tyrannise us all, or one might say we have already become so. Unfortunately, we are now having a daily experience of how the people of any country degenerate when continually pressed under the roller of foreign rule... In brief, the tne country which had some activity a hundred years ago has now become completely helpless and poor. This year especially famine, plague, and earthquakes have reduced the people to the last extremities. To

speak the truth, none can help thinking that this is surely not the proper time for celebrating the subilee at least not in India "

वेल्सचे युवराज व युवराज्ञी यांच्या भेटीचा संदर्भ देऊन गोखले यानी डिसेंबर १९०५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस समोर भाषण केले व ब्रिटिश राज्यकर्त्यासंबंधी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. ब्रिटिशाशी आपले संबंध त्याच्या राजवटीचे फायदे व त्याची न्यायप्रीयता यासंबंधी स्वप्नील आशावाद त्यांच्या भाषणात व्यक्त झालेला दिसून येतो. गोखले म्हणतात.

Gentlemen, our first duty today is to offer our most loyal and dutyful welcome to their Royal Highnesses the Prince and Princess of wales on the occasion of this their first visit to India. The throne in England is above all parties beyond all controversies. It is the permanent seat of the majesty, the honour and beneficence of the British Empire And in offering our homage to its illustrious occupants and their heirs and representatives, we not only perform a loyal duty..... of hearts for all that is noble and high minded in England's connection with India. The last queen Empress,aga in, was known within the limits of her constitutional position, to exercise during her reign her vast influence in favour of a policy of justice and sympathy towards the Indian people. We can never forget that the great proclamation of 1858, on which we take our our stand so largely in our constitutional struggle, was not only in spirit but also in substance her own declaration of the principles on which India was to be governed. The present king Emperor has announced his resolve to

walk in the footsteps of his mother, and we have no doubt that the prince of wales is animated by the same desire to see a policy of righteousness pursued towards India. We rejoice that his Royal highness and his noble consort have come out amongst us to aequaint themselves personally with the ancient civilization of this country ond its present condition. The congress earnestly and respectfully wishes their Royal highnesses a most successful tour through India, and it humbly trusts that the knowledge they will acquire and the recollections they will carry back with them will constitute a fresh bond of sympathy and attachment between the Royal Family in England the princes and people of this country.

ब्रिटिश राजवटीला नेमस्ताचा प्रतिसाद –

भारतातील 'नेमस्त नेत्यांनी' ब्रिटिश राजवटीच्या प्रगतशील धोरणाना व सुधारकवादी भूमिकेला दिलेला प्रतिसाद हा त्यांच्या विधायक सहकार्याचा सबळ पुरावा मानला जातो. ब्रिटिश राजवटीच्या कल्याणकारी व फायदेशीर कार्याचा गौरव करणारे नेमस्त विचारवंत ब्रिटिशांच्या सद्सद्विवेक बुद्धीवर तसेच विवेकबुद्धीवर विश्वास ठेवीत होते. विशेषत: नेमस्त नेत्यापैकी समाज सुधारणेवर अधिक भर देणारे सुधारक ब्रिटिश शासनांचे सुधारणाविषयक कार्यक्रमाची प्रामाणिक कार्यवाही होईल याबद्दल खात्री बाळगून होते. सामाजिक बदलासाठी कायदा हा प्रभावी शस्त्र असल्यामुळे ब्रिटिश राजवटीमार्फत असे कायदे करुन सामाजिक वाईट चालीरीतीना पायबंद घालता येईल, सुधारणेला पोषक अशी परिस्थिती निर्माण करता येईल हे सुधारकांनी आपल्या अनुभवावरुन ओळखले होते. म्हणून ब्रिटिश राजवटीच्या उत्तरार्धात त्यानी 'सामाजिक विधेयका' साठी (Social Legislation) आग्रह धरल्याचे दिसते.

सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात परकीय राजवटीने ब्रिटिश

राजवटीने हस्तक्षेप करु नये असे लोकमान्य टिळकाना वाटत होते म्हणून सामाजिक क्षेत्रात राज्यसंस्थेने केलेल्या हस्तक्षेपाला त्यांनी विरोध केला. सामाजिक सुधारणा ही बाब येथील भारतीय रहिवाशाची असल्याने ब्रिटिश राज्यकर्त्यानी या बाबतीत पुढाकार घेऊ नये असे त्यांचें मत होते. राष्ट्रीय दृष्टिकोनातून ब्रिटिशाच्या या क्षेत्रातील हस्तक्षेपाला पायबंद घालणे त्यांना आवश्यक वाटत होते कारण त्यामुळे लोकांचा सामाजिक व धार्मिक संस्थाबद्दलचा राष्ट्रीय आदर कमी होण्याची शक्यता होती. त्यामुळे राष्ट्रीय अस्तिवेच्या प्रेरणाना धक्का पोहचण्याची शक्यता होती. याशिवाय टिळकांना असे वाटत होते की, सामाजिक सुधारणा भारतीय समाजावर बाहच शक्तीच्या जोरावर लादण्या ऐवजी या सुधारणा भारतीय समाजाने स्वयंस्फूर्त रीतीने घडवून आणल्या तर त्या जास्त टिकावू स्वरुपाच्या ठरतील. सारांश भारतात धार्मिक समुदायाच्या सामाजिक बाबीत परकीयांचा हस्तक्षेप त्याना अनावश्यक व अनर्थकारक वाटत होता. विवाहातील वयोमर्यादा कायद्याद्वारे ठरविणाऱ्या संमती विधेयकास (Consent Bill) टिळकांनी विरोध केला व प्रत्यक्ष व्यवहारात टिळकांनी आपल्या मुलीचे १६ वर्षाच्या आत विवाह विधी उरकले.

जहालवादाचा उदय –

स्वातंत्र्यपूर्व भारतातील जहालवादाचा उगम लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखाली झाला. अर्थात लोकमान्य टिळकांपूर्वीच जहालवादी चळवळीची बीजे पेरली गेली होती. जहालवादी चळवळीचा उगम मात्र नाटचपूर्ण रीतीने झाला. विसाव्या शतकाच्या आरंभाला घडवून आणलेल्या राजकीय घडामोडीनी जहालवादाच्या उदयास साहाय्य केले. त्याच प्रमाणे प्लेग व दुष्काळ या सारख्या नैसर्गिक आपत्ती जहालवाद्याच्या दृष्टीनी इष्टापत्ति ठरल्या कारण बंगालची फाळणी, प्लेग सारख्या साथीचा रोग आणि दुष्काळासारखी नैसर्गिक आपत्ती या समस्या हाताळण्यात परकीय शासनाला अपयश आहे. समस्या हाताळतांना त्यांनी स्वीकारलेले दडपशाहीचे व जूलमाचे धोरण प्रतिक्रियात्मक चळवळीला अप्रत्यक्षपणे उत्तेजन देणारे ठरले. शासनाविरुद्ध महाराष्ट्र बंगालमध्ये असंतोषाची लाट उसळली. शासनाविरोधी भावनेचा उद्रेक

सर्वत्र होऊ लागला व त्यातच जहाल चळवळीने उग्ररुप धारण केले. १९०५ ते १९१९ या कालखंडात जहालवादी चळवळीने सर्वत्र जोम धरला.

जहालवाद –

जहालवादाचा उद्रेक होण्यास काही निश्चित अशी कारणे जबाबदार होती. ब्रिटिश राजवटीने राजकीय सुधारणेचे अमिष हिन्दुस्थानी लोकांना दाखविले परंन्तु राजकीय सुधारणेचे भरघोस माप मात्र हिन्दुस्थानी लोकांना पदरात टाकण्यास नकार दिला. त्यामुळे हिन्दुस्थानी लोकामध्ये असंतोष पसरला. विशेषत: 'इंडियन कॉन्सील ॲक्ट, १८९२' च्या कायद्याने हिन्दुस्थानी लोकांचे समाधान झाले नाही. परिणामत: अनेक मवाळवादी ब्रिटिश शासनाच्या विरोधात गेले व ते जहालवादी संप्रदायाला येऊन मिळाले.

भारतातील आर्थिक परिस्थिती जहालवादाचा फैलाव होण्यास कारणीभूत ठरली. ब्रिटिशाच्या राजवटीत भारतात दारिद्रय वृद्धिगत होते गेले. ब्रिटिश राजवटीद्वारे भारताचे पद्धतशीर शोषण होत गेले, येथील भांडवल, साधन सामूग्री व खनिज संपत्ती यांची लूट होत गेली, परिणामत: भारतात दारिद्रय वाढत गेले. दादाभाई नौरोजी आणि आरासी दत्त यांनी याची कल्पना ब्रिटिश राज्यकर्त्यांना आणून दिली परंतु ब्रिटिश राजवटीने त्याकडे दूर्लक्ष केले. परिणामत: ब्रिटिश राजवटी विरुद्धचा असंतोष जहालवादी चळवळीच्या रूपाने उफाळून वर आला. बेकार, गरीब शेतकरी व असंतुष्ट सुशिक्षित यांनी भारतातील असंतोषाला संघटित जहालवादी चळवळीत रुपान्तरित केले.

ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतावर दुष्काळ आणि साथीचे रोग ही दोन नैसर्गिक संकटे निर्माण झाली. या दोन्ही संकटाना ब्रिटिश राजवटीने प्रामाणिकपणे तोंड दिले नाही. परिणामत: हिंदुस्थानी लोकांना अनेक हालआपेष्टांना तोंड द्यावे लागले. परकीय राजवट ही कल्याणकारी नसते याची खात्री लोकांना पटली. विशेषत: १८७६ ते १९०० च्या काळात भारतातील बऱ्याच ठिकाणी दुष्काळ पडला. त्यात बहुसंख्य लोक बळी पडले. परंतु ब्रिटिश शासनाने दुष्काळाच्या काळात शासनावरील व ब्रिटिश अधिकाऱ्याच्या चैनीवरील खर्च कमी केला

नाही. त्याचप्रमाणे प्लगच्या साथीचा उद्रेक झाल्यानंतर आमानुष्यपणे परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न ब्रिटिश शासनाधिकाऱ्यांनी केला. त्याचा परिणाम असा झाला की, ब्रिटिश शासनाविरुद्ध लोकमत गेले. या लोकमताला संघटित करणे जहालवादी नेत्यांना सहज शक्य झाले.

परकीय देशात विशेषत: इंग्लंड व अफ्रिकेत भारतीयांना वाईट वागणूक दिली जात असें. ही वाईट वागणूक ब्रिटिश लोकाकडून मिळत असें. त्या संबंधीच्या बातम्या भारतात आल्यानंतर साहजिकच भारतीयांचा ब्रिटिशांच्या न्याय प्रियतेवरील विश्वास उडू लागला व भारतातले लोक ब्रिटिश राज्यकर्त्याविरुद्ध असंतोष व्यक्त करू लागले. ब्रिटिशाच्या जुलूम जबरदस्तीमुळे ब्रिटिश विरोधी प्रतिक्रिया उफाळून वर आली.

जहालवादाच्या उदयाची कारणे –

कर्झनच्या जूलमी राज्यकारभाराला भारतीय लोक कंटाळले. इंग्रज लोकच भारतावर राज्य करण्यास पात्र आहेत व परमेश्वराने त्यांना येथे पाठविले आहे अशी विचारसरणी कर्झन यांनी येथे दृढमूल करण्याचा प्रयत्न केला. कर्झनच्या काळात ब्रिटिश साम्राज्याचे हात बळकट करण्यासाठी काही कायदे संमत झाले. कलकत्ता कार्पोरेशन ॲक्ट ऑफ १८८९ दि इंडियन युनिव्हर्सिटी ॲक्ट ऑफ १९०४ या कायद्यामुळे शासनाचे विद्यापीठ व स्थानिक संस्थावर नियंत्रण वाढले त्यामुळे भारतीय लोकात असंतोष पसरला. कर्झनच्या काळातच म्हणजे १९०५ मध्ये बंगालची फाळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाला विरोध करण्यासाठी लोक संघटित झाले. या सर्व प्रश्नावर जहालवाद्यांनी लोकांना आपल्याकडे खेचले व जहालवादी नेत्यांचे नेतृत्व अधिक लोकप्रिय होत गेले.

जहालवाद्यांनी भारतीय जनतेसमोर एक ऐतिहासिक सत्य मांडले. त्यांच्या मते अमेरिका, फ्रान्स, इटली व जर्मनी येथील स्वातंत्र्य संविधानिक आंदोलनाद्वारे नव्हे तर क्रांतीतून अस्तित्वात आले आहे. क्रांती करून परकीय राजवटीविरूद्ध स्वातंत्र्य मिळविता येईल व परकीय राजवट नष्ट करता येईल अशी विचारसरणी जहालवाद्यांनी भारतीय लोकांसमोर ठेवली. या विचारसरणीतील क्रांतीवादाचे आकर्षण लोकांना

वाटले व बहुसंख्य लोकांची सहानुभूती जहालवादी पंथाकडे वळली. विशेषत: बाळ गंगाधर टिळक ह्यांनी ब्रिटिश शासनाविरूद्ध लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न केला व स्वराज्याचे ध्येय जनतेसमोर स्पष्टपणे मांडले.

जहालवाद्यांना बहिष्कार, स्वदेशी चळवळ व असहकार चळवळ आदी तंत्र वापरण्यासाठी अनुकूल परिस्थिती लाभली. ब्रिटिश राजवटी-विरूद्ध असंतोषाची लाट उसळली असतानाच जहालवाद्यांनी बहिष्कार स्वदेशी व असहकार चळवळीचे तंत्र अवलंबले त्यामुळे जनमताचे पाठबळ जहालवाद्याना सहज प्राप्त होऊ शकले. जहालवादी चळवळ बंगाल, महाराष्ट्र, पंजाब येथे आकारास आली व तिचा प्रसार सर्वत्र होऊ लागला.

आर्य समाज : जहालवादी विचारसरणी –

आर्य समाजाची स्वातंत्र्यपूर्व काळातील राष्ट्रवादी भूमिका जहाल पंथाच्या नेत्याशी जुळणारी अशी होती. अर्थात आर्य समाजा-मध्येच विविध विचारप्रवाहाचे प्रतिनिधित्व करणारे नेते होते. शासनावर टीका करणारे जहाल नेते, परकीय शासनाविरूद्ध सशस्त्र लढा देऊ इच्छिणारे क्रांतीवादी नेते व प्रत्यक्ष दहशतवादी कार्यात स्वत: झोकून देणारे व नंतर हुतात्मा ठरलेले आर्य समाजी कार्यकर्ते विविध राजकीय विचारप्रवाहाचे प्रतिनिधित्व करतात. आर्य समाजातील जहाल मतवादी, क्रांतीकारक विचाराचे पुरस्कर्ते व प्रत्यक्ष परकीय शासनाविरूद्धच्या कट कारस्थानात सहभागी झालेले दहशतवादी आर्य समाजाच्या स्वातंत्र्यपूर्व राजकारणाचे विविध पैलू दर्शवितात. लाला लजपतराय व श्रद्धानंद ह्या नेत्याचा समावेश जहाल पंथात करावा लागेल. त्यांनी राष्ट्रीय आंदोलनात सक्रीय भाग घेतला. या नेत्यापेक्षा राष्ट्रीय आंदोलनात भिन्न स्वरूपाची भूमिका वठविणारे शामजी कृष्ण वर्मा, भाई परमानंद मदनलाल धिंग्रा सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करणारे होते. सारांश, आर्य समाजाची राष्ट्रीय आंदोलनातील भूमिका सर्व-सामान्यपणे जहालवाद्याशी जुळणारी होती. प्रसंगी आर्य समाजातील क्रांतिवादी नेत्यांचे दहशतवादी संप्रदायाशी अतुट नाते होते. परकीय राजवटीला कडवा विरोध करणारे जहालमतवादी नेते व परकीय

राजवटीविरूद्ध सशस्त्र क्रांतिसाठी प्रयत्न करणारे क्रांतीवीर एका नव्याच राजकीय विचारप्रवाहाचे प्रतिनिधीत्व करतात. परकीय राजवटीला विरोध स्वातंत्र्याचो आकांक्षा या दोन प्रेरणा मात्र आर्य समाजाच्या जहाल राष्ट्रवादी स्वरुप स्पष्ट करतात. आर्य समाजातील हुतात्म्यांनी परकीय राजवटीच्या अत्याचाराविरूद्ध दिलेला संघर्ष हे एक ऐतिहासिक सत्य आहे. परकीय राजवटीला विरोध करताना विविध आर्य समाजी नेत्यांनी वापरलेले तंत्र भिन्न असेल पण परकीय राजवटीला उलथून पाडून राष्ट्रीय स्वातंत्र्य प्राप्त करण्याचे त्यांचे ध्येय एकच होते.

नि:शस्त्र प्रतिकार –

लोकमान्य टिळकाप्रमाणेच अरविंद घोष हयांनी नि:शस्त्र प्रतिकाराचा पुरस्कार केला. त्यांच्या मते साम्राज्यवादी देशाच्या गुलामगिरीत खितपत पडलेल्या वसाहतीतील अंकित प्रजेला नि:शस्त्र प्रतिकाराचा मार्ग अवलंबणेच योग्य ठरते. अर्थात अरविंद घोष हे विध्वंसक आणि क्रांतिकारक मार्गाचाही पुरस्कार करीत. त्यांच्या मते परकीय शासनाला खिळखिळे करणे व शासनकर्त्याचे मनोधैर्य खचविणे या दोन उद्दिष्टासाठी सक्रीय आणि प्रसंगी नि:शस्त्र प्रतिकाराचे शस्त्र प्रभावीपणे वापरता येते. ते म्हणत की, जेथे परकीय शासनाचे प्रशासन जनतेच्या स्वेच्छाधिष्टित मदतीवर व मुक संमतीवर आधारलेले असते. तेथे नि:शस्त्र प्रतिकाराचे साधन अधिक अनुरुप व योग्य ठरते. कारण जनतेने मदत करण्याचे नाकारल्यास असे प्रशासन सहजगत्या कोलमडून पडते. ब्रिटिशांच्या व्यापाराला अथवा अधिकाऱ्यांच्या कार्याला मदत देण्यास नकार दिल्यास ब्रिटिशांना राज्यकारभार करणे अशक्य होईल. त्याचप्रमाणे त्यांना भारतीयांचे शोषण करता येणार नाही. नि:शस्त्र प्रतिकाराचे तत्व त्यांनी पुढील शब्दात सांगितले आहे.

" The first principle of passive resistance, therefore which the new school have placed in the fore front of their programme, is to make administration under present conditions impossible by organized refusal to do anything which shall help either

British commerce in the exploitation of the country or British officialdom in the administration of it – unless and until the conditions are changed in the manner and to the extent demanded by the people."

निःशस्त्र प्रतिकाराच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून परकीय मालावर बहिष्कार टाकण्याचा सल्ला अरविंद घोष ह्यांनी भारतीय जनतेला दिला. कारण भारताला शोषणापासून वाचावयाचे असेल तर ब्रिटिशांचा शोषणावर आधारलेला व्यापार थांबवला पाहिजे. ब्रिटिश राज्यकर्त्यांचे येथील प्रमुख उद्दिष्ट म्हणजे येथील संपत्ती आपल्या देशात नेणे व भारतीय लोकांचे शोषण करून आपली आर्थिक प्रगती करून घेणे. ब्रिटिशांच्या आर्थिक साम्राज्यवादाला शह द्यावयाचा असेल तर भारतीयांनी राष्ट्रप्रेमाने प्रेरित होऊन ब्रिटिश वस्तुवर बहिष्कार टाकावा व राष्ट्र भक्तीने स्वदेशी मालाची खरेदी करावी हाच त्यांचा राष्ट्रधर्म होय. केवळ संघटित व प्रभावी बहिष्काराचे तंत्र वापरुनच भारतीय लोक आपल्या राष्ट्राचे शोषण थांबवू शकतील. ब्रिटिशांनी येथील उद्योगधंद्याच्या विकासाला खीळ घातली व दुष्काळापासून जनतेचे रक्षण करण्याचे कर्तव्य पार पाडले नाही. म्हणून ब्रिटिश राज्यकारभाराला प्रतिकार करणे योग्य ठरते. बहिष्काराचे शस्त्र वापरून एका बाजूने ब्रिटिश साम्राज्याला हादरा देता येईल व दुसऱ्या बाजूने स्वदेशी मालाला उत्तेजन देऊन राष्ट्रीय उद्योगधंद्याचा विकास घडवून परकीय शोषणातून मुक्त होता येईल. बहिष्काराचें स्वरुप त्यानी पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे ते म्हणतात

" We are dissatisfied with the fiscal and economic conditions of British rule in India, with foreign exploitation of the country, the continual bleeding of its resources, the chronic famine and rapid impoverishment which result, the refusal of the government to protect the people and their industries. Accordingly we refuse to help the process of exploitation and impoverishment in our capacity

as consumers, we refuse hence forth to purchase foreign and especially British goods or to condone their purchase by others. By an organized and relentless boycott of British goods, we propose to render the further exploitation of the country impossible."

अरविंद घोष यांची राजकीय विचारसरणी जहालवाद व दहशतवाद यांच्या सिमारेषेवर रेंगाळताना आढळते. अर्थात अरविंद घोष यांनी उघडपणे निःशस्त्र प्रतिकाराचा पुरस्कार केला. परंतु दहशतवाद आणि लष्करी बंड यांना त्यांचा नैतिक विरोध नव्हता. परकीय गुलामगिरीच्या जोखडातून सुटण्यासाठी हिंसक व दहशतीचे मार्ग अवलंबणे अपरिहार्य ठरते असे त्यांनी सूचित केले. अर्थात त्यांनी शक्तीचा वापरच केला पाहिजे असा आग्रह नेहमी धरलेला नाही. म्हणूनच त्यानी निःशस्त्र प्रतिकाराचा राजकीय कृतीचा मार्ग स्पष्ट केला.

१) आर्थिक बहिष्कार व स्वदेश चळवळ,
२) शिक्षण संस्थावर बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण,
३) न्याय मंडळावर बहिष्कार आणि राष्ट्रीय लवाद,
४) कार्यकारणीवर बहिष्कार आणि राष्ट्रीय संघटन.
५) सामाजिक बहिष्कार

दक्षिण अफ्रिकेत आंदोलनातील वादळी आंदोलक म्हणून भूमिका बजावल्यानंतर महात्मा गांधी १९१५ मध्ये भारतात परतले व त्यानंतर आंदोलनाच्या राजकारणातील गांधी युग अथवा सत्ताग्रह युग सुरू झाले. महात्मा गांधीनी भारतीय परंपरेला व भारतीय लोकांच्या धार्मिक मनोवृत्तीला साजेसे असे सर्व व्याप्ती आंदोलन येथे सुरु केले. त्यांनी अफ्रिकेत उभारलेल्या आंदोलनाचे संरक्षक स्वरुप नैतिक व आध्यात्मिक शक्तीचे दर्शन घडविते. त्यांच्या आंदोलनातील हे नैतिक व आध्यात्मिक सामर्थ्य भारतीय परंपरेतील मूलभूत प्रवृत्तीशी जुळणारे असल्यानें त्याच्या राजकीय विचाराना व तंत्राना येथे जनमताचा पाठिंबा मिळत गेला. त्यांनी वापरलेल्या निःशस्त्र प्रतिकाराच्या शस्त्राचे स्वरुप श्री. गोखले यांनी १९०९ मध्यें स्पष्ट केले.

It is essentially defensive in its nature and it fights with moral and spiritual weapons. A passive resister resist tyranny by undergoing suffering in his own person. He pits soul force against brute force, he pits the divine in man against the brute in man, he pits suffering against oppression, pits conscience against might, he pits faith against injustice, right against wrong. "

निःशस्त्र प्रतिकाराचे साधन सर्वत्र व सर्वांना उपयुक्त ठरेल असे नाही. विशेषतः पंजाब व बंगाल येथील क्रांतीकारक व उग्र मनोवृत्तीच्या लोकांना निःशस्त्र प्रतिकाराचे आदर्श शस्त्र कितपत उपयुक्त ठरेल या संबंधी लाहोर येथील वक्त्यांनी शंका व्यक्त केली होती कारण नैतिक व आध्यात्मिक सामर्थ्याशिवाय निःशस्त्र प्रतिकाराचा मार्ग अवलंबणे अवघड आहे सर्वाजवळ ते असेलच असे नाही.

Passive resistance was not mainly a matter of undergoing physical suffering, but it was a question of soul force, and for that reason it might not be easiest thing to lay down their lives in just cause, but to bear every humaliation to undergo every indignity, to put up with every suffering, not to lift the little finger and not to let the heart feel the slightest resentment, that was a task indeed and required that the heart should undergo a transformation. For the other provinces, it was easy to resort to passive resistance, but for the Punjab it was far more difficult.

(Tribune, issue of 13th April 1919)

लोकमान्य टिळक –

१८९६ नंतरच महाराष्ट्रात जहालपंथीय व मवाळपंथीय नेत्याचे दोन तट पडले, ब्रिटिश शासनाकडे भारतीय लोकांच्या मागण्यासाठी

रदबदली करणे, ब्रिटिशाना आवाहन करणे, शासनाकडे अर्जविनंत्या करणे आदी मवाळपंथीय नेत्याचे मार्ग व पद्धती यावर महाराष्ट्रात टीका सुरू झाली. त्यानंतर २ जानेवारी १९०७ रोजी टिळकांनी आपल्या नव्या जहाल पक्षाची भूमिका स्पष्ट केली. त्यावेळी जहाल व मवाळ संज्ञा राजकारणात कशा सापेक्ष ठरतात याचें टिळकांनी स्पष्टीकरण केले. ते म्हणत आजचे ' जहाल ' उद्याचे मवाळ ठरतील. मवाळपंथीय नेत्यापैकी दादाभाई नौरोजी यांचा ब्रिटिश राजवटीबद्दल भ्रमनिरास झाला. तसेच लाला लजपत रॉय हेही ब्रिटिश शासनाच्या धोरणामुळे निराश झाले होते. अशा वेळी लोकमान्य टिळकांनी निःशस्त्र प्रतिकाराद्वारे ' स्वराज्य ' मिळविण्याचे ध्येय लोकासमोर ठेवले ' स्वयंशासनाचे ध्येय स्पष्ट करताना टिळक म्हणाले. :–

महत्वाचा मुद्दा म्हणजे सर्व नियंत्रण आपल्या हाती असले पाहिजे. . . . . स्वयंशासन हे आपले ध्येय आहे. आम्हाला संपूर्ण शासन यंत्रणेवर आमचे नियंत्रण पाहिजे. आम्हाला केवळ लेखनिय व्हावयाचे नाही. विद्यमान स्थितीत आपण केवळ लेखनिय (क्लार्क) आहोत आणि परकीय शासनाकडून आपल्यावर जी दडपशाही केली जाते त्या दडपशाहीचेच आपण स्वतः साधन बनलो आहोत

निःशस्त्र प्रतिकार –

लोकमान्य टिळकांनी बहिष्कार व असहार याचे निःशस्त्र प्रतिकाराच्या राजकीय तंत्राशी असलेले संबंध स्पष्ट केले. त्याच प्रमाणे स्वराज्यात स्वसाहाय्य किंवा स्वावलंबन महत्वाचे आहे हा मुद्दा स्पष्ट केला. स्वदेशी चळवळ व बहिष्कार मोहीम लोकात स्वराज्यासाठी आवश्यक असलेले स्वावलंबन निर्माण करु शकेल असा टिळकांना विश्वास वाटत होता. बहिष्कार म्हणजे केवळ परकीय मालावर बहिष्कार एवढाच अर्थ टिळकांना अभिप्रेत नव्हता. बहिष्कार हे निःशस्त्र प्रतिकाराच्या पद्धतीत महत्वाचे गतिशील असे तंत्र आहे असे त्यांचे म्हणणें होते.

लोकमान्य टिळकानी निःशस्त्र प्रतिकाराचे विश्लेषण खालील प्रमाणे केले आहे.

१) आपले भवितव्य आपल्या हातात आहे आपण स्वतंत्र व्हावयाचे ठरविल्यास स्वतंत्र होऊ शकू.

२) अनेकांना शस्त्र हाती घेणे अथवा सक्रीय प्रतिकार करणें आवडत नाही. ते परकीय शासनाला मदत करण्याऐवजी असहकार पुकारू शकतात. परकीय शासनाला साहाय्य करण्यास नकार देऊ शकतात.

३) महसूल जमा करणे, शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे, सीमेवर आपल्या रक्ताने व पैशाने लढणे, न्यायादानाचे कार्य करणे या कामी आपण परकीय शासनाला सहाय्य करता कामा नये. आपल्या मागण्या ब्रिटिश शासनाने फेटाळून लावल्यास ब्रिटिश शासनाशी उपरोक्त पद्धतीने संघर्ष द्यावयास आपण तयार झालो तर ब्रिटिश शासन आपल्या मागण्या फेटाळून लावण्याचे धाडस करु शकणार नाही. सारांश ब्रिटिश शासनावर बहिष्कार टाकून आपण त्या शासनास कोणत्याही प्रकारचे साहाय्य करण्यास नकार दिल्यास ब्रिटिश शासनाला नमवता येईल व ब्रिटिश शासनाविरुद्ध आपले हात बळकट होतील. त्यासाठी बहिष्कार तंत्रासारखे राजकीय शस्त्र उपयुक्त ठरेल.

टिळकांच्या मते निःशस्त्र प्रतिकार हे राजकीय शस्त्र आहे. निःशस्त्र प्रतिकारात राजकीय विरोधाचे निरनिराळे स्वरुप व्यक्त होते. बहिष्कार, असहकार आदी मार्ग निःशस्त्र प्रतिकारातील विरोधाचीच रुपे होत असे जहाल पंथातील विचारवंतानी स्पष्ट केले आहे. परंतु महात्मा गांधीनी परकीय राजवटीविरूद्ध व अन्यायाविरुद्ध सत्ताग्रहाचे तंत्र आकारास आणले. गांधीजीचे सविनय कायदे भंगात आत्मिक शक्तीचा व नैतिक शक्तीचा वापर केला जात असे गांधी मानत. विरोधामध्ये विध्वंसकतेचा भाग असता कामा नये असे महात्मा गांधीचे मत होते कारण विध्वंसक मार्ग हे अनैतिक व नीतिबाह्य आहेत असे गांधीजीचे मत होते. सारांश, लोकमान्य टिळक आणि अरविंद घोष यांनी निःशस्त्र प्रतिकाराच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक बाजूचा विचार केला. महात्मा गांधीनी प्रतिकाराच्या सिद्धांताची नैतिक व आध्यात्मिक बाजू स्पष्ट केली. परकीय राजवटीला विरोध अहिंसक, शांततापूर्ण मार्गानेच केला पाहिजे असे महात्मा गांधीचे म्हणणे होते. तर अरविंद घोष परकीय राजवटीविरुद्ध स्वातंत्र्य मिळविताना कोणताच मार्ग उपलब्ध नसेल तर विध्वंसक मार्गाने स्वातंत्र्य मिळविण्याचा

राष्ट्राचा हक्क आहे. तेथे नैतिक दृष्टीकोनाचा प्रश्न योग्य ठरतो.

असहकार चळवळ –

असहकार चळवळ भारतीय परंपरेला नवीन नाही. फार प्राचीन काळापासून असहकार तंत्राचा वा पद्धतीचा वापर भारतीयांनी केला आहे. शत्रु राष्ट्राच्या राजवटीशी अथवा शत्रुवत राजाशी असहकार पुकारणे हे भारतीय लोकाचें एक पवित्र कर्तव्य आहे असे भारतीय विचारप्रणालीतून सूचित करण्यात आलेले आहे. विशेषत: जे शासन जनतेच्या तक्रारी व अडचणी जाणून घेत नाही अशा शासनाशी असहकार करणे नैतिकदृष्टचा समर्थनीय असे कर्तव्य ठरते. हे कर्तव्य पार पाडण्याचे आवाहन स्वातंत्र्य लढ्यातील भारतीय नेत्यांनी जनतेला केले. विशेषत: १९०५ नंतर असहकार चळवळ हळूहळू सर्वत्र फोफावली. मवाळ पंथातील नेत्यांनी संविधानिक आंदोलनात शांततापूर्ण व विधायक असहकाराचे तत्व हळूहळू, काही अंशी नाराजीने, वस्तुस्थितीचा संदर्भ लक्षात घेऊन विचारात घेतले. जहाल पंथातील नेत्यांनी तर असहकार चळवळीला जोम प्राप्त करून दिला. महात्मा गांधीनी सत्य अहिंसाच्या तात्विक चौकटीत असहकारितेच्या चळवळीचा कार्यक्रम आखून तो कार्यवाहित आणला. दक्षिण अफ्रिकेतून परतल्यानंतर महात्मा गांधीनी सत्याग्रहाच्या तंत्राद्वारे असहकार चळवळ येथे संघटित केली व तिला नि:शस्त्र चळवळीचे रुप प्राप्त करुन दिले.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात असहकाराचे तंत्र खिलाफत चळवळीत व नंतर गांधी पर्वात प्रभावीपणे वापरण्यात आले. परकीय शासनाला कोंडीत पकडण्यासाठी, शासन कर्त्यावर नैतिक व अन्य प्रकारचे दडपण आणण्यासाठी व शासकीय यंत्रणा कमजोर करण्यासाठी असहकार चळवळीचा उपयोग करण्यात आला. या असहकार चळवळीत खालील उपाय योजना आखण्यात आल्या.

१) सर्व सन्मानाची पदे व पदव्या यांचा त्याग करणे.

२) कायदे कौन्सिलच्या सदस्यत्वाचा राजीनामा देणे.

३) खाजगी संस्थातील व शासनाचे अनुदान मिळणाऱ्या संस्थातून बाहेर पडणे.

४) शासनातील अधिकारपदाचा राजीनामा देणे.

५) लष्करात भरती न होणें अथवा परकीय लष्करातून बाहेर पडणे.

६) कर देण्यास नकार देणे.

७) शासनाला अथवा शासकीय सदस्याना ऐच्छिक आर्थिक साहाय्य करण्यास नकार देणे.

८) कोर्टात शासनाच्या बाजूने वकील म्हणून काम करण्यास नकार देणे.

९) शासकीय कार्याला सहकार्य न देणे.

१०) शासनासंबंधीच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास नकार देणे.

स्वदेशी चळवळ –

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात स्वदेशी चळवळीला आर्थिक आशय आहे तसेच राजकीय संदर्भ आहे. वसाहतीच्या अर्थव्यवस्थेवर स्वदेशी चळवळीने आघात केले व राष्ट्रीय आस्मिता जागृत केली. मदन मोहन मालवीय हयानी स्वदेशी चळवळीची व्याख्या केली आहे ते म्हणतात. स्वदेशी म्हणजे काय ? " स्वदेशी चळवळ ही अशी चळवळ आहे की जी आपल्या राष्ट्रात तयार झालेल्या वस्तुचा वापर करण्यास प्रोत्साहन देते आणि आपल्या राष्ट्राच्या उद्योगधंद्याची वाढ करण्यास प्रेरित करते " ती कां निर्माण होते ? ती आपल्या गरिबीतून उदयास येते. औद्योगिकदृष्टया दुर्बल व हीन स्थान आपल्याला लाभले आहे. त्याचा परिणाम म्हणून स्वदेशी चळवळ उदयास आली आहे.

स्वदेशी चळवळीची वैशिष्टये.

१) देशात निर्माण झालेल्या पूर्णपणें स्वदेशी वस्तूंचा वापर करणे.

२) देशातील उद्योगधंद्याना प्रोत्साहन देणे.

३) परकीय मालावर बहिष्कार घालणें.

४) ग्रामीण भागात ग्रामोद्योग व खादी उद्योग काढणे.

५) गरीब समाजात शोषणयुक्त अर्थव्यवस्था प्रस्थापित करणे.

स्वदेशी चळवळीतून यांत्रिकीकरणाला विरोध –

महात्मा गांधीनी मोठया प्रमाणावर यांत्रिकीकरणाला जो विरोध केला ती स्वदेशी चळवळीची एक प्रतिक्रिया होती. ब्रिटिश

राजवटीच्या काळात भारतात हस्तोद्योग व ग्रामोद्योग यांना भारतीय परंपरागत अर्थव्यवस्थेत महत्वाचे स्थान होते. ब्रिटिशानी यंत्राद्वारे निर्माण केलेल्या वस्तु हस्तोद्योगातील वस्तुपेक्षा सरस व मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होऊ शकत. अर्थात परकीय राजवटीच्या अर्थव्यवस्थेतील यांत्रिकीकरण भारतातील हस्तोद्योग व ग्रामोद्योग हचांना मारक ठरल्या. या यांत्रिकरणामुळे मागासलेल्या भारतात ग्रामीण भागात बेकारी निर्माण होऊन आर्थिकदृष्टचा भारतीय समाज परकीय राजवटींवर अधिकाधिक अवलंबून राहणार. परिणामतः आर्थिक परावलंबित्व स्वातंत्र्याच्या प्रेरणेला मारक ठरते. म्हणूनच स्वदेशातून स्वयंपूर्णता हे तत्व उदयास आले. परकीय राजवटीची आर्थिकदृष्टचा कोंडी करण्यासाठी स्वदेशी चळवळ उपयुक्त ठरली. ब्रिटिश राजवटीच्या विरूद्ध निषेध म्हणून तिचा राजकीयदृष्टचा उपयोग करून घेण्यात आला. ब्रिटिशाच्या वसाहतीच्या राज्यकारभारातील भांडवलशाही प्रेरणावर स्वदेशी चळवळीने आघात केले. तसेच भारतीय समाजातील स्वतःची भावना जागृत करून राष्ट्रीय आस्मिता प्रभावित केली. अशा प्रकारे स्वदेशी चळवळ भारतीयाच्या आर्थिक हिताचे रक्षण करणारे साधन व परकीय राजवटीला अडचणीत आणणारे राजकीय शस्त्र म्हणून उपयुक्त ठरले.



३. धर्मसापेक्ष विचारप्रणाली

भारतीय विचारप्रणालीत धर्मसापेक्ष व धर्मनिरपेक्ष तत्वप्रणालीला स्थान प्राप्त झाले आहें काही विचारवंत तर काही क्षेत्रात धर्मसापेक्ष विचार मांडतात तर काही क्षेत्रात धर्मनिरपेक्ष भूमिका स्वीकारतात. काही विचारवंताच्या विचारप्रणालीत धर्मसापेक्ष व धर्मनिरपेक्ष तत्व-प्रणालीची सरमिसळ झाल्याचे दिसून येते. राजाराम मोहनरॉय, महर्षि दयानंद सरस्वती, अरविंद घोष, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी आदी विचारवंतानी धार्मिक विचारसरणी व राजकीय विचारसरणी ह्याची एकत्र गुंफण करण्याचा प्रयत्न केला. भारतीय पुनरुज्जीवनाचे प्रणेते म्हणून त्यांनी प्राचीन धर्म ग्रंथातील तात्विक प्रेरणा आणि प्रवृत्ती ह्याना आपल्या विचारसरणीत सामावून घेतले. परंतु भारतीय विचार-वंत राजनीतिज्ञानी धर्माचे क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्र ह्याच्यातील सीमा रेषा ओळखली. म्हणून मुस्लीम विचार विचारवंताप्रमाणे धर्माचे राजकीयकरण होण्याचा धोका निर्माण होऊ शकला नाही. भारतीय पुनरुज्जीवनवादाचे आद्यप्रणेते म्हणून महर्षि दयानंदानी आदर्श वैदिक व्यवस्थेला अंतिम व सर्वाधिकारी व्यवस्था मानली व तिचे पुनरुज्जीवन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांनी धार्मिक नीतिमत्ता आणि राजकीय तत्वज्ञान ह्याचा संगम घडवून आणण्याचा स्त्युत्य प्रयत्न केला त्यामुळे धार्मिक नीतिमत्ता व राजकीय तत्वज्ञान ह्याची हानी झाली नाही या उलट दोघांचा फायदाच झाला. परंतु महात्मा गांधीनी धर्म व

जकारण याना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला त्यामुळे राजकारणाला क्षती पोहचली. राजकारणात धर्म आणल्यामुळे राजकीय गैरसमज निर्माण झाले व त्याचा फायदा भारतातील फुटीर प्रवृत्तीना मिळाला. तसेच त्यामुळे निधर्मी किंवा धर्मनिरपेक्ष विचारसरणीची हानी झाली. धर्म तत्वाना, धर्मातील पूर्वग्रहाना व धार्मिक भावनांना सार्वजनिक क्षेत्रात स्थान दिल्यास त्यामुळे राजकारणाचे आध्यात्मिकरण होणे तर दूरच राहील परंतु त्याचे राजकीय भांडवल होण्याची शक्यता वाढते. राजकारणात धर्मांच्या नांवाखाली दांभिकता वाढते व त्यामुळे राजकारणाचे नव्हे तर धर्माचे नुकसान होते. म्हणूनच ना. गोखले, मानवेन्द्रनाथ रॉय आणि पंडित नेहरु ह्यांनी धर्मनिरपेक्ष व बुद्धिवादी विचारसरणी स्वीकारली व धर्म व राजकारण ह्याची परस्परापासून फारकत केली. पाश्चिमात्य तत्वज्ञानातील धर्मनिरपेक्ष व बुद्धिवादी तत्वप्रणालीद्वारे भारतीय राष्ट्रवादातील एकतेच्या शक्ती वृद्धिगत करण्याचा प्रयत्न केला.

आधुनिक भारताच्या स्वातंत्र्यपूर्व काळात सार्वजनिक जीवनावर प्रभाव टाकण्याचे सामर्थ्य असलेल्या दोन महान व्यक्ती होत्या. एकोणिसाव्या शतकातील उत्तरार्धात स्वामी दयानंदानी भारतीय समाजाच्या सार्वजनिक जीवनावर प्रभूत्व गाजविले आणि विसाव्या शतकातील पूर्वार्धात महात्मा गांधीकडे भारतीय समाजाच्या सार्वजनिक जीवनाचे नेतृत्व आले. दोन्ही तत्वज्ञ नेते होते. स्वामी दयानंद मूळातच धार्मिक मनोवृत्ती लाभलेले ऋषि होते तसेच महात्मा गांधीही धार्मिक मनोवृत्तीचे राजनीतिज्ञ होते. स्वामी दयानंदानी धर्माला राजकारणाची जोड दिली तर महात्मा गांधीनी राजकारणाला धर्माची जोड दिली.

धार्मिक प्रेरणेचा अभाव –

स्वामी दयानंदाना आणि महात्मा गांधीना कार्य प्रवृत्त करणारी जर कोणती प्रेरक शक्ती असेल तर ती धर्म होय. महात्मागांधीनी हिन्दु, ख्रिश्चन, बौद्ध, जैन आदि धर्मापासून प्रेरणा घेऊन आपले कार्य सुरू केले. महात्मा गांधीनी सर्व धर्माच्या ठायी समभाव ठेवला व सर्व धर्मातील श्रेष्ठतम नैतिक तत्वज्ञानाचा व तत्वाचा समन्वय साधणारी धार्मिकतेची विचारसरणी स्वीकारली. स्वामी दयानंदानी वैदिक धर्माचा

पुरस्कार केला व समर्थन केले. अन्य धर्मसंप्रदायातील धर्मगुरुशी व धर्म प्रसारकाशी चर्चा करुन धर्म शास्त्रातील बुद्धिवादी प्रवृत्तीचा प्रभाव वाढविला. स्वामी दयानंद सरस्वतीच्या विविध कार्याच्या मागे धार्मिक प्रेरणा होती हे त्यांचा आचार विचाराने स्पष्ट होते. त्याचप्रमाणे गांधीजीनीही धर्माची महती वर्णन केली आहे. आपण स्वत: धार्मिक मनोवृत्तीचे राजनीतिज्ञ आहोत याची प्रामाणिक कबुली त्यांनी वेळोवेळी दिली.

महात्मा गांधी म्हणतात " माझा ज्या अनेक धार्मिक व्यक्तीशी संबंध आला. त्यापैकी कित्येकजण छूपे राजनीतिज्ञ होते. परंतु मी एका राजनीतिज्ञाचा वेश पांघरला आहे पण हृदयाने मी धार्मिक व्यक्ती आहे. महात्मा गांधीनी धर्माचा आपल्यावरील प्रभावाची कबुली पुढील शब्दात दिली. ते म्हणतात " माझ्या सार्वजनिक जीवनाच्या प्रारंभापासून तो आज पावेतो मी जे काही सांगितले आहे आणि केंले आहे त्याच्या मागे एक धार्मिक चेतना व एक धार्मिक प्रेरणा आहे."

संप्रदायवादी धर्माला विरोध –

महात्मा गांधीजीनी संप्रदायवादी धर्माचा स्वीकार केलेला नाही. धर्म सत्तेला व धर्मांध वृत्तीला त्यानी महत्वही दिले नाही. धर्मभेद मूलक संप्रदायवाद फूटीर प्रवृत्तीची जोपासना करतो. म्हणून त्यानी संप्रदायवादी धर्म संघटनाना जवळ केले नाही. सर्व धर्मांतील उदात्त तत्वे एकत्र आणून धार्मिक जीवनात समन्वयवादी विचारप्रणालीला त्यांनी महत्वाचे स्थान दिले. महात्मा गांधीजीनी संप्रदायवादी धर्माला व धर्मभेद मूलक जातीयवादाला विरोध केला तर स्वामी दयानंदानी धर्मांतर्गत संप्रदायवादाला विरोध केला.

हे दोन्ही भारतीय विचारवंत सत्य धर्माचा वैदिक आशय अशा प्रकारे व्यक्त करतात की त्यांचा धर्म हिंदु धर्माच्या व हिंदुस्थानच्या सीमा ओलांडून संपूर्ण मानवी समाजाला व्यापून टाकतो. उदा. महात्मा गांधीजीनी धर्माची पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे. ते म्हणतात "धर्म म्हणजे काय हे मला स्पष्ट केले पाहिजे. सर्व धर्मात मी ज्या धर्माला अधिक महत्व देतो तो हिंदु धर्म नाही. परंतु खरा धर्म जो हिंदु धर्माला आपल्या उदात्त तत्वाने मागे टाकतो जो मानवाच्या स्वभावात परिवर्तन

घडवून आणतो, जो अंतस्थ सत्त्याशी अभेद्य नात्याने बद्ध होतो व जो सदैव शुद्ध स्वरुपात असतो. तो (धर्म) मानवी स्वभावाचे स्थायी तत्व आहे. जो आपल्या पूर्ण रूपाने अभिव्यक्त होण्यासाठी वाटेल ती किंमत देण्यास तयार असतो. आत्मा, जोपर्यंत आपल्या निर्मात्याला जाणून घेऊन निर्माता व स्वतः त्याच्यात तादात्म निर्माण होत नाही तोपर्यंत तो (आत्मा) अस्वस्थ असतो. ''

स्वामी दयानंद सरस्वती आणि म. गांधी यांच्या धार्मिक दृष्टी-कोनात जसे साधर्म्य दिसून येते तसे वैधर्म्य आढळून येते. दोन्ही विचारवंत धर्माशी संबंधीत संप्रदायवादाला विरोध करतात. त्यांच्या मते धर्म हे अत्युच्च्य मूल्य असून ते मानवी जीवनाला मार्गदर्शक ठरू शकेल. स्वामी दयानंदाप्रमाणे म. गांधीनी म्हटले आहे की खरा धर्म मानवतेशी व मानवी मूल्याशी सुसंगत असतो. दोन्ही विचारवंत धर्माला मानवी स्वभावाचे स्थायीतत्व मानतात. सानवी जीवनात धर्माला अनन्यसाधारण महत्व आहे अशी दोन्ही विचारवंताची धारणा आहे. नीतिमत्ता, सदाचार, सत्य–अहिंसा प्रेम याना खऱ्या धर्मात स्थान असले पाहिजे असा आग्रह या दोन्ही विचारवंतानी धरला आहे.

स्वामी दयानंद सरस्वती धर्म प्रसारक होते. विशिष्ट धर्माच्या मूल तत्वाचा जगात प्रसार करण्याचे ध्येय त्यांनी उराशी बाळगले. होते. म्हणून सर्व धर्मात विश्व धर्माची तत्वे अंतर्भूत नाहीत ही गोष्ट स्पष्ट केली. महात्मा गांधी म्हणत की, सर्व धर्मात विश्व धर्माची तत्वे समाविष्ट झालेली आहेत त्यामुळे सर्व धर्म समान आहे. कोणत्याही धर्माचे पालन करून परमेश्वराप्रत जाता येईल. स्वामी दयानंदानी इतर धर्मातील तत्वाचे खंडन मंडन करताना सर्व धर्माना समान मानले नाही. वैदिक धर्मातच त्यांना विश्व धर्माच्या तत्वाचा शोध लागला.

अरविंद घोषप्रणीत ' राष्ट्रवाद ' –

अरविंद घोष हयांनी राष्ट्र व राष्ट्रवाद या दोन्ही संकल्पना धार्मिक आहेत असे सूचविले आहे. राष्ट्रीयत्वाची भावना जर आध्यात्मिक भावना असेल तर राष्ट्रासंबंधीची जाणीव धर्माच्या पवित्र स्वरुपात प्रत्ययास येईल. राष्ट्राला आत्मिक जाणीवेच्या पातळीवर पोचविता येईल. राष्ट्र ही केवळ राजकीय संकल्पना नव्हे, त्याचप्रमाणे राष्ट्र ही

राजकीय कार्यक्रम होऊ शकत नाही. राष्ट्रवादाची व्याख्या करताना ते म्हणतात.

" Nationalism is not a mere political programme, the nationalism is a religion that has come from god, nationalism is a creed which you shall have to live. "

अरविंद घोष यांनीही सरतेशेवटी राष्ट्राची संकल्पना मांडताना धर्मसापेक्ष विचारसरणी मांडली. राष्ट्रवादातील दैवी एकता धर्माचा आशय व्यक्त करणारी आहे. आधुनिक लोकशाही मूल्यावर आधारलेले, विश्व एकतेशी सुसंवाद साधणारे व भवानी भारतीच्या दैवी शक्तीचा अविष्कार करणारे चैतन्यमय राष्ट्राची संकल्पना त्यांनी मांडली. अर्थात अरविंद घोषप्रणीत राष्ट्रवाद व राष्ट्र धर्माची संकल्पना संप्रदायवादापेक्षा आध्यात्मिक पातळीवर जाऊन पोहचणारी आहे. ही राष्ट्रवादाची कल्पना संप्रदायवाद, भौगोलिक सीमा, जाती बंधन या सारख्या संकुचित चौकटीत बसू शकत नाही. ही संकुचित चौकट तोडणारी राष्ट्रवादीची कल्पना विश्व मानवी एकतेचा आशय स्पष्ट करणारी आहे. हिंदु पुनरूज्जीवनाच्या कक्षेतील वैदिक राष्ट्रवादापेक्षा अरविंद घोष प्रणीत राष्ट्रवाद भिन्न स्वरुपाचा आहे. हा राष्ट्रवाद आंतरराष्ट्रीय वादातील मानवी एकतेशी सुसंवाद साधणारा आहे. सारांश –

अरविंदाची राष्ट्रवादाची संकल्पना संकुचित नाही. तिच्यातून आंतरराष्ट्रवादी मानवी एकतेचा आशय व्यक्त होतो. मानवी एकतेसाठी आध्यात्मिक मार्गदर्शनाचे ध्येय या राष्ट्रवादातून स्पष्ट होते असे विचार डॉ. करणसिंग ह्यांनी व्यक्त केले आहे ते म्हणतात.

" It must be added, however, that to his great credit Shri Aurobindo never allowed his nationalism to degenerate into mere chauvinism or narrow revivalism. In fact, as we have seen he looked upon India's emancipation as only an essential vantage point from which she could fulfil her destiny as

spiritual guide of humanity at large- His nationalism thus develops logically into an internationalism that has as its goal the elevated idea of human unity. "

अरविंदाच्या मतें राष्ट्रात दैवी एकतेची केवळ प्रचिती घेण्याची उत्कट आकांक्षा म्हणजे राष्ट्रवाद होय. या राष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय घटक म्हणून व्यक्तींची कार्य जरी विविध व भिन्न असली तरी ते मूळातच व खरोखरच एक असतात व समान असतात. भारताला अशा राष्ट्रवादाचा आदर्श जगापुढे ठेवावयाचा आहे की, जेथे मानवा मानवात, जाती जातीमध्ये, वर्गावर्गात समानता असेल. लोकमान्य टिळकानी म्हटल्याप्रमाणे "सर्वजण भिन्न आहेत परंतु सर्व समान असून एकाच विराट राष्ट्र पुरुषाच्या अंगाचे भाग आहेत. "

अरविंदानी लोकशाही एकतेवर आधारलेल्या राष्ट्राचे चित्र रेखाटताना म्हटलें आहे की " आम्ही एकतंत्री राजवटीला विरोध करतो कारण तेथे राजकारणात समतेचे तत्व डावलले जाते. आम्ही जाती व्यवस्थेच्या आधुनिक विकृत अवस्थेवर आक्षेप घेतो कारण अशा समाजात समानता नसते. आम्ही लोकशाहीत्मक एकतेवर राजकीयदृष्टया राष्ट्राची व सामाजिकदृष्टया समाजाची पुनसंर्घटना करण्याचा आग्रह धरतो. आमचे विरोधक म्हणतात त्याप्रमाणे आमचे एकतेचे तत्व राजकारणापुरते लागू केले जाते. अर्थात जे तत्व राजकारणात लागू झाले आहे. ते अपरिहार्यपणे समाजात प्रकट झाले नाहीं तर आमचे प्रयत्न निष्फळ ठरतील. सारांश, लोकशाही एकतेवर आधारलेल्या राष्ट्रवादाची संकल्पना अरविंद घोष यांनी पुढे मांडली.

अरविंद घोष यांनी आंतरराष्ट्रवादाशी सुसंवाद साधणाऱ्या राष्ट्रवादाची कल्पना मांडतानाच जागतिक संघराज्याची किंवा विश्व राज्याची सूचना पुढे मांडली. ते म्हणतात " जगाची विद्यमान परिस्थिती, विशेषत: श्रेष्ठ कनिष्ठेच्या श्रेणीतील तुच्छता व त्यातून निर्माण होणाऱ्या संभाव संघर्षाचा धोका लक्षात घेता एखाद्या प्रकारच्या जागतिक संघाची आवश्यकता व अपरिहर्यात नाकारता येत नाही. निसर्गाची प्रेरणा, परिस्थितीचा दबाव आणि विद्यमान व भावी काळातील मानवाच्या गरजा यामुळे जागतिक संघ आवश्यक आहे... स्वतंत्र

राष्ट्राचे संघराज्य स्थापन करणे आवश्यक ठरेल. ज्यात सर्व प्रकारची गुलामगीरी व लादलेली विषमता एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राला आपल्या अंकित ठेवणे हे प्रकार नाहीसे होतील. अशा व्यवस्थेत काही राष्ट्राचा नैसर्गिक प्रभाव अधिक राहील परंतु सर्वांना समान दर्जा लाभेल अशा प्रकारच्या राज्यसंघ विश्वराज्याचा घटक असलेल्या राष्ट्राला अधिक स्वातंत्र्य देईल.... अशा प्रकारचे जागतिक संघराज्य अधिक काळ टिकून राहील अथवा ते चिरस्थायी ठरेल.

श्री. अरविंद घोष यांना अभिप्रेत असलेली राष्ट्राची संकल्पना भौतिकवादी राष्ट्राच्या कल्पनेपेक्षा भिन्न आहे. शक्ती रुपात राष्ट्राची कल्पना मांडताना ते म्हणतात " राष्ट्र काय आहे ? आमची मातृभूमी काय आहे ? ती केवळ भूमी नाही, वाग्वविलास नाही किंवा ती कोऱ्या मनाची कल्पना असू शकत नाही ती एक महान शक्ती आहे, कोटी कोटी जनतेच्या विविध शक्तीची ती समष्टी रुप आहे. शक्तीशाली भवानी महिशा मर्दिनी प्रमाणे या तेहतीस कोटी देवाच्या शक्तीस भारताच्या संदर्भात भवानी भारती म्हणता येईल. तीस कोटी जनतेतील व्यक्तीच्या शक्तीमधील ती चेतनमय जिवंत शक्ती आहे

आपल्या पत्नीला लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात, " इतर लोक स्वदेशाला एक जड पदार्थ, एखादे मैदान, शेत, पर्वत नदी आदी समजतात मी मात्र स्वदेशाला आई मानतो, तिची भक्ती करतो, पूजा करतो " एका ठिकाणी अरविंद घोष यांनी म्हटले होते की मी जडवादी नाही जर मी भारताला, ज्यात अनेक आकर्षक लोक राहतात. अशा भौगोलिक रुपात पाहिले असते तर मी आपला मार्ग सोडून या भूभागासाठी इतके कार्य करु शकलो नसतो. राष्ट्राची संकल्पना त्यांनी भक्तिपूर्ण वाणीतून स्पष्ट केली आहे. ते म्हणतात, जसे तुमच्या शरीरात तुमचे मास, त्वचा, हाडे व इतर वस्तू असतात परंतु ज्याना आपण मन व आत्मा यांचे अस्तित्व दिसत नाही परंतु त्याचे अस्तित्व नाकारता येत नाही. त्याच प्रमाणे राष्ट्राच्या भौगोलिक रुपात राष्ट्रात्मा असतो जो दिसत नाही परंतु त्याचे अस्तित्व जाणून घ्यावयाचे असते. ' वंदे मातरम् ' (१६ एप्रील १९०७) मध्ये त्यानी लिहिले होते की जेव्हा मातृभूमी अंतः चक्षुच्या साहाय्याने भूखंड उथळ जलसागराच्या रुपात

2020 नवी दिल्ली
23000

दिसत नाही तेव्हा ती महासुंदरी भगवती व महान मातृशक्तीच्या मनोहारी आणि हृदयस्पर्शी रुपात प्रकट होते अशा मातेच्या पूजेमधील सर्वग्राही भावनेत सर्व तुच्छ भावना नष्ट होऊन जातात. तेव्हाच अशा देशभक्तीचा जन्म होतो की जो चमत्कार करु शकतो पतीत आणि राष्ट्राची रक्षा करु शकतो.

अरविंदानी मातेच्या स्वरुपात भारतभूमीचे दर्शन घडविताना असे दर्शविले आहे की, भारतीयासाठी माता, भारतमाता व जगतजननी या तिन्हीची उपासना करण्यात कोणताही विरोध नाही त्यात फक्त क्रम आहे. ज्याप्रमाणे आपली आई व त्यानंतर सर्व देशाबंधुची मातृ-भूमीची उपासना करतो त्याप्रमाणे जगत्जननीची उपासना केली पाहिजे. शक्तीचा एक भाग प्राप्त करुन पूर्ण समष्टी अशा शक्तीकडे पोहचले पाहिजे परंतु ज्याप्रमाणे आपण भारत जननीची उपासना करताना आपल्या रक्त संबंधीत आईला विसरत नाही त्याच प्रमाणे जगतजननीची उपासना करताना भारतमातेचे विस्मरण होऊ देता काम नये.

पाश्चिमात्य देशात राष्ट्राकडे वस्तूनिष्ठ दृष्टिकोनातून पाहिले जाते. ज्या शासक, प्रजा, समान विचार, राजकीय स्थिती, सीमाचा विस्तार, समान नियम, संस्था, आर्थिक समृद्धी आदी बाह्य गोष्टीला प्राधान्य दिले जाते. या भ्रामक दृष्टीमुळे राष्ट्रकल्पनेत राजनैतिक व आर्थिक उद्देशाना व कार्याना प्राधान्य दिले जाते. वास्तविक पाहता राष्ट्राचा आत्माच या कार्या पाठीमागील प्रेरणा असते. अरविंदाच्या मते राष्ट्राच्या आत्मिक सत्तेचा अस्पष्ट असा अनुभव सामुहिक मनावर नेहमी कार्य करतो. हा राष्ट्रात्मा जटील आहे. त्याचा प्रत्यय राष्ट्र चेतने-च्या रुपाने येतो. आत्मनिष्ठ राष्ट्रीयतेची प्रवृत्ती ही प्रभावी आहे. मुंबई येथे दिलेल्या एका भाषणात ते म्हणतात राष्ट्रीयत्व काय आहे ? राष्ट्रीयत्व केवळ एक राजकीय कार्यक्रम नाही. राष्ट्रीयत्व एक धर्म आहे, राष्ट्रीयत्व एक सिद्धांत आहे ज्या सिद्धांतानुसार आपणाला जगावयाचे आहे, जर तुम्हाला राष्ट्रवादी बनावयाचे असेल तर तुम्हाला राष्ट्रीयतेचा धर्म स्वीकार करण्यात तयार व्हावे लागेल. तुम्हाला हे सर्व धार्मिक भावनेने करावे लागेल तुम्हाला याचे स्मरण ठेवावे लागेल की तुम्ही परमात्म्याचे यंत्र आहात.

महमंद इकबाल : धर्म सापेक्ष विचारसरणी –

धर्म आणि राजकारण ह्याची सांगड घालणाऱ्या भारतीय विचार परंपरेत इकबाल ह्याच्या विचारसरणीचा समावेश करण्यात हरकत नाही. भैतिक व अधिभौतिक विचारसरणीला सामावून हिन्दु व इस्लाम विचारप्रणाली व्यक्तीजीवनाची सर्वक्षेत्र व्यापून टाकते. ही सर्वांगीण धार्मिक विचारप्रणाली व्यक्तीला व समाजाला सर्व क्षेत्रात मार्गदर्शन करुन सर्व क्षेत्रावर आपला प्रभाव प्रस्थापित करते. ह्या धार्मिक विचार सरणीचे समर्थन करताना महमंद इकबाल ह्यानी महात्मा गांधी प्रमाणे धर्म व राजकारण ह्याची सांगड घालण्याचा प्रयत्न केला व धर्मनिरपेक्ष वा निधार्मी विचार प्रणालीच्या मूळावर घाव घातला. त्यांनी धर्म निरपेक्ष विचार प्रणालीला यांत्रिक व परंपरा विरहित ठरविले. इस्लाम विचारप्रणाली सांस्कृतीक व आध्यात्मिक असल्यामुळे तिला धर्म चौकटीतच बद्ध करणे योग्य नाही असा निष्कर्ष त्यांनी काढला. धर्माला शासनापासून अलग केल्यास धर्मविरोधी भौतिकवाद उच्च अध्यात्मिक व धार्मिक तत्वाची पायमल्ली करील असे त्यानी सूचित केले. धर्म निरपेक्ष अथवा निधार्मी विचार प्रणालीवर टीका करताना महमंद इकबाल म्हणतात 'तसे पाहिले तर इस्लाम ही एक धर्म प्रणाली नसून ती एक सांस्कृतीक जीवन पद्धती आहे व इस्लामी न्यायशास्त्र हा तिचा एक मूलभूत घटक आहे.' भौतिक आणि अधिभौतिक मूल्यात इस्लाम फरक करीत नाही. दैवी शक्तीनेंच इस्लामची योजना केलेली असल्यामुळे तो परिपूर्ण व जीवनाच्या सर्व अंगाना अंतर्भूत करणारा आहे. इस्लाम ही व्यक्तीच्या जीवनातील खाजगी बाब असून परमेश्वराशी व्यक्तीचे कोणते नाते असावे हें सागण्यापुरतेच इस्लामचे कार्य मर्यादित आहे असे मानणारा खरा मुसलमान नव्हेच! मुसलमानानी धर्म निरपेक्षता स्वीकारल्यास त्याच्यात अधार्मिकता व धार्मिक अविश्वास निर्माण होऊन त्यांना आर्थिक झगडयाला तोंड द्यावे लागेल. धर्म निरपेक्षतेशी मुसलमानाचा काही संबंधी असण्याचे प्रयोजन नाही कारण इस्लाम मानवाचा आत्मा आणि त्याची बुद्धी किंवा धर्म व शासन हया भिन्न भिन्न बाबी आहेत असे मानत नाही. हया चारही बाबीचे एकमेकाशीही नाते असून सर्व मानव एक

आहे असे इस्लाम मानतो. इस्लामी धार्मिक मूल्ये अव्हेरणे म्हणजेच इस्लामी सामाजिक व्यवस्था झुंगारणे किंवा दुसऱ्याचा त्याग केल्यास पहिल्याचे अस्तित्व नाकारल्या सारखे होईल. धर्म व शासन हचा एकाच नाण्याच्या बाजू आहेत असे इस्लामी शास्त्र सागते.

धर्म निरपेक्ष राजकारणाबद्दल डॉ. इकबाल म्हणतात " धर्म निरपेक्ष राजकारण धर्म द्रोही, नीच, अप्रामाणिक व दुप्पटी असते. चूकीच्या धर्मनिरपेक्षवादापायी शिक्षणसंस्थामधून धार्मिक शिक्षणाला बंदी केल्यामुळे शीलसंवर्धन व व्यक्तिविकास ही शिक्षणाची ध्येय साध्य होऊच शकत नाही. "



४. धर्मनिरपेक्ष विचारसरणी

(नेहरू व एम. एन. रॉय)

पंडित जवाहरलाल नेहरू जरी गांधीजीचे अनुयायी समजले गेले असले तरी ते सर्वार्थाने गांधीवादाचे वारस ठरत नाहीत. गांधीजीची धर्मसापेक्ष राजकीय विचारसरणी नेहरुना कधीच मान्य नव्हती. राजकारणात व राजकीय ध्येयवादी विचारसरणीत धर्मश्रद्धाना स्थान देता कामा नये ही त्यांची भूमिका होती. धर्म व राजकारण यांची व्यावहारिक व बौद्धिक पातळीवरील फारकत हेच नेहरु प्रणीत राजकीय तत्वज्ञानाचें वैशिष्ट्य होय. धार्मिक विचारसरणी ही राजकीय विचारसरणीतील प्रबुद्धवादाला (Rationalism) मारक ठरते व धर्मश्रद्धाना राजकीय तत्वज्ञानात स्थान दिल्यास प्रतिगामी प्रवृत्तीना प्रोत्साहन मिळण्याची शक्यता आहे अशी नेहरुची धारणा होती. म्हणून नेहरूनी मानवेन्द्रनाथ रॉय प्रणीत धर्मनिरपेक्ष राजकीय विचारसरणीचा सातत्याने पुरस्कार केला.

आधुनिक विचारवंताच्या गटातील बुद्धिवादी मानवेन्द्रनाथ रॉय हे भारतातील धर्मनिरपेक्ष राजकीय विचारप्रणालीचे आद्य प्रणेते होते. त्यांनीच राजकारण व धर्म व धार्मिक तत्वज्ञान व राजकीय विचारसरणी ह्यांची परस्परापासून फारकत केली आणि धर्मनिरपेक्ष राजकीय तत्वज्ञानाची मांडणी केली. ही धर्मनिरपेक्ष राजकीय

ारसरणीची परंपरा नेहरुनी पुढे चालविली. तर्कवाद, बुद्धिवाद व मानवतावाद याचा आधार घेऊन आधुनिक राष्ट्रवादाचा आशय समृद्ध करण्यासाठी नेहरुनी लोकशाही, राष्ट्रवाद व समाजवाद ह्या मूल्यावर आधारलेल्या आधुनिक राजकीय विचारसरणीचा पुरस्कार केला रॉय प्रणीत प्रखर बुद्धिवाद आणि उदारमतवादी मानवतावाद नेहरूची राजकीय तत्वज्ञानातून साकार झाला आहे. नेहरू प्रणीत बुद्धिवाद त्यांना संदेह वादाकडे (Scepticism) नेतो. कोणतीही गोष्ट श्रद्धेच्या आधारावर स्वीकारावयाची नाही ही त्याची धारणा श्रद्धाळू विचारवंताच्या परंपरेतून त्यांना अलग पाडणारी आहे. भारतीय प्रबोधनाचे आद्य जनक राजाराम मोहनरॉय, सांस्कृतिक पुनरूज्जीवनवादाचे प्रणेते महर्षि दयानंद सरस्वती, लोकमान्य टिळक भारतीय आध्यात्मिक जीवनाचे नेते विवेकानंद, अरविंद घोष वैदिक व्यवस्थेतील श्रद्धास्थानांना आपल्या विचारसरणीत सामावून घेतात प्राचीन भारतीय तत्वज्ञानातील श्रद्धा तत्वानुसार राजकीय विचारसरणी मांडतात. या उलट दादाभाई नौरोजी, गोखले, मानवेन्द्रनाथ रॉय, पं. नेहरू, पाश्चिमात्य राजकीय विचारसरणीतील व्यक्तीवाद, उदारमतवाद व बुद्धिवाद या तत्वाचा पुरस्कार करतात. अर्थात आधुनिक भारतातील सुधारक विचारवंत कमी अधिक प्रमाणात पाश्चिमात्य विचारसरणीने प्रभावित झालेले आहेत. परंतु काही सुधारक विचारवंतानी मात्र पुनरूज्जीवनवादाचा कट्टर पुरस्कार केला आणि त्यांनी प्राचीन भारतीय विचारसरणीचा आग्रह धरला.

स्वामी दयानंद व मानवेन्द्रनाथ रॉय –

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्वामी दयानंदानी धर्माधिष्ठित राजकीय विचारप्रणालीची नव्याने मुहूर्तमेढ रोवली. वैदिक संस्कृतीतील धार्मिक, सामाजिक आणि राजकीय संस्थांची पुनरूस्थापना करण्याची मोहिम हाती घेतली. वैदिक ज्ञानाचे नव्या दृष्टीकोनातून व नव्या प्रेरणेने स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला. वैदिक स्वराज्याला मूर्त स्वरूप देण्याचे स्वप्न पाहिले. स्वामी दयानंदाचा धर्माधिष्ठित राजकीय तत्वज्ञानाचा आधार वैदिक तत्वज्ञान होते. परंतु त्यात आधुनिक विचार प्रवाहाचा समावेश झाला होता. विशेषत: मानवतावादाचे

नवे दालन उघडवून स्वामी दयानंदानी विश्व धर्मातील सर्वाच्या श्रेयस कल्याणाचा दृष्टीकोन मांडला. अर्थात मानवेन्द्रनाथ रॉय यांना अभिप्रेत असलेला नवमानवतावाद हा सर्वस्वी भिन्न असून त्यांच्या प्रेरणा स्वातंत्र्य, समता व विज्ञाननिष्ठा ह्याच्याशी निगडित आहे. हा नव मानवतावाद धर्म संप्रदायाप्रमाणे प्रमाण ग्रंथाच्या चौकटीत बांधलेला नाही. सांप्रदायिक तत्वज्ञानापासून तो मुक्त आहे.

विसाव्या शतकाच्या पहिल्या अर्धशतकात मानवेन्द्रनाथ रॉय ह्यांच्या प्रतिभेने व नव्या विचारसरणीने अनेक भारतीय विचारवंतावर व राजकीय कार्यकर्त्यावर मोहिनी घातली होती. निधर्मी राजकीय विचारसरणीने त्यानी भारतातील राजकीय विचार प्रवाहाला नवी दिशा दिली. या उलट स्वामी दयानंदानी वैदिक तत्वज्ञानाच्या आधारे धर्ममूलक राजकीय तत्वज्ञान नव्या स्वरूपात मांडले. मानवेन्द्रनाथ रॉय कट्टर क्रांतिकारक असल्यामुळे भूतकाळाच्या अवशेषाचा जीर्णोद्धार करण्यास विरोध केला. याच ठिकाणी स्वामी दयानंद आणि मानवेन्द्रनाथ रॉय परस्पर विरोधी विचारसरणी मांडतात. स्वामी दयानंद आणि मानवेन्द्रनाथ रॉय ह्यांच्यात कोणतेच उल्लेखनीय साम्य नाही. स्वामी दयानंद वृत्तीने धार्मिक व प्रवृत्तीने आस्तिक होते. या उलट मानवेन्द्रनाथ रॉय प्रवृत्ती निधर्मवादी आणि मनोवृत्तीने नास्तिक होते. स्वामी दयानंद भूतकालाचे पूजक व परंपरेचे पाईक ठरले आणि मानवेन्द्रनाथ रॉय आधुनिक क्रांतिवादाचे महान प्रणेते ठरले. मानवेन्द्रनाथ रॉयच्या मते भूतकाळ वर्तमान काळाला मार्गदर्शक ठरु शकत नाही. भूतकालीन धर्म, कला शास्त्रे (राज्य शास्त्रे) आणि नीती नियम कालबाह्य ठरली असल्यामुळे त्याचा त्याग करणेच योग्य होय असे परखड विचार त्यांनी मांडले. महात्मा गांधीवर टीका करताना ते म्हणत असत की, गांधीजी राजकारणात धर्म आणून प्रतिगामी शक्तीची जोपासना करु इच्छितात आणि पुरोगामी शक्ती दुबळ्या करीतात. भूतकालीन ध्येयांना वर्तमानकालीन आशय जोडण्यात काय अर्थ आहे? मानवेन्द्रनाथ रॉय साम्यवादी नेते या नात्याने पददलित वर्गाच्या उन्नतीसाठी संघर्ष देण्यास तयार होते. स्वामी दयानंदानीही शोषण व विषमता विरहित समाजाची स्वप्न पाहिली. त्यात समाजवादाचा अथवा

लोकशाहीचा आशय शोधणे शक्य आहे.

स्वामी दयानंद सरस्वती आणि मानवेन्द्रनाथ रॉय दोघेही ज्ञाननिष्ट व कर्मनिष्ट होते. सत्य ज्ञानाचा आग्रह धरणारे होते. परंतु स्वामी दयानंदाना वेदात सर्व ज्ञानाची बीजे आढळली. म्हणूनच त्यांनी वेदावर श्रद्धा ठेवली. मानवेन्द्रनाथ रॉय तर साम्यवादी असूनही त्यांनी मार्क्सवादावर संपूर्ण श्रद्धा ठेवली नाही. ज्ञानवादाला साजेल असा संदेहवाद त्यांनी स्वीकारला. मार्क्सवादावर पोथीनिष्ठ श्रद्धा ठेवण्यास त्यांनी नकार दिला. ऐवढेच नव्हे तर त्यांचा नव मानवतावाद कोणत्याही पोथीनिष्ट व सैद्धांतिक चौकटीत अडकून पडलेला नाही. स्वामी दयानंद वेदाना स्वयंसिद्ध प्रमाण आणि सत्य ज्ञानाचें उगमस्थान मानतात. अर्थात स्वामी दयानंद व मानवेन्द्रनाथ यांची अनुक्रमे वेद आणि मार्क्सवाद यावर दृढ आणि निष्ठापूर्वक श्रद्धा आहे. एकाने वेदावर विश्वास ठेवला दुसऱ्याने मार्क्सवादावर.

स्वामी दयानंद अध्यात्मवादी व धर्मसुधारक होते. रॉय पूर्णपणे जडवादी होते. त्यानी भौतिकवादाचा पुरस्कार केला. शास्त्र आणि तत्वज्ञान याद्वारे भौतिक जीवनातील कोडी उकलता येतील असा विश्वास निर्माण केला. रॉय ह्यांनी अतीद्रियावादावर टीका केली. मानवेन्द्रनाथ रॉय ह्यानी इतर धर्म पंडिताप्रमाणे नीतीनियमाचे अध्यात्मिक अथवा धार्मिक तत्वानुसार समर्थन केलेले नाही. उलट धर्मातील विवेकशीलतेवर आणि मानवतावादी दृष्टीकोनावर त्यानी नीतीशास्त्राची उभारणी करण्याचा प्रयत्न केला. सारांश, स्वामी दयानद धार्मिक, अध्यात्मिक आणि पारलौकिक उद्दिष्टांना महत्व देतात तर रॉय भौतिक, ऐहिक आणि इहवादी जीवनाच्या उद्दिष्टांचे निरुपण करतात.

शास्त्रीय राजकारण –

मानवेन्द्रनाथ रॉय ह्यानी शास्त्रीय राजकारणाचा सर्वथा अभिनय असा सिद्धांत मांडला. या राजकारणाचा पाया बुद्धिनिष्ट असून त्याच्या मागील प्रेरणा मानवतावादी आहे. व्यक्तीच्या सृजनशील व उपक्रमशील प्रेरणाना त्यात भरपूर वाव आहे. हे राजकारण धर्मातील आहे. कोणत्याही धर्म संप्रदायाच्या ते अधीन होऊ शकत नाही. ते

मानवाच्या हितासाठी आहे. हितसंबंधी गटासाठी अथवा वर्गासाठी नाही. या ठिकाणी रॉय आधुनिक काळाचे अपत्य ठरतात याउलट स्वामी दयानंदानी व त्यानी स्थापन केलेल्या आर्यसमाजो सदस्यानी पुन्हा एकदा पुनरुज्जीवनवादी दृष्टिकोणातून राजकारणातील ध्येय निश्चित केले. त्यानी मांडलेल्या कल्पना प्राचीन भूतकाळातील धर्मनिष्ट राजकीय सिद्धांताचे द्योतक ठरतात. ' आर्यवर्त ' आर्यराष्ट्र आणि वैदिक व्यवस्था ह्यासारख्या कल्पनाना रॉय कधीच मान्यता देणार नाहीत. कारण महात्मा गांधीनी मांडलेल्या ' रामराज्य ' ह्या संकल्पनेवर त्यांनी प्रतिगामी संकल्पना म्हणून टीका केली होती. सारांश, रॉय ह्यांचे क्रांतीकारी आणि धर्मधिष्टीत व परंपरावादी राजकारणापेक्षा भिन्न आहे, एवढेच नव्हे तर विरोधी आहे.

रॉयप्रणित धर्मनिरपेक्ष नवमानवतावाद –

रॉयप्रणित नवमानवतावादामध्ये माणसाची मूलभूत एकता, श्रेष्ठत्व, वैधानिक दृष्टिकोन, बुद्धिवाद, व्यक्ती सातंत्र्य, सत्यान्वेषण व स्वातंत्र्य आदी मूल्याना स्थान आहे. एम्. एन्. रॉय मानवाच्या विवेक बुद्धीवर श्रद्धा ठेवतात. त्यांच्या मते, माणसाची नीती ही त्याच्या विवेक शक्तीचा अविष्कार असते. ते म्हणतात की, मानवी जीवनात १) सत्याचा शोध आणि २) स्वातंत्र्याचे अन्वेषण या प्रेरणा प्रभावी असतात. ते म्हणतात की, भौतिक व्यवहाराच्या नियमातील सत्य हे विज्ञानजन्य ज्ञान होय पुढे म्हणतात की, मानवी जातीचा इतिहास म्हणजे स्वातंत्र्य व सत्य या प्रेरणाचा अविष्काराची विवेकनिष्ठ विकास प्रक्रिया होय. माणसावरील अंतर्बाह्य बंधने क्रमशः दूर करुन त्याच्यातील सुप्त शक्ती सृजनशीलता व सत्यशोधन वृत्ती ह्यांना वाव दिल्यास मानवी स्वातंत्र्य व आत्मनिष्ठ आत्मविकास ही उद्दिष्टे साध्य होतील अशी मानवेन्द्र नाथ रॉय ह्यांची धारणा होती.

गोखल्यांची धर्म निरपेक्ष विचारसरणी –

भारतातील धर्मसापेक्ष विचारप्रणालीला अपवाद ठरणारी निधर्मी किंवा धर्म निरपेक्ष विचारप्रणाली ना. गोखले ह्यांनी मांडली. महात्मा गांधी प्रमाणे गोखले देखील सर्व धर्माना व सर्व धर्मीय लोकांच्या गटांना समान मानणाऱ्या पैकी होते. भारतासारख्या बहुधार्मिक

समाजात विशेषाधिकाराची वाटणी समानतेने सर्व धर्म संप्रदायाच्या लोकात झाली पाहिजे. भारतीय समाजातील सर्व धार्मिक गटाना समान हक्क मिळाले पाहिजे व प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत असे मत त्यांनी प्रतिपादन केले. भारतीय समाज हा विविध धार्मिक समूहानी मिळून बनलेला आहे. या समाजाचे हिंदुचा समाज किंवा मुसलमानाचा समाज असे विभाग पाडता येणार नाही. हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन आदि धर्म संप्रदाय एकत्र येऊन हा बहुरंगी व जटील समाज बनलेला आहे. म्हणूनच या समाजात एका बहुसंख्य धार्मिक गटाला काही अधिकार देणे व इतर धार्मिक संप्रदायातील लोकांना या अधिकारापासून वंचित ठेवणे, केव्हाही योग्य व उचित ठरणार नाही. हिंदु व मुस्लीम समाजातील वैर व परस्पर अविश्वास नष्ट करुन त्यांच्यात ऐक्य प्रस्थापित केल्याशिवाय राष्ट्रवादी प्रेरणा निर्माण होऊ शकणार नाही. या दोन प्रमुख समाजात स्थिर सहकार्य प्रस्थापित केल्याशिवाय भारतीय राजकारणाला भवितव्य नाही. असे विचार त्यांनी वेळोवेळी व्यक्त केले. हिंदु मुसलमानाचे ऐक्य भारतीय राष्ट्रवादाची व्यावहारिक गरज आहे हे गोखले सारख्या व्यवहारी राजनीतिज्ञाने प्रथम ओळखली होती.

धर्मनिरपेक्ष प्रवृत्तीचा प्रभाव –

ना. गोखलेची विचारसरणी बुद्धिवादी व धर्मनिरपेक्ष प्रवृत्तीने प्रभावित झालेली होती. विशेषत: धर्मनिरपेक्ष पाश्चिमात्य विचार प्रणालीचा प्रभाव गोखले त्यांच्यावर पडलेला दिसून येतो. जे. एम्. मिल सारख्या बुद्धिवादी विचारवंताच्या विचाराने गोखले प्रभावित झाले होते. तसेच एडमंड बर्क सारख्या तत्वज्ञ राजनीतिज्ञानाच्या व्यवहार्य राजकारणाची छाप त्यांच्या सार्वजनिक जीवनातील कार्यावर पडली होती. म्हणून बहु धार्मिक समाजातील सर्व घटकांना समान हक्क व संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. तसेच राष्ट्रीय ऐक्य साधण्यासाठी सर्व धार्मिक समूहाना समान वागणूक मिळाली पाहिजे हे त्यांनी ओळखले होते. त्याचप्रमाणे भारतातील सामाजिक, आर्थिक व राजकीय समस्यावर केवळ निधर्मी व बुद्धिवादी दृष्टीकोणातून उपाययोजना केली पाहिजे हें त्यानी सूचित केले अर्थात गोखले ह्यांची सामाजिक, आर्थिक

व राजकीय विचारसरणी धर्मनिरपेक्ष किंवा निधर्मी होती. परंतु ती धर्मविरोधी नव्हती. धार्मिक व आध्यात्मिक जीवनाचे क्षेत्र अलग व स्वायत्त स्वरूपाचे असते. व्यक्तीच्या सार्वजनिक व भौतिक जीवनाच्या प्रगतीसाठी धर्मनिरपेक्ष दृष्टीकोन स्वीकारणे योग्य ठरते. हे गोखले ह्यानी आपल्या विचारानी व कृतींनी दाखवून दिले. म्हणून गोखलेचा आदर सर्व धर्म संप्रदायातील लोक करीत असत. धर्मनिरपेक्ष राजकारणाची पाश्चिमात्य परंपरा भारतात दृढमूल करण्याचे कार्य गोखले ह्यांच्याकडून झाले असे म्हणता येईल.

धर्मनिरपेक्ष मुस्लिम विचारसरणी –

भारतीय विचार प्रणाली प्रमाणेच मुस्लिम विचार प्रणालीत धार्मिक तत्व प्रणालीचा अधिक प्रभाव असल्याचे दिसून येते. हिंदुधर्माचा व इस्लाम धर्माचा प्रभाव अनुक्रमे हिंदु व मुस्लिम विचारसरणीवर पडलेला दिसून येतो. धर्म व राजकारण तसेच धर्म व समाजकारण ह्यांचे वैशिष्टचपूर्ण मिश्रण भारतीय तत्वज्ञानात झालेले आहेत. त्याच प्रमाणे मुस्लिम विचारप्रणाली इस्लामच्या तत्व प्रणालीवर आधारलेली आहे. धर्म व राजकारण यांची युती राजकीय विचारसरणीतील बुद्धिवादी प्रेरणाला निष्प्रभ बनविते. त्याचप्रमाणे राजकीय विचारसरणीत विचार स्वातंत्र्याला ही युती घातक ठरते. धर्मश्रद्धा व अंधश्रद्धा याचे वर्चस्व सार्वजनिक जीवनात वाढत राहते. म्हणूनच एकोणिसाव्या शतकातील ब्रिटिश उदारमतावादाने निधर्मी किंवा धर्मनिरपेक्ष बुद्धिवाद व बुद्धिवादी संदेहवादाचा पुरस्कार केला. त्यानंतर काल मार्क्सने व मार्क्सवाद्यांनी निधर्मी राजकीय व आर्थिक विचार प्रणालीचा प्रसार व प्रचार केला. राजकारणात व समाजकारणात धर्मनिरपेक्ष नीतिमत्तेचा आग्रह धरण्यात यावा, अशी विचारप्रणाली भारतात दृढमूल करण्यासाठी नेहरु व मानवेन्द्रनाथ रॉय ह्यांनी प्रयत्न केले. विशेषतः सुधारकांना पाश्चिमात्य धर्तीच्या सुधारणा येथे करण्यासाठी धर्मनिरपेक्ष विचारप्रणालीचा स्वीकार करणे भाग पडले. धर्माचे क्षेत्र इतर क्षेत्रापासून भिन्न असावे असे विचार भारतीय मुस्लिम विचारवंतानी मांडण्यास सुरुवात केली. तेव्हापासून भारतीय विचारप्रणालीत निधर्मी विचाराचा प्रभाव वाढू लागला. मुस्लिम विचारवंतामध्ये सरसैद ह्यानी

प्रथम काहीशा परिस्थितीच्या दडपणाखाली सांशक मनाने भीतभीतच ही विचारसरणी मांडली. परंतु बुद्धिवादाचा स्वीकार केल्यानंतर धार्मिक विचारसरणीतील दांभिक व अंधश्रद्धाळू भागाचा त्याग करणे आवश्यक आहे, हे त्यांनी सूचित केले. त्यानंतर हमीद दलवाई ह्यांनीं इस्लाम धर्मांतील सत्त्याच्या कसोटीवर चिकित्सा करून धर्मांध कल्पनाचा मुस्लिम मनावरील पकड ढिली करण्यासाठी प्रयत्न केला. या कामी त्याना विशेष यश आले नसलें तरी एक नव्या बुद्धिवादी उदारमतवादाच्या शक्तीला मुस्लीम समाजात संघटित स्वरुप देण्यासाठी त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केले. मुस्लीम सत्यशोधक मंडळामार्फत त्यांनी केलेले कार्य महत्वाचे आहे. धर्माचे स्वायत्त क्षेत्र वगळून इतर क्षेत्रात मुस्लिमानी नव्या विचाराचा व सुधारणाचा स्वीकार करावा असा त्यांचा आग्रह असे. महात्मा फुले प्रमाणे एकाकीपणे परंपरागत अंधश्रद्धाळू मुस्लिम समाजामध्ये सुधारणावाद रूजविण्याचा त्यांचा प्रयत्न स्तुत्य होता. महात्मा फुलेचा सत्यशोधक समाज व हमीद दलवाई ह्यांचा मुस्लिम सत्यशोधक मंडळ ह्याच्या सुधारणावादी कार्यांचे मोल नाकारता येत नाही. बुद्धि व सत्य या दोन मुल्याचे मानवी प्रगतीच्या मार्गांतील कार्य त्यांनी पूर्णपणे ओळखले होते.



५. पुनरुज्जीवनवाद व चळवळ सुधारणा

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात हिंदुस्थानामध्ये तीन संघटना सुधारणेच्या चळवळीत अग्रेसर होत्या. ब्राह्मोसमाज बंगालमध्ये तसेच दाक्षिणात्य भागात सुधारणा आंदोलनाची सूत्रे हालविता होता. प्रार्थना समाजाचा संघटनात्मक दृष्टीने फारसा प्रभाव नसला तर मुंबई व इतरत्र ठिकाणी ब्राह्मो समाजाचे अनुकरण करुन प्रार्थना समाज धर्म सुधारणा आणि समाज सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील होता. तर आर्य समाजाने उत्तर हिंदुस्थान विविध ठिकाणी सुधारणावादी आंदोलनाचे सूत्रे आपल्या हाती घेतली होती. या तिन्ही संघटनाचे कार्य प्रामुख्याने धार्मिक व सामाजिक सुधारणेचे होते. अर्थात राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्रक्रियेत धार्मिक व सामाजिक सुधारणा उपयुक्त ठरत असल्यामुळे राष्ट्र उभारणीच्या कार्यात या तिन्ही संघटनाचे कार्य अंतिमतः उपयुक्त ठरले. असे असले तरी या तीन संघटनेपैकी आर्य समाज एक राष्ट्रवादी संघटना बनली. या संघटनेतील नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात सक्रीय भाग घेतला. जहाल राष्ट्रवाद ही आर्य समाजाची एक प्रमुख प्रेरणा होती व ही प्रेरणा महर्षि दयानंदाच्या विचारसरणीचा

परिपाक होता.

ब्राम्होसमाज आणि प्रार्थनासमाज ब्रिटिशाच्या प्रगतीने भारावून गेले होते. पाश्चिमात्य विद्याची मोहिनी त्यांच्या कार्यकर्त्यावर पडली होती. म्हणूनच ब्रिटिश राजवटीच्या मार्गदर्शनाखाली देशाची सर्वांगीण सुधारणा घडवून आणता येईल असा विश्वास त्यांच्यामध्ये निर्माण झाला होता म्हणूनच परकीय राजवटीला ' ईश्वरी वरदान ' मानण्याची एक प्रवृत्ती त्यांच्यामध्ये निर्माण झाली. म्हणून या दोन्ही संघटनेच्या नेत्यानी व कार्यकर्त्यानी ब्रिटिश राजवटीला विधायक सहकार्य दिले. या दोन्ही संघटनामधील नेत्याची व कार्यकर्त्याची देशभक्ती, देशाच्या सुधारणाविषयी त्यांना वाटत असलेली कळकळ व भारतीय समाजाचा अभ्युदय करण्याचे त्यांचे प्रयत्न निःसंशय गौरवास्पद होते. आर्य समाजाने मात्र ब्रिटिश राजवटीला ईश्वरी वरदान मानले नाही. आर्यवर्त आर्यासाठी आहे परकीयासाठी नाही हे त्यांनी स्पष्ट केले. सुराज्य हे स्वराज्याला पर्याय होऊ शकत नाही, ही दयानंदाची विचारसरणी राष्ट्रीवादी प्रेरणेला पोषक ठरली त्यानुसार ब्रिटिश शासनाविरूद्ध चाललेल्या राष्ट्रीय आंदोलनात आर्य समाजाने भाग घेतला. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या नेत्यामध्ये कार्यकर्त्यामध्ये आर्य समाजाची संख्या लक्षात घेता असे दिसून येते की, जहालवाद्याच्या राष्ट्रावादी आंदोलनात आर्य समाजाच्या नेत्यांचे योगदान महत्वाचे होते. लाला लजपतराय, श्रद्धानंद, डॉ. सत्यपाल आर्य समाजाच्या राष्ट्रवादी आंदोलनाचे नेतृत्व करीत होते.

भारतातील समाज सुधारणा चळवळीत तसेच धार्मिक सुधारणा चळवळीत बुद्धीवादावर आधारलेल्या आधुनिक प्रवृत्तीही होत्या. त्याचप्रमाणे पुनरूज्जीवनवादी प्रेरणाही होत्या. ब्राह्मो समाज व प्रार्थना समाज सुधारणेच्या क्षेत्रात आधुनिकवादी होता तर आर्य समाज चळवळ सुधारणेंच्या क्षेत्रात अग्रेसर असूनही पुनरूज्जीवनवादी होती. आर्य समाजानेही काही आधुनिक कल्पनांचा प्रसार केला. आर्य समाजाने भारतीय परंपरा व इतिहास यांच्याशी सातत्याने सुसंवाद साधणारी सुधारणा चळवळ चालू ठेवली. राष्ट्रवादी प्रेरणेचे सामर्थ्य तिला प्राप्त करून दिले. या उलट ब्राह्मो समाजाने पाश्चिमात्य विचारप्रणालीचा

व युरोपीय संस्कृतीचा पुरस्कार करुन राष्ट्रीय आस्मिता व राष्ट्रवादी प्रेरणा यांना इजा पोहचविली असा निष्कर्ष विपीन चंद्रपाल यांनी 'स्वदेशी आणि स्वराज्य' या ग्रंथात काढला आहे. बिपीन चंद्रपाल म्हणतात,

" In our ardent admiration for Europe, our highest patriolic efforts, however, more or less neglected and ignored the actualities of Indian life and situation Our patriotism was, therefore, naturally more destructive. Our methods were more revolutionary then evolutionary. And the necessary result was that our highest patriotic activities, whether in the field of religion or social or political reconstruction, were without that historic continuity which alone could furnish strenght and vitality to them. The very exuberance of this patriolism was bound to bring in a violent reaction, and it came presently in the shape of strong social and religions revival, which well – nigh killed this patriotism in the country, and retarded. The course of progress almost in every direction, bringing the new ideas into ridicule and disrepute. However much one might regret the excesses in which this reaction went, it would be impossible to deuy that it has partially helped the new thought in the country by bringing it back to the realities of our national life and history. "

ब्राह्मो समाज व प्रार्थना समाज सुधारणेच्या क्षेत्रात पोथीनिष्ठ जुन्या धर्म कल्पनाना विरोध करीत असे, आर्य समाजाने मात्र वैदिक संस्कृतीत जुन्या तत्वाचे पुनरूज्जीवन करण्याचा प्रयत्न केला. आर्य समाज वैदिक संस्कृतीचा पुजक व अभिमानी होता. आर्य समाजाचे मत वेद ही परमेश्वराची वाणी असून त्यातच शास्त्राचे व धर्म

शास्त्राचे सिद्धांत सामावलेले आहे. वैदिक संस्कृती हीच आदर्श संस्कृती होय. या संस्कृतीचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे.

आर्य समाज पुनरुज्जीवनवादी असला तरी आर्य समाज चळवळीने, मुर्तिपुजा, पशु बळी, पूर्वज पूजा यांना धर्म गुरुचे स्तोम, जाती व्यवस्था, अस्पृश्यता आणि बालविवाह यांना कडाडून विरोध केला. तरी यज्ञ, गोरक्षण, वेद, कर्मसिद्धांत यासंबंधी आर्य समाजाचा दृष्टीकोन परंपरावादी व पुनरूज्जीवनवादी स्वरुपाचा होता हे कोणालाच नाकारता येणार नाही.

थिआसाफिकल सोसायटीने भारतातील पुनरुज्जीवनवादी चळवळीत मौलिक विचारांची भर टाकली. भारताच्या भूतकालीन वैभवावद्दल या समाजाला आदर होता. सर्व धर्माची मूलतत्वे सत्य असून त्यांचा स्वीकार केला पाहिजे. ही भूमिका थिआसाफिकल समाजाने भारतीय लोकासमोर मांडली. धार्मिक उदारमतवाद ही या समाजाची प्रमुख वैचारिक प्रेरणा होती. बौद्ध व हिंदु धर्मातील तत्वामधील सामर्थ्य दाखविण्याचा प्रयत्न या समाजाने केला. ॲनी बेसंट यांनी स्पष्ट केले की, थिआसाफिकल चळवळ ही एक आध्यात्मिक व धार्मिक सुधारणेची चळवळ आहे. ॲनी बॅसंट हयानी म्हटले आहे की,

" Theosophy - - - gives a universal importance to Indian philosophical speculation and in so doing inevitably enhances its popularity in India. It levies contributions from all the more important Indian systems, taking from the Upanishadas the doctrine of a fundamental unknowable and characterless unity and the identity of the human and the divine, from the Sankhya the idea that spiritual advancement consists in a gradual detachment from the process of the phenomenal world; from Buddhism the idea of Karma and transmigration and from Yoga the conception of various occult methods by which

freedom of thought and spirit may be won, "

अर्थात थिऑसॉफिकल सोसायटीनें धार्मिक पुनरुज्जीवनवादाचा पुरस्कार करताना आधुनिकवादाची कास धरली नांही, उलट काही धार्मिक अंधश्रद्धांची जोपासना केली. आध्यात्मवादाचा पुरस्कार करताना या समाजाने भारतात धार्मिक व नैतिक शिक्षणाची आवश्यकता आहे असे अप्रत्यक्षपणे सूचविले. थिआसॉफिकल सोसायटीने Central Hindu College मार्फत हिंदुवादाची रूपरेखा दर्शवणारे पुस्तक प्रसिद्ध केले.

आर्य समाजाइतकी भारतातील थिआसॉफिकल सोसायटी लोकप्रीय वनू शकली नाही. कारण या संघटनेचे तत्वज्ञान सर्वसामान्य लोकांच्या बुद्धीला पेलणारे नव्हते व पचणारे नव्हते. संघटनेचा विस्तार कमी असल्यामुळे या संघटनेच्या विचारसरणीत जनसमुदायाकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळू शकला नाही.

ब्राह्मो समाज आणि प्रार्थना समाज जरी आधुनिकवादाच्या आधारे सुधारणा कार्यक्रम अंमलात आणण्याचा प्रयत्न करीत असले तरी या दोन्ही संघटनांनी हिंदु पुनरुज्जीवनवादाच्या प्रेरणांचा त्याग केला नव्हता. ब्राह्मो समाज विशुद्ध वैदिक धर्माचा प्रचार करीत होता. मूर्ति पूजेला विरोध करणारा ब्राह्मो समाज हिंदु धर्मातील आध्यात्मिक मुल्याचा उघडपणे पुरस्कार करीत होता. या उलट हिंदु पुनरुज्जीवनवादाचे ध्येय बाळगणारा, विशेषत: आदर्श वैदिक व्यवस्थेची पुनर्स्थापना करणाऱ्या आर्य समाजाने इंग्रजी शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्था ठिकठिकाणी स्थापन केल्या व पाश्चिमात्य साहित्य व शास्त्रे यांचे शिक्षण भारतीयानी घ्यावे यासाठी सातत्याने प्रयत्न केला. सारांश भारतीय सुधारणावादात हिंदु पुनरुज्जीवनवाद व आधुनिकवाद कधीकधी हातात हात घालून वाटचाल करत असल्याचें आढळून येते.

ब्राह्मो समाजातील व प्रार्थना समाजातील काही नेत्यांनी राजकीय सुधारणेच्या क्षेत्रात बौद्धिक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. त्यातील नेते पाश्चिमात्य उदारमताने प्रेरित झाले होते. म्हणूनच संविधानिक आंदोलनाद्वारे, ब्रिटिश शासनाच्या सहकार्य येथे स्वराज्य व स्वशासन प्रस्थापित करावे ही भूमिका रानडे, गोखले, राम मोहनरॉय सारख्या

सारख्या नेत्यानी घेतली. या नेत्याचा भर पाश्चिमात्य धर्तीवरील सुधारणावादावर अधिक होता.

या उलट आर्य समाजाशी संबंधित आणि आर्य समाजाबद्दल सहानुभूति दाखविणाऱ्या काही जहाल नेत्यानी प्रखर राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. स्वामी दयानंद, अरविंद घोष, लोकमान्य टिळक, लाला लजपत रॉय यांनी राष्ट्रवादाला आपला धर्म मानले. ब्रिटिश राजवट व भारतीय जनता यांच्यात सामंजस्या ऐवजी संघर्ष अटळ आहे म्हणून ब्रिटिश राजवटी विरुद्ध संघर्ष देण्यासाठी त्यानी प्रखर आंदोलनाच्या तंत्राने राजकीय सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न केले. सुराज्य नव्हते तर संपूर्ण स्वराज्य हेच जहालवादी आर्य संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट होते.

आर्य समाजाने हिन्दु पुनरुज्जीवन वादातील चार तत्वे सांगितली.

१) वैदिक धर्मातील हिन्दु ध्येयवादानुसार आधुनिक समाजाची जडण घडण करावी.

२) हिन्दु तत्वज्ञानानुसार येथे आर्थिक व राजकीय संघटना उभाराव्यात.

३) राज्याने आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप करु नये हिन्दु व्यवस्थेत क्षात्र धर्म व वैश्य धर्म निराळा मानावा.

४) हिन्दु धर्म ग्रंथातील मुल्यपद्धतीनुसार सामाजाची उभारणी करावी.

सुधारणावादाच्या मर्यादा –

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात उदयास आलेली सुधारणावादी चळवळ आपला प्रभाव जास्त प्रमाणात भारतीत समाजावर टाकू शकली नाही. याला अनेक कारणे जवाबदार आहेत. ब्रिटिश राजवटीला येथे दीर्घ काळ आपले स्थिर अस्तित्व टिकवून ठेवावयाचे होते म्हणून ब्रिटिश राजवटीने राजकीय सुधारणेच्या मोहिमेला हातचे राखून प्रतिसाद दिला. हा प्रतिसादही पुरेसा नव्हता स्वातंत्र्य आंदोलनातील राजकीय सुधारणावाद संविधानिक सुधारणा व शासन यंत्रणेत बदल एवढ्यापुरताच मर्यादित राहिला. भारतातील राजकीय सुधारणावादाने लोकशाहीला अनुकूल अशी राजकीय संस्कृति जनमा-

नसात निर्माण केली नाही. नवीन राजकीय मूल्ये सर्वसामान्य लोकापर्यंत पोहचविण्याचे कार्य करण्यात राजकीय सुधारणा फारशी प्रभावी ठरली नसली तर या राजकीय सुधारणेने राष्ट्रीय जागृति निर्माण केली व सुशिक्षित लोकात लोकशाही मूल्याचा प्रसार केला. पुढे या सुशिक्षित लोकातील नेत्यानी भारतात संविधानिक लोकशाही प्रस्थापित केली व तिची जोपासना केली.

ब्रिटिश राजवटीने सामाजिक सुधारणेकडे काहीशा उदासिन दृष्टिकोणातून पाहिले. ब्रिटिश राज्यकर्त्यांना येथील समाज व्यवस्थेत शक्यतोवर ढवळाढवळ करावयाची नव्हती. म्हणून सामाजिक सुधारणेच्या बाबतीत ब्रिटिशानी पुढाकार घेतला नाही तसेच फारशी उत्सुकता दाखविली नाही. काही अपवादात्म सामाजिक रुढीना कायद्याने बंदी घालण्याचा प्रयत्न मात्र ब्रिटिश शासनाने केला. परंतु तोही यशस्वी झाला असे म्हणता येत नाही. सुधारणेच्या बाबतीत पुढाकार घेऊन सनातनी लोकांचा व श्रद्धाळू लोकांचा रोष ओढवून घेण्यास ब्रिटिश तयार नव्हते. परंतु पाश्चिमात्य न्यायतत्व शास्त्रातील काही तत्वांच्या आधारे ब्रिटिशाना भारतात एक कायदा व्यवस्था प्रस्थापित करावयाची होती. म्हणून ब्रिटिश राजवटीच्या काळात पुरोगामी सामाजिक विधेयके संमत झाली. मनुष्य वध हा राज्याविरुद्धचा गुन्हा ठरतो तसेच पतीच्या चित्तेवर स्वतःला जाळून घेणारी पत्नी ही एक प्रकारची मनुष्य हत्या असल्यामुळे ब्रिटिश न्यायतत्वाच्या आधारे ती योग्य ठरत नाही म्हणून ब्रिटिशानी सतीबंदीचा कायदा केला. ब्रिटिश राजवटीने आंतरजातीय विवाहाला वैध स्वरुप देणारा कायदा केला (Caste Disability Removal Act.) अर्थात ब्रिटिश राजवटीतही आंतरजातीय विवाहाला सर्वसामान्य सामाजिक मान्यता नव्हती. आंतरजातीय विवाह झाल्याच्या घटना अतिशय कमी व तुरळक होत्या. सारांश, समाज सुधारणेच्या दृष्टिने अनेकविध कायदे ब्रिटिश राजवटीत संमत झाले व ब्रिटिशानी समाज सुधारणेला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला असे आढळून येत नाही. शिक्षणाच्या प्रसाराबाबत, विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराबाबत ब्रिटिश शासन अनुदार व उदासिन दृष्टिकोन स्वीकारत आहे असे गोखले म्हणत असत. ब्रिटिश राजवटीला ' ईश्वरी

वरदान ' मानणारे नेतेही ब्रिटिश राजवटीने सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात फार मोठी कामगिरी केली हे मान्य करत नाही. ब्रिटिश राजवटीच्या संपर्कामुळे व परिणामामुळे काही बदल घडवून आणण्यास मदत झाली. ही गोष्ट अमान्य करता येत नाही.

स्वातंत्र्य लढ्यातील सुधारणा चळवळीचें आणि सुधारकाचे मुक्त कंठाने गोडवे गाईले जातात, त्यांचा गौरव केला जातो. परंतु एक गोष्ट नेहमी दुर्लक्षिली जाते, ती म्हणजे सुधारणा चळवळीचा फार मोठा विधायक परिणाम भारतीय समाजावर झाला असे म्हणता येत नाही. परंपरावादी व अंधश्रद्धाळू समाजाने सुधारणा पचविण्याची क्षमता दाखविली नाही. सुधारणा चळवळीला सर्वसामान्य जनतेकडून सतत प्रतिसाद व पाठिबाही मिळाला नाही. म्हणून स्वातंत्र्य काळातील सुधारणा चळवळीचे सातत्य पुढे टिकून राहिले नाही. स्वातंत्र्य काळातील सुधारणावाद हा मध्यमवर्गीय पांढरपेशा वर्गातील बौद्धिक चर्चेचा विषय राहिला. पद दलित वर्गातील लोकाचा तो जिव्हाळ्याचा प्रश्न बनू शकला नाही. म्हणून डॉ आंबेडकराची अस्पृश्यता विरोधी चळवळच फक्त समाजातील कनिष्ठ स्तरापर्यंत पोहचू शकली. इतर सुधारकांच्या पाश्चिमात्य धर्तीच्या सुधारणाना फक्त मध्यमवर्गीय लोकांनी पाठिबा दिला.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात, बालविवाह बंदी, विधवा विवाह, जरठ विवाहाला विरोध, आंतरजातीय विवाह, स्पृश्य – अस्पृश्य भेदाला विरोध हे समाज सुधारणेचे प्रमुख विषय होते. बाल विवाहाला विरोध करणाऱ्या सुधारकाच्या कार्याची फलश्रुती म्हणून बाल विवाहाला कायद्याने बंदी घालण्यात आली. परंतु अजून भारतातील ग्रामीण भागात व काही प्रदेशात उघडपणे बालविवाह संपन्न होत आहेत. पुनर्विवाहाला अजूनही पूर्ण सामाजिक मान्यता नाही. विधवा विवाहाची संख्या लक्षात घेता असें म्हणता येईल की, अजूनही विधावा विवाह सार्वत्रिक नाही. आंतर जातीय विवाह करणाऱ्यास शासनाकडून अजूनही बक्षिस जाहीर केले जाते. ही सर्व उदाहरणे, भारतातील सुधारणावादाची शोकांतिका दर्शवितात. स्पृश्य - अस्पृश्य भेदाभेद पाळणाऱ्या विरूद्ध कडक कायदेशीर

उपाययोजना आखण्यात आली आहे. परंतु त्याच्या सामाजिक सामंजस्य निर्माण करण्यासाठी ' एक गाव एक पाणवठा ' सारखा कार्यक्रम हाती घेण्याची आजही गरज भासते आहे. सारांश भारतातील सुधारकांना समाज व इतिहास घडविण्यात म्हणावे तितके यश आलेलें नाही. अर्थात भारतातील राजकीय व सामाजिक सुधारणा चळवळीने अनुक्रमे राजकीय व सामाजिक जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला व या चळवळीला काही अंशी त्यात यश आले. परंतु सुधारणेचे अंतिम लक्ष गाठण्यात सामाजिक सुधारणावाद पूर्णपणे यशस्वी ठरला असें खात्रीने सांगता येत नाही.



६. मुस्लिम संप्रदायवाद

भारतीय समाज केवळ बहुजिनसीच आहे असे नव्हे तर तो अनेकविध बंदिस्त गटाचा मिळून बनलेला बहुजिनसी (Plural) समाज आहे. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत विस्तीर्ण रुपात पसरलेल्या या समाजात जातीय गट, धार्मिक गट, प्रादेशिक गट आणि विविध वन्य जमाती विविध पातळीवर आपला प्रभाव, टाकीत असतात. जाती व उपजाती याचे मिळून बनलेले जन्माधिष्ठित गट अजूनही राजकारणात प्रभावी ठरत आहेत. धर्म, मातृभाषा, वंश आणि प्रदेश यावर आधारलेले जन्माधिष्ठित नैसर्गिक गट अजूनही राष्ट्रीय जीवन स्तोतात पूर्णपणे विसर्जित झालेले नाहीत. हे सर्व गट विविध आस्मिता उराशी बाळगून आहेत. या गटांनी स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व जिद्दीने व जागरुकपणे जोपासले आहे. हे सर्व गट बहुजिनसी राष्ट्रीय समाजातील विविध घटक विभागात त्याचप्रमाणे राजकारणात महत्वाची व निर्णायक भूमिका वठवितात.

दोन समांतर समाज –

भारतीय समाजात हिंदु समूह व मुस्लिम समूह समांतर समाजाच्या स्वरुपात एकत्र राहिले. हिंदु समूह आणि मुस्लिम समूह यांनी आपला धर्म, आपली परंपरा, समाज व्यवस्था व संस्कृती यांची कठोरपणे जोपासणा केली व आपले पृथगात्मक अस्तित्व कायम ठेवले. दोन्ही

समाजात सांस्कृतिक पातळीवर थोडीफार देवाण घेवाण झाली असली तरी या दोन्ही समूहातील लोक परस्परात पूर्णपणे मिसळून गेले नाहीत. मूस्लिम राजवटीतही हिन्दू समाजाने आपल्या कोषातच आपली संस्कृति जोपासली दोन्ही समाजानी परस्परांच्या संस्कृतीत मोलाची भर टाकली परंतु दोन्ही समाजानी परस्परात मिसळून जाण्यास विरोध केला दोन्ही समाजाला जोडणारे बांध घालण्याचे प्रयत्न झाले परंतु त्यात फारसें यश आलेले नाही राष्ट्रीय जीवन स्त्रोतात आपली प्रथमात्मता कायम ठेवून अजूनही मुस्लिम समाज आपले स्वतंत्र अस्तित्व व आस्मिता टिकविण्याचा पराकाष्टाने प्रयत्न करीत आहे. विशेषत: दोन्ही समाजातील सनातनी लोक दोन्ही समाजांतील लोकाना एका बंदीस्त कोषात कोंडून ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत हें स्पष्ट करताना श्री क्षितीमोहन सेन यांनी Culutral Heritage to India च्या चौथ्या आवृत्तीत म्हटले आहे की, Hinduism and Islam, strictly bound by the tenents of their own scriptures, had no point of contact with each other. They were like the two banks of a river ever separated by the stream that flows between them. who was to build the connecting bridge ? The orthodox Hindu as well as the orthodox Mohammedans were unfit for this task, and it was left to the free spirits and lovers of Humanity from both these groups, the Hindu bhaktas and the Mohammedan sufis to devote their lives to the construction of the bridge."

हिन्दु मुस्लिम सांस्कृतिक इतिहास व भारताचा राजकीय इतिहास हेच दर्शवितो की, हिन्दु राजवट व मुस्लिम राजवट यानी इतिहासाची पाने व्यापली आहे भारतातील शिल्पकला दोन्ही संस्कृतीचे परस्पर पुरक योगदानाचें द्योतक आहे. हिन्दु कलावंत मशजिद व मुस्लिम राजकर्त्याचे राजमहल बांधण्यात आपले कौशल्य पणास लावत होते तर मुस्लिम कलावंत मंदीर व हिंदु राजाचे राजमहल बांधण्याचे काम करीत होते. हिंदु व मुस्लिम संत

दोन्ही समाजाला मानवतेचा संदेश देत होते. परकीय भाषातील शब्द संग्रह भारतातील भाषांना समृद्ध करीत होता. दोन्ही समाजातील संगीत कला भारतीय अभिजात संगीताच्या विकासास साहाय्यक ठरली आहे. मध्ययुगीन कला व शिल्पकला भारतीय व इराणी कलाचा संगम दर्शविते.

मुस्लिम : एक सांप्रदायिक राष्ट्रीय समूह –

मुस्लिम समाज हा एक राष्ट्रीय अल्पसंख्याक समूह (National Minority) आहे. भारतातील बहुसंख्य हिंदु समाजापेक्षा भिन्न संस्कृती, भाषा, लिपी व धर्म असलेला हा समूह इतर राष्ट्रीय समूहाशी (त्याच्या सारख्याच राष्ट्रीय समूहाशी) आपली निष्ठा कायम ठेवून आहे. मुस्लिम राष्ट्रीय समूहाच्या राष्ट्रबाह्य धार्मिक निष्ठा ठेवून आहे. इतर मुस्लिम राष्ट्राशी विशेष आत्मियता दाखविताना भारतातील मुस्लिम समाज इस्लामच्या वैश्विक निष्ठाशी तादात्म पावण्याचा प्रयत्न करतो. अशा प्रकारे विशिष्ट देशातील स्थायिक मुस्लिम सार्वत्रिक इस्लाम धर्म मुल्याशी एकनिष्ठ राहण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी इस्लाम बंधुत्व आणि राष्ट्र – बंधुत्व यात समतोल राहण्याच्या प्रयत्नात काही वेळा मुस्लिम समाजातील लोक अपयशी ठरतात मुस्लिम समाजातील लोकांच्या राष्ट्र निष्ठासंबंधी गैरसमज निर्माण होतो, त्याला कारण त्याच्या धार्मिक निष्ठा, ज्या प्रादेशिक निष्ठा ओलांडून बाहेर जातात. एक अलिप्त व प्रथम अल्पसंख्याक समूह म्हणून त्यांची संकुचित जाणीव त्यांना अलिप्ततावादी प्रवृत्तीकडे नेते राष्ट्रीय जीवनात त्यांचे पृथक अस्तित्व त्यांना इतर समूहापासून अलग पाडते. स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व व स्वतःची पृथक संस्कृतीची जोपासताना मुस्लिम समाज ' एकाकी ' पडतो. स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीवच त्याचे अस्तित्व इतरांना असहय ठरते. त्यांच्या राष्ट्रीय जीवनातील सर्वव्यापी भागीदारीशी त्याची अलिप्ततेची जाणीव व पृथक अस्मिता विसंगत व विरोधी ठरते. राष्ट्रातील बहुसंख्य समूहात त्यामुळेच अल्पसंख्याक राष्ट्रीय समूहाबद्दल संशयाची व असहिष्णुतेची भावना निर्माण होते.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यापासून आजपर्यंत –

– मुस्लिम समाज एकाचवेळी 'स्वायत्तता' आणि 'समानता' याची मागणी करत आहे. तो एक अल्पसंख्याक समूह म्हणून स्वतःची संस्कृती, धर्म, भाषा व सामाजिक व्यवस्था टिकविण्यासाठी मुस्लिम अल्पसंख्याक समूह हस्तक्षेप विरहित स्वायत्ततेची मागणी करतो त्याच बरोबर प्रगतीच्या संधी मिळण्याच्या बाबत बहुसंख्य समूहाशी समान ठरतील अशा संधी या समूहाला पाहिजे असतात. या संधी समाजात मिळाव्यात म्हणून काही विशेषाधिकाराची मागणी या समाजाकडून केली जाते. एकाच राष्ट्रात राहून बहुसंख्याक समूहाच्या बरोबरीने प्रगती पथावर वाटचाल करण्यासाठी विशेष मागण्या करणे, स्वतःच्या हिताच्या संरक्षणासाठी विशेष हमी प्राप्त करणे यासाठी अल्पसंख्याक समूह सांप्रदायिक जाणीवेतून संघटित होतो. इतर बहुसंख्य समूहाबरोबर समान वागणूक आणि समान प्रगतीच्या संधी मिळाव्यात या उद्देशांच्या पूर्ततेसाठी अल्पसंख्याक समूह राजकारणात उतरतो. मुस्लिम समाजाने भारताच्या राष्ट्रीय आंदोलनाच्या राजकारणात याच उद्देशाने भाग घेतला व आपला उद्देश सफल करुन घेतला.

इस्लाम राष्ट्रवाद –

इस्लाम राष्ट्रवाद हा हिंदु राष्ट्रवादापेक्षा भिन्न व वैशिष्टचपूर्ण आहे. इस्लाम राष्ट्रवादाला ऐतिहासिक पार्श्वभूमी प्राप्त झाली होती. हिंदुस्थानामधील मुसलमानांचे साम्राज्य, धर्माची एकता, इस्लामवरील अभेद्य निष्ठा, मुसलमानातील परस्पर बंधुभावाची संकल्पना आणि सरतेशेवटी परकीय दास्यातून मुक्त होण्याची प्रभावी प्रेरणा हे इस्लाम राष्ट्रवादाचे प्रमुख घटक होते. म्हणून मुस्लिम समाजाने व्यावहारिक तडजोड म्हणून जरी ब्रिटिश राजवटीला सहकार्य करून सवलती मिळविण्याचा प्रयत्न केला होता, तरी त्यांना ब्रिटिश राजवटीच्या नियंत्रणापासून मुक्त होण्याची अभिलाषा होती. मुस्लिम समाजाचे स्वतंत्र अस्तित्व व परकीय नियंत्रणापासून मुक्तता याच प्रेरणेनुसार स्वातंत्र्यपूर्व मुस्लिम समाजाने हिंदुचा बहुसंख्याकाच्या वर्चस्वाविरूद्ध संघर्ष देऊन देशाची फाळणी घडवून आणली. परकीय समाजाच्या वर्चस्वासंबंधीची संभाव्य भीतीच फाळणीच्या वेळी मुसलमानाना एकत्र

आणण्यास कारणीभूत ठरली. अशा प्रकारे, स्वतंत्र अस्तित्वाची प्रखर जाणीव व परकीय राजवटीच्या तसेच परकीय समाजाच्या वर्चस्वापासून मुक्तता मिळविण्याची प्रेरणा इस्लाम राष्ट्रवादाचे मूलभूत घटक होते.

द्वि राष्ट्राचा सिद्धांताचा पुरस्कार करणाऱ्या मुस्लिम विचारवंतासमोर मुसलमान लोकाचे स्वतंत्र राष्ट्र हेच एकमेव ध्येय होते. मुसलमानाचे स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्व स्पष्ट करण्यासाठी मुस्लिम विचारवंताच्या पंथाने इस्लाम तत्वावर आधारलेले मुसलमानाचे स्वतंत्र राष्ट्र ही कल्पना मांडली. त्यामुळे संप्रदायवादी प्रतिक्रिया म्हणून हिंदु राष्ट्र किंवा हिंदु पदपादशाही ही संकल्पना पुढे आली व हिंदु संप्रदायवादाला ध्येयवादी विचारसरणीचें अधिष्ठान प्राप्त करून देण्याचा हिंदु विचारवंतानी प्रयत्न केला. या विचारवंतापैकी वीर सावरकर हे प्रमुख विचारवंत होते. त्यांनी हिंदुत्वाच्या प्रेरणावर आधारलेला मराठाशाहीचा इतिहास नव्या राष्ट्रीय दृष्टीकोनातून भारतीया समोर ठेवला. व हिंदुना राजकीयदृष्टया एकत्र होण्याचा अप्रत्यक्षपणे संदेश दिला. अर्थात पोथीनिष्ठ हिंदुत्वावादापेक्षा विभक्तवादी मुस्लिम चळवळ राजकीयदृष्टया प्रभावी ठरली. आणि द्वि राष्ट्राच्या सिद्धांतानुसार भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे जन्माला आली. भारतातील संप्रदायवाद ही क्रिया – प्रतिक्रिया या स्वरुपात कमीअधिक प्रमाणात प्रभावी ठरत गेला हे एक ऐतिहासिक सत्य आहे.

जीनाचा द्वि–राष्ट्र सिद्धांत –

मुस्लिम विचारप्रणालीच्या इतिहासात महमंद अली जीना यांच्या विचारप्रणालीला वैशिष्टचपूर्ण स्थान आहे. स्वतंत्र पाकिस्तानच्या संकल्पनेला उचलून धरणारे व जहाल संप्रदायवादाचा पुरस्कार करणारे जीना वस्तुतः युरोपीयन संस्कृतीचें अपत्य होते. प्रखर बुद्धिवाद व राजकीय व्यवहारवाद याचा संगम घडवून आणणारे महमंद अली जीना यांना इस्लाम धर्म व इस्लाम ध्येयवाद याविषयी प्रारंभीच्या काळात फारशी आस्था नव्हती. परंतु राजकारणातील शक्तीप्रवाह लक्षात घेऊन त्यांनी मुस्लिम संप्रदायवादाचा राजकीय उद्देशासाठी वापर करुन घेतला आणि स्वतंत्र पाकिस्तानचे स्वप्न साकार करून दाखविले. युरोपीय संस्कृतीचे संस्कार झालेले व पाश्चिमात शिक्षण प्रणालीचा प्रभाव

असलेले जीना भारतातील मुस्लिम जातीयवादाचे पुरस्कर्ते बनले द्वि राष्ट्रवादाचे कट्टर समर्थक ठरले.

बॅ. जीना यांनी १७ सप्टेम्बर १९४४ रोजी महात्मा गांधी यांना एक पत्र पाठविले त्यात त्यानी हिंदु व मुस्लिम दोन राष्ट्र असल्याचा दावा केला.

या पत्राने ते म्हणतात राष्ट्राची कोणतीही व्याख्या अथवा कसोटी घेतली तरी आम्ही हे सिद्ध करू शकतो की, हिंदु व मुस्लिम दोन राष्ट्र आहेत. आम्ही हजारोचे मिळून बनलेले राष्ट्र आहोत स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती, समाज, भाषा, साहित्य, शिल्पकला मूल्यपद्धती, कायदे नीतिनियम, परंपरा, दृष्टीकोन व आमच्या महत्वाकांक्षा सर्व गोष्टी आम्ही स्वतंत्र राष्ट्र आहोत हेच दर्शवितात. सारांश, आमचा जीवनाकडे पाहण्याचा व जीवनाचा स्वतःचाच वैशिष्ट्यपूर्ण दृष्टीकोन आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सर्व तत्व प्रवाह लक्षात घेता आम्ही एक राष्ट्र ठरतो.

१९४० च्या लाहोर अधिवेशनात मुस्लिम लिगच्या व्यासपीठावरुन बोलताना बॅ. जीना म्हणाले की इस्लाम व हिंदुवादाचे स्वरूप लक्षात घेण्याचे आमचे हिंदु मित्र का टाळत आहे. हिंदु व इस्लाम दोन धर्म नाहीत तर त्या दोन परस्पराशी भिन्नत्व दर्शविणाऱ्या सामाजिक व्यवस्था आहेत. हिंदु व मुस्लिम यानी समान राष्ट्रकाचे रूप धारण करणे म्हणजे केवळ स्वप्न रंजन आहे. हिंदु व मुस्लिम याचे दोन भिन्न धार्मिक तत्वज्ञान आहे, भिन्न सामाजिक परंपरा व साहित्य आहे ते परस्पराशी विवाहबद्ध होत नाही त्यांच्यात रोटीबेटी व्यवहार नाही.

बॅ जीना यांनी उत्साहानें पुढे मांडलेला द्वि राष्ट्राचा सिद्धांत विभक्तवादी प्रवृत्तीचें सिद्धांतीकरण आहे. ऑल इंडिया मुस्लिम लिगचे मार्च १९४० मध्ये लाहोर येथे अधिवेशन भरले होते. त्यात जीना यांनी स्पष्ट केले की, हिंदु बहुसंख्याकांचे शासन निर्माण करणारी राज्य घटना मुस्लिम स्वीकारणार नाहीत. अशा प्रकारची लोकशाही पद्धती मुस्लिमावर लादण्यात आली तर तिचा अर्थ हिंदु – राज लोकशाही असाच होईल. आणि त्यात इस्लामचा मुल्यवान ठेवा नष्ट होण्याचा धोका निर्माण होईल . . . . आम्हाला अडीच वर्षे प्रांतीय शासन चालविण्यात

आलेल्या अनुभवात या गोष्टीचा प्रत्यय आलेला आहे. पुन्हा त्याची पुनरावत्ती आम्ही होऊ देणार नाही. सारांश, बॅ. जीनाना मुस्लिमाना कनिष्ठ अथवा अल्प संख्याकाचा दर्जा देणारी कोणतीही राजकीय व्यवस्था मान्य नव्हती एका बाजूला त्यानी मुस्लिमासाठी स्वायत्त दर्जा मागीतला व दूसऱ्या बाजूने त्यांनी हिन्दू बरोबर मुस्लिमांना राजकीय व्यवस्थेत भागीदारी मागितली.

मार्च १९४० च्या ऑल इंडिया मुस्लिम लिगच्या अधिवेशनात त्यांनी मुस्लिम बहुसंख्य असलेल्या प्रदेशाचे मिळून स्वायत व सार्वभौम घटक राज्य स्थापन करण्यासाठी संविधानिक योजना आखावी अशी मागणी केली. भारतातील बहुसंख्य मुस्लिमाचे प्रदेश हे भारतीय समाजातील राष्ट्राचेच द्योतक आहेत हेही त्यांनी स्पष्ट केले.

बॅ. जीना यानी द्वि राष्ट्राची संकल्पना स्वीकारली नाही तर भारत विध्वंसाच्या गर्तेत पडेल असा गंभीर इशाराही दिला. जीना पुढे म्हणतात, अशा प्रकारे दोन राष्ट्र एकाच राज्यात एकत्र आणले तर एक संख्येने मोठे व दुसरे अल्पसंख्याक राष्ट्र यांच्यात असंतोष निर्माण होऊन त्याची परिणती विध्वंसात होईल.

द्विराष्ट्रवादाचा पुरस्कार करणे बॅ. जीना आणि इस्लाम राष्ट्र वादाच्या सांस्कृतिक, धार्मिक व ऐतिहासिक परंपराना महत्व देणारे इकबाल समन्वित व धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाला विरोध करणारे ठरले. इकबाल म्हणतात, " खरे महत्व माणसाची संस्कृति, धर्म आणि ऐतिहासिक परंपराचेच आहें.... ज्यांच्यासाठी जगावे व मरावे असे वाटावे अशा गोष्टी याच आहेत ज्या जमिनीच्या तुकडयाशी मानवाचा आत्मा तात्पूरता निगडीत झालेला असतो, तो नव्हे. "

समन्वित राष्ट्रवाद –

आधुनिक मुस्लिम विचारप्रणालीतील परंपरागत ज्ञानाचे स्त्रोताचा आधुनिक बुद्धिवादी ज्ञानाच्या स्त्रोताशी संगम घडवून आणणाऱ्या विचारवंताच्या गटात मौलाना अबुल कलाम अझाद यांना मानाचे स्थान द्यावे लागेल पूर्वजाच्या धार्मिक ज्ञानाचा वारसा टिकवून ठेऊन बुद्धिवादी विचार प्रणालीचा स्वीकार करणारे आझाद नव्या जुन्या विचार प्रणालीचा विलक्षण संगम घडवून आणतात. धार्मिक

परंपरावादाची आधुनिक विचारसरणीशी त्यांनी घातलेली सांगड समन्वयवादी विचारप्रवाहाची मुर्हुतमेढ रोवणारी ठरली. इस्लाम संस्कृतीतील परंपरागत मूल्याना धक्का न पोहचविता पाश्चिमात्य संस्कृतीतील बुद्धिवाद व आधुनिकतावाद त्यांनी स्वीकारला. परंतु इस्लाम संस्कृतीतील मूल्यावरील श्रद्धा त्यांनी ढळू दिली नाही. राष्ट्रीय जीवन स्त्रोतात हिन्दुस्थानी संस्कृतीचे महत्व स्पष्ट करताना त्यांनी भारतीय व इस्लाम संस्कृतीचे संयुक्त योगदान कसे महत्वाचे आहे हे त्यांनी पटवून देण्याचा प्रयत्न केला. हिन्दु मुस्लिम ऐक्याचा राजकीय दृष्टिकोनातून पुरस्कारकरणारे मौलाना आझाद भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे खंदे नेते म्हणून कार्य करीत राहिले. हिन्दु मुस्लिम ऐक्यावर आधारलेल्या समन्वयवादी राष्ट्रवादाचे ते पुरस्कर्ते होते. त्यांनी धर्मनिरपेक्ष व प्रादेशिक राष्ट्रवावाचा पुरस्कार केला.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात –

काँग्रेस मधील राष्ट्रवाद्यानी (१९३८) जमीयतच्या मदनीचा मूताहिदा कौमियतचा सिद्धांतातील काही तत्वे स्वीकारली. या सिद्धांतात समन्वित राष्ट्रवादाचा आशय स्पष्ट केला आहे तो असा, " आम्हा भारतीय नागरिकात एक समान वैशिष्ट्य आहे. धार्मिक व सांस्कृतिक भिन्नतेतही अविचल राहणारे आमचे भारतीयत्व.... भिन्नता आमच्या मातृभू विषयाच्या समान भाव–बंधनाच्या आड येऊ शकत नाही. म्हणूनच इतर मिल्ल ती सारखे..... मुसलमानांनीही राष्ट्रहिताची कळकळ बाळगून त्याला प्रतिबंध करणाऱ्या दुष्ट प्रवृत्तीशी दोन हात करावयाला हवेतच. मातृभूच्या सुखदुःखातील सहभागित्वातून उद्भवणारे हे कर्तव्य सर्वानाच बंधनकारक आहे.... धार्मिक मतभेद त्याच्या आड येऊ शकत नाहीत.....

बॅ. जीना एका बाजून सांप्रदायिक शक्तीवर आधारलेल्या इस्लाम राष्ट्रवादाचा पुरस्कार करत होते त्यावेळी राष्ट्रवादी व समन्वयवादी राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारे मुस्लिम नेते धर्मातील किंवा धर्म निरपेक्ष राष्ट्रवादाचा आशय स्पष्ट करत होते. त्याचा राष्ट्रवाद खालील तत्वावर आधारलेला होता.

१) हिंदुस्थान धर्म, वंश व संप्रदाय यानुसार संघटित झालेल्या

राष्ट्रांचे संघराज्य नाही तर ते एक प्रादेशिक राष्ट्र आहे.

२) हिंदुस्थानची संस्कृति, इस्लाम, हिंदु व पाश्चिमात्य संस्कृतीचा संगम दर्शविते. इस्लाम संस्कृती व हिंदु संस्कृतीने येथील सांस्कृतिक वारसा संमृद्ध बनविला आहे.

३) हिंदुस्थानातील सर्व धर्मियांच्या आकांक्षासमान असून त्यांचे भवितव्य समान आहे.

४) येथील सर्व धार्मिक गटाचे मूळ एक आहे व समान आहे. सर्वजण भारतीय भूमीशी एकात्म पावले आहे. त्याच्या पिढचान्‌पिढचा येथेच नांदत आल्या आहेत.

५) भारतीय इतिहास संघर्षाचे कांही प्रसंग उद्‌भवले असले तरी येथे एकत्र राहणाऱ्या सर्व धर्मिय लोकात एकीची भावना आहे. व एकीची भावना टिकू शकते.

६) भारतातील सर्व लोक एकाच परमेश्वराची लेकरे आहेत.

ब्रिटिश विरोधात हिंदु–मुस्लिम लोकांचे ऐक्य आवश्यक आहे हे स्पष्ट करण्यात आले. त्यावेळी असे स्पष्ट करण्यात आले की, देशाचे स्वातंत्र्य हे सर्व दृष्टीने महत्वाचे आहे परंतु नंतर जमियतने मुस्लिमाच्या मागण्या उचलून धरल्या व समन्वित राष्ट्रवादाचा सिद्धांत व्यर्थ ठरण्याची भीती निर्माण झाली. आझाद मुस्लिम कॉन्फरन्सचा सिद्धांत व्यर्थ ठरला. परंतु हे मत महत्वाचें ठरले.

राष्ट्रीय दृष्टचा प्रत्येक मुसलमान हा भारतीयच आहे. या देशाच्या सर्वनागरिकांचे हक्क व दायित्व.... एकच आहें. देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढा देऊन आत्मयज्ञ करण्याचे दायित्व इतरा इतकेच मुसलमानावर आहे. मुसलमान या नात्याने इस्लामच्या सांस्कृतिक वारशाचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य असून "मी एक भारतीय, भारताच्या अविभाज्य व एकात्म राष्ट्रीयत्वाचा एक घटक आहे.. ... हिंदुत्व हा येथील हजारो वर्षाचा धर्म असला तरी इस्लामही येथील हजार वर्षाचा धर्म आहे."

(आधुनिक भारत व इस्लाम ले. करंदीकर)

संप्रदायवाद –

भारतातील जातीयवाद हा जातिव्यवस्थेतील विविध विभागात

आढळतो तर संप्रदायवाद हा भारतातील विविध धार्मिक समूहात दिसून येतो. ही संप्रदायवादी भावना कमी अधिक प्रमाणात सर्व धार्मिक समूहात अस्तित्वात आहे. परंतु काही धार्मिक समूहात संप्रदायवाद केवळ विशिष्ट धार्मिक गटाच्या हिताशी संबंधीत असा संकुचित दृष्टीकोन घडवितो तर काही धार्मिक गटातील संप्रदायवाद 'जातीय दंगली' व धार्मिक संघर्ष याला कारणीभूत ठरत आहे. राष्ट्रीय समाजात फुटीर प्रवृत्ती निर्माण करण्यास संप्रदायवादी संघटनाही जबाबदार ठरत आहे. सारांश, संप्रदायवाद ही राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण करणारी शक्ती आहे. त्याचप्रमाणे सामाजिक एकतेला सुरुंग लावणारी ती एक प्रवृत्तीही आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात देशाची फाळणी करण्यास मुस्लिम संप्रदायवाद हेच प्रमुख कारण होते. स्वातंत्र्योत्तर काळात जमाते इस्लामी (Jamaat–e Ilslami) आणि मुस्लिम लिग प्रथगात्मतेच्या शक्तीची जोपासणा करीत आहेत.

भारतासारख्या बहुधार्मिक समाजात सांप्रदायिक गट आपले अस्तित्व व व्यक्तित्व जोमाने व जिद्दीने जोपासत आहे. प्रत्येक धार्मिक समूह एक संघटन म्हणून वावरत आहे. सांप्रदायिक गटात समान वैशिष्टचे व स्थिर संबंध आहे. समान वैशिष्टचात भागीदार असलेल्या व्यक्तीमध्ये स्थिर व स्थायी स्वरुपाचे संबंध प्रस्थापित करणाऱ्या गटाला सांप्रदायिक गट (Communal Groups) म्हणता येईल.

भारतातील धार्मिक समूहाची आकडेवारी
(१९७१ ची जनगणनानुसार)

हिंदु	४५३.३	मिल्यन
मुस्लिम	६१.४	,,
ख्रिश्चन	१४.२	,,
शिख	१०.४	,,
बौद्ध	३.८	,,
जैन	२.६	,,
इतर	२.२	,,

लोकसंख्या वाढीचा वेग (१९६१–७१)

हिंदु	२३.६९
मुस्लिम	३०.८५
ख्रिश्चन	३२.६०
शिख	३३.२८
बौद्ध	१७.२०
जैन	२८.४८
इतर	२६.१०

मुस्लिम समाजातील लोक भारतातील ३५६ जिल्ह्यात विखुरलेले आहेत. जम्मु आणि काश्मिरमध्ये मुस्लिम लोकाची लोकसंख्या १९६१ च्या जणगणनानुसार ६८ ३% होती, तर ओरिसामध्ये मुस्लिम लोकाची एकूण लोकसंख्या १.२३% होती. १९६१ आणि १९७१ च्या जनगणनेतील आकडेवारी लक्षात घेता खालील घटक राज्यात मुस्लिम लोकांची एकूण लोकसंख्येची टक्केवारी विचारात घेण्यासारखी आहे.

घटक राज्याचे नांव	एकूण मुस्लिम लोकसंख्येची टक्केवारी (१९६१)	(१९७१)
जम्मु आणि काश्मिर	६८.३०	६५.८५
आसाम	२३.२९	२४.०३
पश्चिम वंगाल	२०.००	२०.४६
केरळ	१७ ९०	१९.५०
उत्तर प्रदेश	१४.६३	१५.४८
बिहार	१२.४५	१३.४८

तिरस्कार व द्वेष यांची निर्मिती –

संप्रदायवाद हा विशिष्ट धार्मिक समूहातील स्वकीय सदस्यात समान धार्मिक श्रद्धांच्या आधारे स्नेहसंबंध तयार करेल. तर इतर धार्मिक पंथातील लोकाविषयी तिरस्काराची व द्वेषाची भावना निर्माण करेल. थोडक्यात संप्रदायवाद म्हणजे विशिष्ट धार्मिक संप्रदायातील लोकाविषयी वाटणारी आस्था आणि स्नेहाची भावना होय. संप्रदाय-

वादाची नकारात्मक बाजू द्वेषाची भावना दर्शविते. दुसऱ्या अर्थाने संप्रदायवाद म्हणजे एका संप्रदायातील लोकाची इतर संप्रदायातील लोकाविषयीची शत्रुत्वाची अथवा द्वेषाची भावना होय. संप्रदायवाद नेहमी धार्मिक समूहात तणावपूर्ण आणि संघर्षमय वातावरण निर्माण करतो. त्याचप्रमाणे धार्मिक समूहातील लोकात अलिप्तता अथवा पृथगात्मक वृत्तीला वाव देतो. संप्रदायवाद हा विशिष्ट गटातील लोकात संकुचित दृष्टीकोन निर्माण करतो. ज्या ठिकाणी संप्रदायवादाची प्रेरणा प्रभावी असते तेथे प्रत्येक संप्रदाय फक्त आपल्याच हिताचा व कल्याणाचा विचार करू लागतो. समाजातील सर्व लोकांच्या हिताची दृष्टी जोपसण्यास संप्रदायवाद अडथळा आणतो. तसेच धर्मनिरपेक्ष राजकीय व्यवस्थेच्या निर्मितीस संप्रदायवाद विरोधी ठरतो

हिंदु – मुस्लिम प्रश्न –

भारतातील हिंदु – मुस्लिम प्रश्न काही अमूर्त तत्वे अथवा सिद्धांत यानुसार सूटू शकले असे म्हणता येणार नाही. हिंदु – मुस्लिम प्रश्न दोन्ही समूहातील परस्पर सामंजस्यातून सूटू शकेल. त्यासाठी एक महत्वाची अट पाळणे आवश्यक ठरते. हिंदु – मुस्लिम समूहांनी परस्परावर सांप्रदायकतेचा आरोप व प्रत्यारोप करु नये व दोन्ही समूहांनी संप्रदायवादाचा (सर्व रूपात वावरणाऱ्या संप्रदायवाद) त्याग केला पाहिजे. संप्रदायवादाचा त्याग राजकारणात करणे आवश्यक आहे. कारण संप्रदायवाद हा भारतातील राजकीय रोग आहे. त्याचे काही सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक परिणाम आहेत. मुस्लिम पॉलिटिक्स इन इंडिया या ग्रंथात मुस्लिम सुधारक हमीद दलवाई यांनी म्हटले आहे की, " कोठे हिंदु जातीयवाद आहे, हेच मला दिसत नाही. खरा संघर्ष नेहरू व जीना, गांधी व जीना यांच्यात होता. सावरकर व गोळवलकर या चित्रात दिसत नाहीत. जीना हे सावरकर आणि गोळवलकर यांच्याशी लढत होते. त्यांनी त्यांच्या सांप्रदायिकतेचा उल्लेख कधीच केला नाही. जीना यांनी गांधीना हिंदु – जातीयवादी म्हणून दोषी ठरविले आणि त्यांच्या मागण्या फेटाळून लावल्या आहेत. याच दृष्टीकोनातून त्यानी नेहरुवर टीका केली. त्याचप्रमाणे ज्यावेळी मुस्लिम नेते देशातील फाळणीला जातीयवाद्याना जबाबदार धरतात तेव्हा ते

गांधी व नेहरू यांना जातीयवादी म्हणून सूचित करतात त्याचा अर्थ स्पष्ट आहे. ते प्रत्येक हिंदुला जातीयवादी म्हणून त्याच्यावर ठपका ठेवतात.

त्याच वेळी प्रत्येक मुसलमान हा राष्ट्रवादी आहे असा एक विलक्षण दावा ते करीत असतात.

हमीद दलवाई पुढे म्हणतात, " खरा संघर्ष हिंदु – मुस्लिम सांप्रदायवादात नाही. तो संघर्ष नेहरू – गांधी याचा निधर्मी राष्ट्रवाद आणि भारतीय मुस्लिमाचा धार्मिक राष्ट्रवाद यात आहे. हे खरे आहे की, गांधी व नेहरू निधर्मी एकात्मतेच्याद्वारे राष्ट्राचे अखंडत्व टीकविण्यात अयशस्वी झाले. परंतु हे अपयश फक्त त्यांचेच नाही हे आपल्या सर्वांचे सामूहिक अपयश आहे. निखालस वास्तवता ही आहे की, हे आव्हान स्वीकारण्याची क्षमता व पेलवण्याचे सामर्थ्य हिंदु समाजाजवळ नाही ही दुःखद वास्तवता गाधी, नेहरु आणि पटेल यांनी ओळखली होती. गांधी नेहरुवर कठोरपणे दोषारोप करणारे हिंदु – जातीयवादी ही वास्तवता ओळखण्यास तयार नाहीत ही आणखी मोठी दुःखाची गोष्ट आहे. "

सांप्रदायिक संघटना –

भारतातील जमात – ई – इस्लामी, मुस्लिम मजलिस इ. मुशावरत, तमीर – इ – मिलत आणि मुस्लिम मजलिस या मुसलमानाच्या संघटना धर्मनिरपेक्ष राजकारणापेक्षा सांप्रदायिक राजकारणाला प्राधान्य देतात. दुसऱ्या शब्दात वैफल्यग्रस्त व भाबावलेल्या मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावनांना अवाहन करुन त्यांना संकुचित स्वार्थासाठी संघटित करतात. या संघटना धार्मिक नसून सांप्रदायिक आहेत त्याची उद्दिष्टचे जरी धार्मिक भासत असली तर त्यांच्या प्रेरणा मात्र सांप्रदायिक स्वत्रपाच्या आहेत. केवळ संप्रदायवादाला खतपाणी घालून तात्कालिक स्वार्थ साधणे हे या संघटनाचे व त्यांच्या नेत्याचे प्रमुख कार्य आहे. दबाव गट म्हणून निरनिराळ्या राजकीय पक्षाशी निरनिराळ्या ठिकाणी हातमिळवणी करून हितसंबंधाची जोपासणा करणे या एकमेव उद्देशासाठीच राजकीय क्षेत्रात या संघटना धुर्त नेत्याकडून वापरल्या जातात.

निरनिराळ्या मुस्लिम संघटनाचे जेष्ठ नेते राजकीय सामाजिक क्षेत्रात ज्या भूमिका वठवितात त्यावरुन तरी मुस्लिम संघटनाचे नेते मुस्लिम समाजाला आदर्श नेतृत्व देत आहेत असे म्हणता येत नाही. आधुनिक काळातील मुस्लिम समाजाच्या समस्याचा अभ्यास करणे, या समस्या बद्दल मुसलमान लोकांना जागरूक करणे, त्यांचे राजकीय व सामाजिक दृष्टिकोन बदलणे, त्याच्यापुढे बुद्धिवादाचा व धर्मनिरपेक्ष दृष्टि ठेवणे, लोकशाही समाजवादाची नवी मूल्य त्यांच्या गळी उतरविणे या सारखी काही कार्य मुस्लिम समाजातील संघटनाकडून अपेक्षित आहे परंतु मुस्लिम नेतृत्व याच ठिकाणी दुर्दैवाने कमी पडत आहे. सांप्रदायवादी प्रवृत्तीने पछाडलेले तात्कालिक स्वार्थाने प्रेरित झालेले, अपरिपक्व मुस्लिम नेतृत्वच मुसलमान समाजाची सर्व क्षेत्रात पिच्छेहाट करीत आहे, संप्रदायवादाच्या व कालबाह्य विचारप्रणालीच्या चौकटीत मुस्लिम समाजाला बंदीस्त ठेवून, मुस्लिम नेते मुस्लिम समाजाचे अपरिमित नुकसान करीत आहेत असे दिसून येते.

मुस्लिम समाजातील जेष्ठ जनानी मुसलमान लोकाना राष्ट्रीय जीवनात सहभागी करून घेतले पाहिजे. त्यांच्यात लोकशाही मुल्याबद्दल जाणीव निर्माण केली पाहिजे. शिक्षण व व्यवसाय या क्षेत्रात मुसलमान लोकांनी प्रगती केली पाहिजे. सार्वजनिक क्षेत्रातील प्रश्नाकडे व राजकारणाकडे मुसलमान लोक धर्मनिरपेक्ष व बुद्धिवादी दृष्टीने पाहतील त्याच वेळी त्यांना खऱ्या अर्थाने राजकारणात व सार्वजनिक क्षेत्रात इतर समाजातील लोकाप्रमाणे स्थान मिळू शकेल. एका बंदीस्त गटाचें सदस्य म्हणून व संप्रदायवादाचे घटक म्हणून ते आज जी भूमिका वठवित आहे ती भूमिका त्यांनी बदलली पाहिजे. हे कार्य मुस्लिम समाजातील सुशिक्षित लोकाना करावे लागेल.

मुस्लिम समाज व आधुनिकता –

मुस्लिम समाज आधुनिकतेच्या मार्गापासून दुर जात आहे याला कारण या समाजाचा मध्ययुगीन प्रतिगामी वारसा व वारसा जपणारे प्रतिगामी नेतृत्व. मुस्लिम समाजातील लोक भूतकाळातील कालबाह्य विचारप्रवाहाचा त्याग करण्यास तयार नाहीत. आधुनिक काळातील नव्या विचारप्रवाहाचे सहर्ष स्वागत करण्यास मुस्लिम मन धजत नाही

जून्याचा त्याग व नव्याचा स्वीकार करण्याची मनोवृत्तीचा अभाव असल्यामुळेच मुस्लिम समूहातील लोकांची सामाजिक व राजकीय विचारसरणी कालबाह्य, प्रतिगामी विचार प्रवाहाच्या कचाटचात सापडली आहे कोणत्याही प्रश्नाचा विचार कुराणातील तात्विक चौकटीच्या संदर्भात होत असल्यामुळे नवे प्रश्न नव्या दृष्टिकोनातून सोडण्याची मुसलमान लोकांची तयारी नाही म्हणूनच आधुनिक काळातील नवी आव्हाने स्वीकारण्यास मुसलमान तयार होत नाही. मग भूतकाळातील कल्पनाना चिकटून राहून इस्लाम व्यवस्थेशी प्रामाणिक राहण्याचा ते प्रयत्न करतात. दुर्दैवाने मुस्लिम अल्पसंख्याक गटाचे नेतृत्वात दूर दृष्टि, व्यवहारचातूर्य आणि गतिशीलता नसल्यामुळे ते अल्पसंख्याका पुढील समस्या त्याच्याच लोकासमोर निर्भयपणे मांडू शकत नाहीत. या उलट जून्या विचारसरणीच्या चौकटीतच सर्व प्रश्नाकडे पाहण्याची प्रवृत्ती मुस्लिम नेत्याकडून जोपासली जाते.

'सुधारणा' एक वादग्रस्त प्रश्न –

परंपरावादी व धार्मिक मनोवृत्तीच्या मुस्लिम समाजात सुधारणा कशी करावयाची हा एक गंभीर व वादग्रस्त प्रश्न आहे. मुस्लिम समाजातील आधुनिक विचारवंत आणि सुधारक यांच्या पुढील महत्वाचा पेच प्रसंग म्हणजे मुस्लिम समाज व्यवस्थेत सुधारणा करावयाची झाल्यास त्यांना या समाजातील सामाजिक परंपराना तसेच कुराण व सुन्ना यांच्या तत्वानाच आव्हान द्यावे लागते आणि मग संघर्ष निर्माण होतो. मोहमेदन पर्सनल लॉ हा धर्मतः पूज्यणीय असल्यामुळे त्यात बदल करता येणे शक्य नाही, असा एक मतप्रवाह एक परंपरावादी गटाकडून पुढे मांडला जातो तर आधुनिकवादी गटाच्या मतानुसार मुस्लिमाचा पर्सनल लॉ हा कायदाच असल्यामुळे त्यात विधिमंडळ आणि न्यायमंडळ बदल करू शकते. अर्थात या परस्परविरोधी मतप्रवाहात तडजोड घडवून आणण्यासाठी सर्व संमतीने सुधारणा घडवून आणावी परंतु 'सुधारणेच्या' प्रश्नावर सर्व समंतीने तोडगा काढणे शक्य होत नाही.

मुस्लिम समाजात सुधारणा घडवून आणतांना काही महत्वाचे प्रश्न उपस्थित झाले. सुधारणाना आक्षेप घेताना असे मत मांडण्यात आले की, सामाजिक नीतिमत्ता, सामाजिक संस्था आणि कायदा हे

तत्वत: इस्लाम धर्म व्यवस्थेची कार्ये आहेत तसेच मुस्लिम समाजातील लोकांना असा संशय येतो की, सुधारणावादाचा स्वीकार केल्यास आपले 'हिंदुकरण' होईल म्हणूनच मुसलमान लोकाकडून 'सुधारणेला' विरोध केला जातो.

मुस्लिम समाजात धर्म सुधारणेची मोहिम कार्यान्वित झालेली नाही. धर्म – सुधारणा म्हणजे कुराणात – धर्म ग्रंथात सुधारणा. ही सुधारणा धर्म श्रद्धेशी विसंगत व विरोधी म्हणून मान्य केली जात नाही. धर्म श्रद्धेने मुस्लिम समाजाच्या सर्व अंगाना व्यापून टाकले आहे म्हणूनच धर्म सुधारणे शिवाय समाजसुधारणा करणे अशक्य होऊन बसते. एकाचवेळी धर्म सुधारणा, समाज सुधारणा व राजकीय सुधारणा करण्यासाठी सर्वांगीण सुधारणेची मोहिम हाती घेणे आवश्यक आहे परंतु मुस्लिम समाजाला धर्म सुधारणा मुख्यत: अमान्य असल्यामुळे त्याच्याशी सलग्न अशा इतर सुधारणा करणे अवघड होऊन बसले आहे. हिंदुसमाजात ज्या प्रमाणे सर्वांगीण सुधारणेची मोहिम सुरू झाली व सुधारणेचे वारे सर्वत्र वाहू लागले तशी सर्वांगीण सुधारणेची चळवळ भारतातील मुस्लिम समाजात मूळ धरू शकली नाही. अर्थात मुस्लिम समाजातील प्रमुख व्यक्तीनी मुस्लिम समाजातील सुधारणेसंबंधी चर्चासत्र घडवून आणली. Internalionalist Congress of Orientalists मध्ये काही मुस्लिम व्यक्तीनी दिल्ली येथे १९६४ साली Changes in Muslim Personal Law या विषयावर चर्चा केली तसेच १९६९ साली A Uniform Civil code for India या विषयावर चर्चा करण्यात आली परंतु या दोन्ही चर्चासत्रात सुधारणे संबंधी सर्वमान्य अशा व्यवहार्य शिफारशी व सूचना करण्यात अपयशच आले.

'उर्दू' भाषेचा प्रश्न –

मुस्लिम अल्पसंख्याक एकाच वेळी धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांक गट म्हणून ओळखला जातो. अर्थात भारतात सर्वत्र विखुरले गेलेले मुसलमान काही अशी प्रादेशिक भाषा व काही अंशी हिन्दी व इंग्रजी भाषा आत्मसात करतात परंतु या अल्पसंख्याक गटाला 'उर्दू' भाषा ही आपली भाषा वाटते. उर्दू भाषेला उचित स्थान दिले जात नाही ही मुसलमानाची प्रमुख तक्रार आहे. त्याच प्रमाणे त्याना

उर्दू भाषेच्या अस्तित्वाची व भवितव्याची काळजी वाटते उर्दू भाषेचा प्रश्न मुस्लिम अल्पसंख्याकाच्या दृष्टिने जिव्हाळ्याचा व काळजीचा विषय आहे. शासनाकडून 'उर्दू' भाषेच्या विकासाकडे दूर्लक्ष होत आहे हा मुस्लिम अल्पसंख्याकाचा एक आरोप आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने अल्पसंख्याकांच्या हिताचे रक्षण करण्याचे वचन दिले पण ते प्रामाणिकपणे पाळले नाही असा मुस्लिम नेत्याचा आरोप आहे. विविध भाषिक गटाची संस्कृति, भाषा व लिपी यांचे रक्षण केले जाईल असा ठराव नेहरूच्या पाठिब्यानिशी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने संमत केला परंतु या पक्षाच्या हाती सत्ता आल्यानंतर या पक्षाने उर्दूकडे दुर्लक्ष केले. विविध भाषिक, सांस्कृतिक व धार्मिक गटाची विविधता कायम ठेऊन त्यांच्यात एकात्मता निर्माण केली जाईल हे आश्वासनच रहिले राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रीय एकरूपता या दोन्ही संकल्पनांचा गोंधळ मात्र काँग्रेस पक्षाने निर्माण केला.

सांप्रदायवादाला पायबंद घालण्यासाठी उपाय –

१) हिंदु व मुस्लिम दोन्ही समूहानी आपल्या संस्कृतीवद्दल अतिरेकी अभिमान बाळगू नये अर्थात दोन्ही समूहाना आपल्या संस्कृतीचे संवर्धन व संरक्षण करण्याचा हक्क असावा.

२) वाजपेयीच्या मते पक्षानी विशेषतः अल्पसंख्याकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पक्षांनी खास विशेषाधिकाराची मागणी करु नये. राष्ट्रहिताची जाणीव जोपासावी ज्यात संप्रदायाच्या भावनेला फारसा वाव देऊ नये. त्यांच्या मते शासकीय सेवेत अल्पसंख्याकाना अधिक वाटा देणेही सूज्ञपणाचे ठरणार नाही. सारांश, धर्मावर आधारलेल्या राखीव जागा ठेवण्याचे बंद केले पाहिजे.

३) अल्प संख्याकाच्या हिताकडे दूर्लक्ष होता कामा नये कारण त्यामुळेच अल्पसंख्याक गट आपल्या हितासाठी पक्ष संघटना उभारण्यास उद्युक्त होतो.

४) धार्मिक संघटनांनी सांप्रदायिक विचार प्रणालीचा प्रचार करु नये. संप्रदायवादाचा प्रचार व प्रसार राजकीय पक्षानीही करू नये.


५) सांप्रदायवादाला प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे खतपाणी घालणाऱ्या राजकीय पक्षाना मान्यताप्राप्त म्हणून दर्जा देण्यात येऊ नये.

६) संप्रदायवादाच्या आधारे राजकारण करण्याची प्रवृत्तीय सांप्रदायिक प्रश्न निर्माण करण्यास कारणीभूत ठरतें असे आचार्य कृपलानीचे मत आहे. सारांश, राजकीय पक्षांनी संप्रदायवादाच्या आधारे राजकारण करण्याची प्रवृत्तीचा त्याग केला पाहिजे.

सार्वत्रिक निवडणुकीतील उमेदवारी व मतदार संघ याचा सांप्रदायिक दृष्टिने पक्ष नेत्यानी विचार करु नये. मुस्लिम ज्या ठिकाणी जास्त संख्येने असतील तेथे मुस्लिम उमेदवार निवडणुकीसाठी उभा केला जातो. निवडणुकीच्या राजकारणात सांप्रदायिक शक्तीचा तात्कालिक राजकीय फायदे मिळण्याचे प्रयत्न सर्व पक्षाकडून केले जातात त्यामुळे संप्रदायवादी प्रवृत्तीत वाढ होते. म्हणून सार्वत्रिक निवडणुकीच्या राजकारणात संप्रदायवादाला स्थान देऊ नये.

केवळ राजकीय फायदे मिळविण्यासाठी राजकीय पक्षाकडून सांप्रदायिक हिताच्या संरक्षणासाठी सवलती दिल्या जातात. तसेच एखाद्या सांप्रदायिक प्रश्नाचे राजकीय भांडवल करण्याचा प्रयत्न राजकीय पक्षाकडून होतो. त्याचा परिणाम स्वरूप सांप्रदायिक राजकारणाला प्रोत्साहन मिळते.

भारतीय राजकारणात सांप्रदायिक संघटना राजकीय समस्या ठरल्या आहेत. त्याच्यावर कायद्याने बंदी घालण्याऐवजी लोकशाही मार्गाने राजकीय आघाडीवर या सांप्रदायिक शक्तीशी तोंड देण्याची तयारी राजकीय पक्षानी दाखविली पाहिजे.



७. हिन्दुवाद
HINDUISM

" हिंदुवाद " ही संकल्पना एकाच वेळी धार्मिक संप्रदायाला व राजकीय समुदायाला जोडणारी आहे. हिंदु धर्मातील तत्वापेक्षा हिंदु धर्म संप्रदायाचे धार्मिक व राजकीय अधिष्ठान स्पष्ट करणारी ही संज्ञा राजकीयदृष्ट्या वादग्रस्त ठरली आहे. कारण हिंदुवाद आणि हिंदु संप्रदायवाद या दोन्ही संज्ञा समान अर्थाने वापरल्या जातात किंवा राजकीय हेतुने हिंदुवाद ही विचारप्रणाली हिंदु संप्रदायवादाचा आशय व्यक्त करणारी असल्याचा प्रचार व प्रसार झाल्यामुळे ' हिंदुवाद ' या संज्ञेबद्दल बरेच बरेवाईट गैरसमज निर्माण झालेले आहेत. राजकारणाच्या आखाड्यात हिंदुवाद व हिंदुवादाचा पुरस्कार करणाऱ्या संघटनाना संप्रदायवादी अथवा जातीयवादी म्हणून धिक्कारले जाते. याचे प्रमुख कारण म्हणजे ' हिंदु ' ही संज्ञा विशिष्ट धर्म संप्रदायाशी संबंधीत आहे. हिंदुवाद एका विशिष्ट धर्माच्या मर्यादित वावरणाऱ्या विशिष्ट समूहाला उद्देशून वापरला गेला. ' हिंदुवाद ' हा एक राजकीय विचारप्रवाह धार्मिकदृष्टया भिन्न अशा मानवी समूहाचे धार्मिक, सामाजिक आणि राजकीय स्वरूप स्पष्ट करणारा आहे असे मानले जाते किंवा तसा आभास निर्माण केला जातो.

' हिंदु – राष्ट्र '

महात्मा गांधीची ' राम राज्याची ' संकल्पना आदर्श राज्याचे स्वरुप स्पष्ट करणारी असूनही ' प्रतिगामी ' ठरविण्यात आली तसेच हिंदु राष्ट्राची संकल्पनाही ' प्रतिगामी ' म्हणून संबोधली जाते. हिंदु–राष्ट्राची संकल्पना सावरकराना तरी हिंदु परंपरेशी व हिंदु सांस्कृतिक राष्ट्रवादाशी सुसंगत वाटत होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंदु राष्ट्राच्या संकल्पनेला उचलून धरतो. परंतु संघाला देखील हिंदु–राष्ट्र ही धर्मसत्ताक राज्याची संकल्पना म्हणून मान्य नाही. भारतीय सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या अधिष्ठान असलेली हिंदु राष्ट्र समाजाची संकल्पना संघ मान्य करतो. म्हणूनच हिंदु राष्ट्राशी संबंधीत पारंपरिक प्रतीके, भगवा झेंडा, दसरा विजयोत्सक राष्ट्र धर्माचे ऐतिहासिक प्रतीक शिवाजी इत्यादीचा संघाने वापर केलेला दिसून येतो. इस्लाम धर्मसत्ताक राज्यापेक्षा हिंदु–राष्ट्र भिन्न असेल असे राष्ट्रीय स्वयंसेवके संघाची विचारसरणी स्पष्ट करते. सारांश संघाने हिंदु राष्ट्रवाद एक सांस्कृतिक आदर्श म्हणून स्वीकारला आहे असे म्हणता येईल अर्थात हा वादाचा प्रश्न ठरु शकतो.

' हिंदु ' एक वादग्रस्त संज्ञा

भारतीय राजकारणात काही संज्ञा संप्रदायवादी म्हणून समजल्या जातात किंवा त्या अर्थाने त्या संज्ञाकडे पाहिले जाते. उदाहरणार्थ हिंदु व हिंदुवाद याच्याशी संप्रदायवादाचा आशय निगडीत करण्यात येतो. परंतु हिंदु संस्कृतीशी संबंधीत अशा संज्ञा मात्र व्यवहारात संप्रदायवादी ठरत नाहीत. उदाहरणार्थ आर्य समाजतील सदस्य 'आर्यवर्त' ही संज्ञा आर्य भूमीच्या संदर्भात वापरतात. हिंदु समाजाच्या प्राचीन इतिहास ' आर्य ' ही वांशिक संज्ञा म्हणून वापरण्यात आली. अर्थात आर्य व अनार्य / द्रविड या संज्ञा वंशवादाच्या संदर्भातही कमी महत्वाच्या ठरतात. त्याचे महत्व नष्ट झालेले आहे. त्याचप्रमाणे ' हिंदु ' या संज्ञेचा वापर राष्ट्रीय स्वयंसेवक व हिंदु महासभा व विश्व हिंदु परिषद या संघटनेकडून केला जातो अर्थात हिंदु हा शब्द परकीय आहे. कारण झोरोस्ट्रीम व परशियन सिंधुचा उच्चार हिंदु असा करतात. 'इंडिया हा शब्द हिंदु शब्दाचे ग्रीक रूपांतर आहे. सारांश

हिंदु शब्दाला धर्म समूहाचा अर्थ लावण्याचा जो प्रकार रूढ झाला आहे. त्यानुसार हिंदु ही संज्ञा एका धार्मिक समूहाचे स्वतंत्र अस्तित्व व भिन्नत्व स्पष्ट करणारी ठरली आहे.

राष्ट्रवादाला धार्मिक अधिष्ठान –

हिंदु महासभेने भारतीय राष्ट्रवादाला धार्मिक अधिष्ठान दिले व राष्ट्रवादातील समान सास्कृतिक आशय स्पष्ट केला. कारण विविधतेने नटलेल्या व विभागलेला भारतीय समाज हा बहुजिनसी समाज आहे. समान धर्म श्रद्धेनेचे या समाजाला एका राष्ट्रीय सत्रात गोवता येणे शक्य आहे. बहुसंख्याकांच्या समान हिंदु श्रद्धा हे एक सामर्थ्याचे व एकतेचे प्रतीक आहे असे हिंदुवाद्याना वाटत होते म्हणून त्यावेळच्या हिंदु विद्वानांनी भारतीय राष्ट्रवादातील समान धर्माचा व समान सांस्कृतिक परंपेराच्या प्रेरणा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. जहाल पंथातील हिंदु पुनरूज्जीवनवादी हिंदुच्या हिंदुस्थानाची सांस्कृतिक आस्मिता जोपासण्याचा प्रयत्न करीत होते. भारताच्या प्राचीनतम वैभवशाली वारस भारतीय जनतेला समजून सांगत होते. वैदिक व्यवस्थेतील राष्ट्रवादाची कल्पना नव्या संदर्भात मांडत होते. भारतातील इतिहासकार आर. सी. मजूमदार यांनी म्हटले आहे

" The common heritage of a great culture and rich historical tradition imbued the Hindus with an idea of common nationality. The revelation of India's past, supplemented by the common bond of common religion, served to bring them together, and their mutuai intercourse was facilitated by the use of English as lingua franca and easy means of communication through railways, steamers, cheap postage and telegraphs. Nationalism was thus founded on the fedrock of common religion, culture and historical tradition. But this gave it a Hindu charactor which it has retained, consciously or unconsciously, clear since. "

हिंदु पुनरुज्जीवनवाद हे भारतीय राष्ट्रवादाचें एकमेव वैशिष्टच नव्हते. परंतु अनेक वैशिष्ठचापैकी ते एक वैशिष्टच होते व आहे. जहालवादी नेत्याच्या विचारसरणीतील आणि आर्य समाजाच्या कार्यातील हिंदू पुनरूज्जीवनवाद संप्रदायवादी नव्हता संप्रदायवादाच्या दोषापासून तो मुक्त राहिला. परंतु हिंदुवाद मात्र संप्रदायवादी शक्तीच्या प्रभावाखाली गेला. मुस्लिम संप्रदायवादाला विरोध करणारी हिंदु महासभेची विचारसरणीला संप्रदायवादाचा रोग जडला. संप्रदायवाद हा संसर्गजन्य रोगाप्रमाणे विविध संघटनाच्या विचारसरणीत फैलावला. वैदिक राष्ट्रवाद हिंदु पुनरुज्जीवनवादाचा एक भाग ठरतो. परंतु हिंदु संघटनेचे व हिंदु राज्याचे ध्येय समोर ठेवणारा हिंदुवाद संप्रदायवाद ठरतो याची कारणे स्वातंत्र्य लढ्यातील परिस्थितीत व विचारप्रवाहात शोधावी लागतील. तत्कालीन राजकारणातील हिंदु मुस्लिम राजकारण हेही त्याचे एक कारण आहे.

' हिंदुइझम ' चा व्यापक अर्थ –

स्वातंत्र्यवीर सावरकरानाही आपल्या राजकीय लिखानात ' हिंदुइझम ' या शब्दाचा आशय सांगताना, हिंदुस्थानातील प्राचीन धर्मातून अस्तित्वात आलेल्या विविध पंथाची एकता स्पष्ट केली. त्यानी हिंदु राज्यापेक्षा (Hindu Polity) हिंदु समाजाचे चित्र रेखाटले. या हिंदु समाजात भारतातील विविध श्रद्धा बाळगणारे धार्मिक पंथ समाविष्ट होतील असें त्यांनी सूचविले. या हिंदु समाजात अर्थात ख्रिश्चन व इस्लाम धर्माचा समावेश होऊ शकत नाही. कारण हे दोन्ही धर्म पंथ देशाबाहेर उदयास आले व परकीय आक्रमणातून त्याचा भारतात शिरकाव झाला असे सावरकर भासवितात. सावरकर म्हणतात, " वरीलप्रमाणे, मने बिघडविण्याचे कारण म्हणजे बहुसंख्यांक लोकांच्या धर्माचारालाच फक्त ' हिंदुइझम ' हा शब्द लावण्याची चूक झाली हे होय. याला उपाय म्हणजे एक तर आपण या शब्दाचा उपयोग हिंदु लोकांच्या सर्व धर्मपंथाना संबोधण्यासाठी करावा, अथवा ते जर आपणास करता न आले तर हा शब्दच मुळी गाळून टाकावा. बहुसंख्याक हिंदु लोकाच्या धर्म पंथाला पूर्वीपासून चालत आलेले सार्थ नांव जे सनातन धर्म अथवा श्रुती–स्मृति पुराणोक्त धर्म किंवा वैदिक

धर्म यापैकी कोणतेही नांव लावावे व बाकीच्या हिंदु लोकांना त्यांच्या सर्वमान्य प्रचलित नावाने म्हणजे शीखधर्मी आर्यधर्मी किंवा जैन आणि बुद्धधर्मी अशा नावाने संबोधावे ज्यावेळी या धर्माना एक समयावच्छेदेकरून संबोधण्याचे प्रसंग येतील त्याच वेळी फक्त त्या सर्वांना हिंदु धर्म अथवा हिंदुइझम असे म्हणावे. असे केल्याने कोणत्याही प्रकारे स्पष्टार्थाला किंवा सद्सद्विवेक बुद्धीला धक्का न बसता उलट त्यायोगे काटेकोरपणा व असंदिग्धता हीच अधिक स्पष्ट होतील. त्या योगाने अल्पसंख्याक लोकांच्या मनातील संशय व बहुसंख्याक लोकांच्या मनातील राग ही दोन्हीही नष्ट होऊन आपण अखिल हिंदु जातीला पुन: एकदा एकजीव व्हावयास सापडून एक जातीच्या व एकजीव संस्कृतीच्या पुराणपवित्र वैभवशाली निशाणाखाली आपण पुनरपि नांदू लागू"

हिंदु राष्ट्र : एक एकजिनसी राष्ट्र –

हिंदु महासभेने मुस्लिम लिगच्या पाकिस्तानच्या मागणीला विरोध केला. या पक्षातील नेत्यांचा देशाच्या फाळणीला प्रखर विरोध होता. सावरकर तर म्हणत असत एक मातृभूमि भारत ही आमच्यासाठी एकच व अविभाज्यनीय आहे. वैदिक काळापासून आजतागायत हिंदुस्थानची एकता ही वस्तुस्थिति आहे. म्हणूनच हिंदु महासभेचा असा युक्तिवाद होता की हिंदु लोक देशाची फाळणी सहन करणार नाहीत, मान्यही करणार नाहीत.

सावरकरासमोर हिंदु राज्याचे पुसटशे संदिग्ध असे चित्र होते. त्यांच्या मते हिंदुचे हे राष्ट्र आहे संपूर्ण भारत ही त्याची पवित्र भूमि आहे. भारतात हिंदुचें स्वतंत्र राष्ट्र बनू शकते. ते म्हणत की, आमच्या जवळ केवळसमान पितृभूमि व समान प्रादेशिक एकता आहे असे नव्हे तर जगात इतरत्र ठिकाणी क्वचितच आढळणारी समान पवित्र भूमि आहे आणि ही समान पवित्र भूमि हीच आमची पितृभूमि आहे. हिंदुस्थान एक मातृभूमि हीचभारताची पितृभूमि व पुण्यभूमि आहे. आमचे समान ऋणानुबंध, समान सस्कृति समान धर्म, समान इतिहास, समान वंश यांनी शतकानुशतके एकत्रितरित्या व हिंदु लोकाना एक जिनसी व सेन्द्रीय राष्ट्र म्हणून घडविले आहे.

हिंदु महासभेची हिंदु राष्ट्रासंबंधीची विचारसरणीच हिंदु लोकांचे एक स्वतंत्र राष्ट्र आहे या संकल्पनेला मान्यता देते त्यातून भारतातील मुस्लिम लोक हिंदु राष्ट्रकाच्या कक्षेतून बाहेर आहेत असे दर्शविले जाते. मुस्लिम हे हिंदु राष्ट्रकाचे अविभाज्य व अंगभूत असे अंग मानले नाही तर त्यांचे स्वतंत्र राष्ट्र आहे असाच अन्वयार्थ हिंदुवादी विचारसरणीतून निघतो. अशा प्रकारे मुस्लिमाचे एक स्वतंत्र राष्ट्र आहे त्याचा स्वतंत्र राष्ट्रवाद आहे याला हिंदु महासभेच्या विचार सरणीने खतपाणी घातले. अप्रत्यक्षरित्या भारतीय मुस्लिम हे एक राष्ट्र होऊ शकते हे सावरकरांनी मान्य केले परंतु त्यांना फाळणी मान्य नव्हती. देशाचे हिंदु मुस्लिम लोकात तुकडे व्हावेत, हे त्याना मान्य नव्हते. मुस्लिमानी याठिकाणी अल्पसंख्य म्हणून राहावे परंतु स्वत: राष्ट्र म्हणून देशांतर्गत स्वतंत्र राष्ट्राची मागणी करू नये ही सावरकरांची भूमिका होती. अशा प्रकारे हिंदु राष्ट्र राज्याची हिंदु महासभेची संकल्पना राष्ट्रीय एकतेला हिंदु मुस्लिम एकतेला घातक ठरली हिंदु लोकांच्या स्वसंरक्षणार्थ पुढे मांडलेली, हिंदु राज्याची कल्पना आत्मघातकी ठरुन फाळणीला ती पोषक ठरावी ही एक दुर्दैवी अशी घटना होय हिंदुमहासभेच्या विचारसरणीतील अंगभूत धोके या विचारसरणीतील दोषापेक्षा भयानक परिणाम घडवून आणणारे ठरले.

हिंदु आणि हिंदुवाद –

स्वातंत्र्य वीर सावरकर यांनी हिंदुत्व या पुस्तकात हिंदुवादाचा अर्थ स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते " हिंदुवाद हा हिंदुचा ' वाद ' आहे आणि हिंदु हा शब्द सिंधुपासून तयार झालेला असल्यामुळे ' इंदूस ' किंवा हिंदु म्हणजे सिंधुनदीपासून सिंधु समुद्रापर्यंतच्या भूप्रदेशावर राहणाऱ्या सर्व लोकांना हिंदु म्हणता येईल " अर्थात हिंदुवाद हा या भूमिवरील धर्म किंवा इतर धर्माशी संबंधित आहे. हे वीर सावरकरानी स्पष्ट केले हिंदु राष्ट्राशी विसंगत व विरोधी असा राष्ट्राचा अथवा धार्मिक संप्रदायाचा आशय व्यक्त करणारा कोणताच विचारप्रवाह सावरकराना मान्य नव्हता. हिंदु या शब्दाचा अर्थ स्पष्प करताना ते म्हणतात

आसिंधु सिंधु: पर्यन्ता यस्य भारत भूमिका ।
पितृभू: पुण्यभूरचैव स वै हिंदुरिति स्मृत: ॥

हिंदु म्हणजे अशी व्यक्ती जी सिंधुपासून समुद्रापर्यंतच्या भूमीला पितृभूमी तसेच पवित्र भूमी म्हणून भारत राष्ट्र मानते. हिच त्या व्यक्तीच्या धर्माची जन्मभूमी आहे. सारांश वीर सावरकरांना केवळ प्रादेशिक राष्ट्रवाद मान्य नाही. कारण केवळ प्रादेशिक निष्ठा भिन्न धर्मिय लोकात, भिन्न सांस्कृतिक समूहात व भिन्न वांशिक समूहात राष्ट्रभावना निर्माण करू शकत नाही. धर्म ही शक्ती समधर्मीय लोकांना जोडणारी व भिन्न धर्मीय समूहाना विभागणारी शक्तीच असते.

हिंदु पुनरूज्जीवनवादी विचारप्रवाहापैकीच एक विचारप्रवाह म्हणून हिंदुवादाला ओळखले जाते. हिंदु-राष्ट्र व गांधीची राम-राज्याची संकल्पना गौरवशाली वैदिक इतिहास व प्राचीन इतिहास याच्याशी संबंधीत आहे. हिंदुस्थानाची प्राचीन संस्कृती, प्राचीन भाषा (संस्कृत) प्राचीन धर्म (वैदिक धर्म) प्राचीन जाती (आर्य जात) या मध्येच हिंदु राष्ट्रवादाच्या प्रेरणा दडलेल्या आहेत. हेच प्राचीन 'स्वत्व' हिंदुवादात प्रकट झालेले आहे. म्हणूनच हिंदुचा हिंदुस्थान हा हिंदु जाती, हिंदु धर्म, हिंदु संस्कृती व हिंदु भाषा या मिळून झालेला आहे असे सावरकर सकट सर्व हिंदुत्ववादी मानत आलेले आहेत गौरवशाली भूतकाळाचे पुनरुज्जीवन करण्याचे स्वप्न पाहणारे स्वामी दयानंद देखील वैदिक व्यवस्थेच्या पुनरूज्जीवनाचे ध्येय उराशी बाळगत होते. हिंदु महासभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही हिंदु व्यवस्थेला आदर्श व्यवस्था मानली आहे.

हिंदुस्थानातील ' संप्रदायाचे स्थान ' –

हिंदु महासभेचे प्रवक्ते म्हणून बोलताना, बॅ. सावरकर नेहमी स्पष्ट करीत असत की, हिन्दुस्थानात हिन्दु (जे बहुसंख्य आहेत) हे राष्ट्रक आहे आणि मुस्लिम हे एक सांप्रदायिक राष्ट्रक (Communal Nationality) आहे. तेव्हा या दोन्ही राष्ट्रकाच्या अस्तित्वाची मान्य करावी हे त्यांनी वेळोवेळी सूचित केले. म्हणून हिन्दुवादी भारतात हिन्दु–संप्रदाय व मुस्लिम संप्रदाय असे दोन संप्रदाय आहेत असे तत्वत: आणि उघडपणे मान्य करीत नाही. त्यांच्या मते भारतात हिन्दु हे खरे राष्ट्र आहे आणि इतर संप्रदाय आहेत. त्यापैकी काही

संप्रदाय आपले पृथकात्मक अस्तित्व व आपला सांप्रदायिक हिताची जाणीव ठेऊन आहे. या संप्रदायानी राष्ट्रीय जीवन स्तोतात सहभागी झाले पाहिजे. त्याना येथील लोकशाही राज्यात समान नागरिकाचा दर्जा व सर्व हक्क मिळतील अल्पसंख्याक म्हणून त्यांना सवलतीही दिल्या जातील परंतु त्यांना या देशातून फुटून पडण्याचा अथवा प्रदेश मागण्याचा हक्क देता येणार नाही असा हक्क देता कामा नये. थोड-क्यात रशियात ज्याप्रमाणे मुस्लिम रशियाची एकनिष्ठ होऊन रशियाच्या राष्ट्रीय जीवन स्तोतात सहभागी झाले आहेत ज्यू. लोक जसे आपले राष्ट्रीयत्व कायम ठेऊनही अमेरिका, जर्मनी, इंग्लंड या देशातील नागरिक म्हणून संबंधीत देशाच्या राष्ट्रीय जीवनप्रवाहात मिसळून गेले आहेत. तसेच मुस्लिमानी हिंदुस्थानात राहिले पाहिजे. मुस्लिम समाजाला हिंदुस्थानात राहुन स्वतःची सार्वभौम ' बेटे ' स्थापन करता येणार नाहीत बॅ. सावरकरानी भारतातील मुस्लिम राष्ट्रकातील फुटीर प्रवृत्तीचे सामर्थ्य ओळखले होते. म्हणून १९४२ च्या महासभेच्या अधिवेशनात त्यांनी काँग्रेसकडून फाळणीला काँग्रेस पक्षाचा विरोध राहिल असे आश्वासन मागितले होते व काँग्रेसकडून मुस्लिम लिगच्या नेत्याचा सतत होणारा अनुनय फाळणीचा धोका वाढविण्यास कारणीभूत ठरेल असा गंभीर इशाराही त्यांनी वेळोवेळी दिला मात्र पारशी व शीख या संप्रदायांना त्यांनी कधीच विरोध केला नाही. स्वातंत्र्य लढ्याच्या काळातील मुस्लिम लिगच्या राजकीय प्रेरणेने व फुटीर प्रवृत्तीने उदयास आलेला मुस्लिम संप्रदायवाद कोणते राजकीय धोके निर्माण करू शकतें याची कल्पना सावरकराप्रमाणेच काँग्रेसच्या वरिष्ठ व जेष्ठ नेत्यांना होती. मुस्लिम लिगच्या फुटीर राजकारणाला पायबंद घालण्यासंबंधीची धोरणे व दृष्टीकोन मात्र (त्या काळातील राजकीय संघटनाची) भिन्न होती आणि म्हणूनच मुस्लिम संप्रदायवादाला खतपाणी घालण्याचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष कार्य कोणी केली व त्यात कोणाची जबाबदारी जास्त आहे हा वादाचा प्रश्न बनलेला आहे.

स्वा. सावरकरांनी हिंदु राष्ट्र व हिन्दुत्ववादाचा पुरस्कार करताना अल्पसंख्याकाच्या हक्काना मान्यता देण्याचे १९४२ साली मान्य केले होते. राष्ट्रीय जीवनस्तोतात सामावून घेऊ इच्छिणाऱ्या

अल्पसंख्याकांना प्रमाणशीर प्रतिनिधित्व विधिमंडळात देण्यास हरकत नाही असेही सावरकरांनी स्पष्ट केले. दि. २ ऑगस्ट १९४२ या दिवशी पुण्यास झालेल्या भाषणात त्यांनी काँग्रेसच्या अवाहनास प्रतिसाद म्हणून हिंदु महासभेच्या वतीने पुढील अटी मांडल्या.

१) काँग्रेसने अखंड हिंदुस्थान राखण्याचे आश्वासन द्यावे. कोणत्याही परिस्थितीत देशाच्या फाळणीस मान्यता देणार नाही अशी स्पष्ट घोषणा करावी.

२) कोणत्याही प्रांताला भारतातून फूटून निघण्याचा अधिकार असणार नाही असे घोषित करावे.

३) बहुसंख्य व अल्पसंख्य समाजाना विधिमंडळातून त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वत्र प्रतिनिधित्व राहील असे स्पष्ट करावे.

४) सार्वजनिक क्षेत्रात लायकीनुसार भरती केली जाईल या तत्वास मान्यता देण्यात यावी.

५) हिंदुसमाजाचे प्रतिनिधीत्व करणारी संस्था हिंदुमहासभा आहे हे मान्य करावे व हिंदुच्या हक्क संबंधात तिच्या संमतीशिवाय काही न करण्याची हमी द्यावी.

६) अल्पसंख्याकांना त्यांची भाषा, धर्म, संस्कृति इत्यादि बाबतीत परिणामकारक संरक्षणाची सर्वत्र तरतूद करण्यात यावी. मात्र असे करतांना संयुक्त राष्ट्र संघाच्या सनदेत म्हटल्या प्रमाणे राज्यात अंतर्गत पोटराज्ये निर्माण करून बहुसंख्याकांच्या न्याय्य हक्कावर अतिक्रमण न करण्याची हमी द्यावी.

७) नव्या राज्यघटनेत शेषाधिकार केंद्रिय सरकारच्वा हाती राहतील हे मान्य करावे.

कै गोळवलकर प्रणीत " राष्ट्रवाद " –

राजाराम मोहन रॉय पासून ते विनोबा भावे पर्यंत सर्व विचारवंतानी राष्ट्रवादाचा पुरस्कार केला आहे. अर्थात या विचारवंताच्या मालिकेतील विचारवंताचे ब्रिटिश राज्यकर्ते व शासन याकडे पाहण्याचे दृष्टिकोन भिन्न होते. ' स्वराज्य ' हें राष्ट्रीय उद्धिष्ट साध्य करण्याचे मार्ग भिन्न असले तरी केव्हा तरी ' स्वराज्य ' स्थापन झाले पाहिजे या विचाराबाबत त्याच्यात एकवाक्यता होती. स्वामी दयानंद तर उघड-

पणेच स्वराज्याचा पुरस्कार करीत होते. जहाल विचारवंतानी स्वराज्याचाच आग्रह धरला. या विचारवंतात अलिकडेच कैं. गोळवलकर यांचाही समावेश होतो महाष्ट्रातील राजकीय वर्तुळात वादग्रस्त ठरलेली व्यक्ती म्हणून त्याचा उल्लेख केला जात असे. त्याच्या राष्ट्रवादासंबंधीचे विचार जाणून घेणे योग्य ठरेल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक म्हणून त्यांनी या संघटनेचे नेतृत्व केले. त्याच्या ' बंच ऑफ थॉट ' या ग्रंथात त्यांनी राष्ट्रवादा संबंधीचे विचार मांडले आहे. त्यानी प्रतिपादन केलेला हिंदुराष्ट्रवाद वैदिक तत्वज्ञानाच्या उज्वल परंपरेतून आकारास आलेला आहे. स्वधर्म, स्वसंस्कृति व हिंदु जीवनपद्धती या संबधीच्या अस्मितेवर आधारलेली त्याची राष्ट्रवादी विचारसणी वादग्रस्त ठरली तरी ती बौद्धिक दृष्टचा उपेक्षित राहू शकत नाही म्हणून तिचा थोडक्यात परामर्ष घेणे योग्य ठरेल.

भारतातील राष्ट्रवादाचे अधिष्टान निषेधात्मक नाही. तर ते विधातक आहे ही विचारसणी प्रथम गोळवलकर ह्यांनी भांडली. परकीय शत्रु इंग्रजा विरुद्ध राष्टीय आंदोलन संघटीत करण्यात आले असले आणि परकीय शत्रुविरुद्ध स्वातंत्र्य आंदोलन उभारण्याम हिंदुस्थानी लोक तयार झाले असले तरी इंग्रजाच्या द्वेशावर हिंदुस्थान मधील राष्ट्रवाद आधारलेला नाही असा निष्कर्ष त्यांनी काढला भारतीय संस्कृति, हिंदुजीवन पद्धती व हा संस्कृतीक ऐतिहासीक मुल्ये यावर हिंदु राष्ट्रवाद आधारलेला आहे. इंग्रजाविषयी द्वेषातून नव्हे तर मातृभूमीवरील प्रेमातून हिंदु राष्ट्रवादाची शक्ती संघटीत झाली आहे. असे त्यांनी स्पष्ट केले. हिंदु राष्ट्रलादाची त्याची संकल्पना वैदिक तत्वज्ञानाच्या परंपरेतून आली आहे. फरक ऐवढाच आहे की, ' हिंदु ' या शब्दाचा त्यांनी स्पष्ट केलेला अर्थ " वादग्रस्त " ठरला. सावरकरानी हिंदु या शब्दाचा व्यापक अर्थ स्पष्ट केला. हिंदुस्थान मध्ये वास्तव करणारे व हिंदुस्थान हचा भूमिवर एकनिष्टेने प्रेम करणारे हिंदु हा आशय त्यांनी स्पष्ट केला. स्वामी दयानंद व त्याच्या आर्यसमाज संघटनेतील अनुयायी कटाक्षाने ' हिंदु ' शब्दाचा वापर करण्याचे टाळतात. हिंदु ऐवजी आर्य हा गुणदर्शक शब्द प्रयोग व आर्य भूमीचा पवित्र वारसा पुढे चालवा असा त्यांनी संदेश स्वामी दयानंदानी दिला.

हिंदु राष्ट्रवाद –

सांस्कृतिक पुनरूत्थानाच्या प्रेरणेतून हिंदु राष्ट्रवादाचा आशय स्पष्ट करणाऱ्या भारतीय विचारवंताच्या मालिकेत श्री गोवलकर ह्यांचा समावेश होतो. भारतीय राष्ट्रवादाच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीचा उल्लेख करताना ते म्हणतात " हिंदु राष्ट्राची आपली धारणा, केवळ काही आर्थिक व राजकीय अधिकाराचा समुच्चय अशा मर्यादित स्वरुपाची नाही ती धारणा प्रामुख्याने सांस्कृतिक आहे जीवन विषय उदात्त प्राचीन मूल्ये तिचे प्राणभूत घटक आहेत. आपली संस्कृती पुनः टवटवीत होऊन उभी राहिली तरच आपल्या राष्ट्रजीवनाची यथार्थ दृष्टी आपणास प्राप्त होईल आणि राष्ट्रासमोर उभ्या असलेल्या अनंत समस्या यशस्वी रीतीने सोडविण्याच्या प्रयत्नाना योग्य दिशाही उपलब्ध होईल. "

गोळवलकर प्रणीत हिंदुराष्ट्रवादाची प्रेरणा सांस्कृतिक आहे तर हिन्दुराष्ट्रवादामागील भावना प्राप्त भक्तीची आहे. ते म्हणतात, " आपल्या जन्मभूमीला माता मानणे हे मानवी विकासाच्या उन्नत अवस्थेचे लक्षण आहे " वेदाचा संदर्भ या ठिकाणी योग्य ठरतो.

माता भूमिः पुत्रो हम् पृथिव्याः

(पृथ्वी ही आमची माता, आपण तिचे पुत्र)

आपल्या देशासंबंधी मातृभक्तीचे ही उच्चतम देवी भावना सतत तेवत ठेवणे हे आपले कर्तव्य आहे अखंड मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी त्याग व परिश्रम केले पाहिजे.

वैदिक तत्वज्ञानातील वैचारिक वारसा पायाभूत मानून त्यांनी राष्ट्रावरील ज्वलंत निष्ठा प्रज्वलित ठेवा असा संदेश दिला ते म्हणतात,

" मातृभूमीवरील उत्कट, सक्रिय निरपवाद आणि ज्वलंत, निष्ठा हा स्वतंत्र विकासोन्मुख व गौरव संपन्न राष्ट्र जीवनाचा प्राण आहे. आपण हिन्दु तर मातृभूमीवरील अत्यंत दैवी प्रेमाचे वारस आहोत. प्रत्येक हिन्दुच्या अंतःकरणातील तो प्राचीन पवित्र परंतु आज सुप्त असलेला स्फुलिंग प्रज्वलित होऊ दे. त्या सर्व ज्वाला एकत्र होऊन एक प्रचंड यज्ञकुंड रसरसू दे. मातृभूमीवर आजवर झालेली सर्व

आक्रमणे, तिचे झालेले अपमान त्या यज्ञीय ज्वालेत जळून खाक होतील, आणि भारतमातेला तिच्या मूळच्या अखंड स्वरूपात सुप्रतिष्ठित करण्याचे आपले स्वप्न साकार झालेले दिसेल. ''

राष्ट्रीय एकात्मतेचे अधिष्ठान स्पष्ट करताना ते म्हणतात की आपल्या राष्ट्रीय जीवनाला संघटित, पुनरूज्जीवीत आणि वैभवसंपन्न करणारे मुलस्तोत्र पुढीलप्रमाणे आहेत.

१) पहिली गोष्ट म्हणजे, जिला आपण आनदि कालापासून मातृभूमी मानीत आलो आहोत तिच्याविषयी ज्वलंत निष्ठा.

२) दुसरी गोष्ट म्हणजे, आपण या थोर मातेची लेकरे आहोत या जाणीवेतून निर्माण झालेला स्नेहभाव, मातृभाव

३) तिसरी गोष्ट म्हणजे, समान संस्कृती व वारसा, समान इतिहास व परंपरा आणि समान आदर्श व आकांक्षा यामधून उत्पन्न होणाऱ्या समान राष्ट्रीय जीवनाची उत्कट जाणीव.

जीवन मूल्यांची ही निमृत्ती थोडक्यात म्हणजे हिन्दु राष्ट्रीयवाद हाच आपल्या राष्ट्रमंदिराचा भक्कम आधार आहे.

कै. गोलवळकर ह्यांनी वैदिक परंपरेला अनुसरून राष्ट्रवादाचा प्राचीन सांस्कृतिक आणि ऐतिहासिक आशय स्पष्ट केला. हिंदु हा शब्दाचा वैशिष्टयपूर्ण आशय ऐतिहासिक संदर्भात स्पष्ट केला. राष्ट्रवादाच्या आधुनिक संकल्पना भारतीय परिस्थितीशी जुळणारी नाही अशी त्यांची धारणा होती. परंतु त्यांच्या विचारसरणीवर टीका करण्यात आली. त्याच्या टिकाकारानी म्हटले आहे, '' हिंदु राष्ट्रवादा-सारख्या जातीयवादी, मध्ययुगीन व प्रतिगामी कल्पनाची संकुचित भाषा बोलू नये. '' हिंदु शब्दातील ' जातीयवादी ' व धार्मिक आशय संकुचित भावनाना प्रज्वलीत करतो. तर हिंदु संस्कृतीचा गौरवशाली इतिहास ' राष्ट्रवादाला ' (भारतीय पुनरूज्जोवनाचीं बैठक प्राप्त करुन देतो. स्वामी दयानंद, योगी अरविंद घोष, लोकमान्य टिळक व क्रांतीवीर सावरकर भारतीय राष्ट्रवादाच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक बाजूवर आधिक भर देतात. स्वामी दयानंद सरस्वती ह्यानी हिन्दु ऐवजी ' आर्य ' हा शब्द वापरण्याचे हेतुपुरस्पर योजिले. कारण 'हिंदु' हा शब्द 'संप्रदायवादी' आहे अशी त्यांची धारणा होती.

मुस्लिम संप्रदायवादाचा उदय : कारण मीमांसा –

भारतातील मुस्लिमाचा 'इस्लाम' धर्म आपल्या देशाबाहेर अस्तित्वात आलेला आहे. इस्लाम श्रद्धास्थाने व पवित्र स्थाने देशाबाहेर आहेत. ' इस्लाम बंधुत्व 'च्या संकल्पनेने राष्ट्राच्या भौगोलिक सीमाना महत्व दिलेले नाही. ' इस्लामवाद ' ही एक विविध राष्ट्रातील मुस्लिमाना एकत्र आणणारी विचारप्रणाली असून ' इस्लाम ' समाज जीवन पद्धती, जीवन मुल्य, समान संस्कृती, समान इतिहास आणि समान इस्लाम परंपरा असलेला एक विभक्त व पृथक असा राष्ट्रकाची शक्ति निर्माण करणारा घटक आहे. भारतात मुस्लिम हे आक्रमक राज्यकर्ते म्हणून आले. त्यानी या देशावर बरेच वर्षे राज्यकारभार केला. इस्लामी राजवटीचा वैभवशाली इतिहास काळात हा येथील हिंदु लोकाच्या विपन्नवस्थेला व मानहानीला तोंड द्यावें लागते. अल्पसंख्याक मुस्लिमानी येथे राज्यकर्त्याचा वर्ग म्हणून भूमिका बजावली आपण एके काळी राज्यकर्त्या वर्गातील होतो हे येथील मुस्लिम विसरू शकत नाही. त्याचप्रमाणे भारतासारख्या खंडप्राय देशात बहुसंख्य हिन्दु असल्यामुळे आपल्या हिताला, धर्माला व संस्कृतीला हिंदु बहुसंख्याकडून धोका निर्माण हो याची शक्यता आहे ही भीतीही मुसलमानाना वाटत होती व वाटत आहे. त्यातच अल्पसंख्याकात आक्रमक व विभक्त प्रवृत्तीचा उगम होतो विशिष्ट संप्रदायाच्या हितासाठी संघटित होण्याचा प्रयत्न अल्पसंख्याक संप्रदाय करु लागतो व त्यातून संप्रदायवादाचा उदय होतो. मुस्लिम संप्रदायवाद हा हिंदु महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अस्तित्वात येण्यापूर्वीच येथे अस्तित्वात होता. हा संप्रदायवाद एक विभक्तवादी राजकीय शक्ति म्हणून अस्तित्वात आली. याला अनेक कारणे आहेत व संप्रदायवादी शक्तीत खतपाणी घालण्यास अनेक घटक कारणीभूत ठरले आहेत.

१) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यानी एका बाजूने द्वि राष्ट्राचा सिद्धांत फेटाळला व फाळणीला शेवटपर्यंत विरोध केला. हिंदु–मुस्लिम एकतेवर आधारलेल्या स्वतंत्र राष्ट्राची कल्पना मांडली. परंतु दुसऱ्या बाजूने काँग्रेसने मुस्लिम लिगमार्फत प्रत्यक्षाप्रत्यक्ष पुढे मांडलेल्या मागण्याना मान्य करण्यास तयारी दर्शविली. मुस्लिमाचा

अनुनय करण्याचे धोरण कार्यवाहित आले त्यातून स्वायत्त असा मुस्लिम समाज राजकीयदृष्ट्या आकारास आला व सरते शेवटी स्वायत्त मुस्लिम समाजाने सार्वभौम मुस्सिम समाजासाठी देशाची फाळणी करा अशी मागणी केली ब्रिटिश राजवटीने फाळणीच्या मागील फुटीर प्रवृत्तीला जोपासले.

२) भारतातील विभक्तवादी व सांप्रदायिक राजकारणाला तिसरी शक्ती ब्रिटिश राजवट करणीभूत ठरली. ब्रिटिश राजवटीतील ब्रिटिश राज्यकर्त्यांनी देशातील विभक्तवादी आणि सांप्रदायिक शक्तीना उत्तेजन देण्यासाठी विविध प्रकारचे उपाय योजले. भारतात संविधानिक सुधारणा करतानाही लोकशाहीशी विसंगत अशा विभक्तवादी व सांप्रदायिक तत्वाचा संविधानिक सुधारणेत समावेश केला. सांप्रदायिक प्रतिनिधित्वाची तरतूद मुस्लिम समाजाला भारतीय समाजातील 'स्वायत्त' स्थान व दर्जा प्रदान करणारी ठरली. स्वायत्ततेची सीमारेषा ओलांडून मुस्लिमाना स्वतंत्र सार्वभौम पाकिस्तानची मागणी केली

३) हिंदु पुनरूज्जीवनवादाचे प्रणेते व प्रवक्ते राजाराम मोहन रॉय, दयानंद सरस्वती, विवेकानंद, लोकमान्य टिळक, अरविंद घोष हे सप्रदायवादी ठरले नाहीत. कारण हिंदु पुनरुज्जीवनवाद ही राष्ट्रवादाचे सांस्कृतिक अधिष्ठान स्पष्ट करणारा होता व म्हणूनच भारतीय राष्ट्रवादाला पायाभूत ठरणारा हिंदु पुनरुज्जोवनवाद व त्यांचे पुरस्कर्ते संप्रदायवादी ठरले नाही. हिंदु पुनरूज्जीवनवाद्यानी एक तर फक्त ब्रिटिश राजवटीला विरोध केला. आसल्याच समाजातील मुस्लिम संप्रदायवाद वादावर त्यांनी टीका केली नाही आणि मुस्लिम संप्रदायवादाला विरोधही केला नाही. लोकमान्य टीळकांनी तर ब्रिटिश राजवटीविरूद्ध मुस्लिमाचें सहकार्य मागितले. इतर हिंदु पुनरूज्जीवनवादी केवळ सांस्कृतिक राष्ट्रवादाचा आशय व्यक्त करणे होते म्हणूनच हिंदु पुनरुज्जीवनवादावर संप्रदायवादी म्हणून शिक्का मारला जात नाही. या उलट हिंदु महासभेने आणि तिचे अध्यक्ष बॅ. सावरकर यांनी ज्या हिंदुवादाचा पुरस्कार केला त्या हिंदुवादाला सांप्रदायिकतेच दोष लावण्यात आला कारण हा हिंदुवाद हा राजकीय स्वरूपाचा होता व तो हिंदु महासभेच्या राजकीय व्यासपीठावरुन मांडण्यात आला. हिंदु महासभेने आणि सावरकरानी

यांनी सातत्याने विभक्तवादी व आक्रमक मुस्लिम संप्रदायवादाला व मुस्लिमासमोर मान तुकविणाऱ्या काँग्रेस पक्षाला विरोध केला व हिंदुना मुस्लिम विभक्त शक्तीला विरोध करण्यासाठी संघटित होण्यासाठी सतर्क केले त्यामुळे हिंदु महासभेचा हिंदुवाद संप्रदायवादी ठरला किवा ठरविण्यात आला.

थोडक्यात असे म्हणता येईल की, मुस्लिम संप्रदायवाद येथे मूळातच अस्तित्वात होता एकोणिसाव्या शतकाच्या शेवटास त्याला राजकीय महत्व प्राप्त झाले खिलाफत चळवळीत मुस्लीम संप्रदायवादी शक्तीना संघटित होण्याची संधी मिळाली व ब्रिटिश राजवटीकडून प्रोत्साहन मिळाले. हिंदु संप्रदायवाद ही मुस्लिमसंप्रदावादाची सांप्रदायिक प्रतिक्रिया आहे. हिंदु संप्रदायवाद हा मुस्लिम संप्रदायवादाचा राजकीय परिणाम व स्वातंत्र्यपूर्व काळातील हिंदु मुस्लिम राजकारणाचा, विशेषत: फाळणीच्या राजकारणाचा परिपाक आहे.

हिंदु संप्रदायवाद प्रथम अस्तित्वात आला की हिंदु संप्रदायवाद प्रथम अस्तित्वात आला या वादाला फारसे महत्व नाही. कारण हिंदु व मुस्लिम समाज समान्तर समाज म्हणून आपले विभक्त प्रथक अस्तित्व प्रथम पासून टिकवून होते. संप्रदायवादी प्रवृत्तीचा उगम मात्र प्रथम मुस्लिम विचारसरणी व नंतर मुस्लिम राजकारणात झाला. सर सईद अहमद यांच्या लिखाणात प्रथकवादी विचारसरणाचा उल्लेख काही ठिकाणी आढळतो मुस्लिम लिगच्या राजकारणात सांप्रदायिकवाद राजकीय शक्तीचे केंद्र बनला.

हिंदुत्व निष्ठ सघटना –

हिंदुवादाशी प्रत्यक्षाप्रत्यक्ष संबंधित असलेल्या अनेक संघटना भारतात आहेत. विशेषत: हिंदु महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनसंघ आणि विश्व हिंदु परिषद यांच्या व्यासपीठावरून हिंदु राष्ट्रवादाचा आशय निरनिराळ्या रूपात व्यक्त केला जातो हिंदु महासभेने उघडपणेच हिंदु राष्ट्रवादाचा राजकीय व्यासपीठावरून पुरस्कार केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंदु राष्ट्रवादाचा सांस्कृतिक आशय आपल्या संघटनेच्या व्यासपीठावरुन स्पष्ट करीत असतो. जनसंघाच्या व्यासपीठावरून हिंदु संस्कृतीच्या परंपरेचा उल्लेख केला जात होता. सांराश,

हिंदुवादातील विविध घटकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विविध संघटना आहेत. हिंदु धर्माचा प्रचार करणारी व विविध हिंदु धर्म संप्रदायाना एकत्र आणणारी विश्व हिंदु परिषद एक धार्मिक संघटना असली तरी हिंदुवादाचा पुरस्कार करणाऱ्या विविध सांस्कृतिक, राजकीय व सामाजिक संघटनेशी तिनें घनिष्ठ संबंध ठेवले आहे. विश्व हिन्दु परिषदेतील सदस्य हिंदुनिष्ठ संघटनेत काम करीत असतात.

उपरोक्त हिंदुनिष्ठ संघटनेत कार्य करणारे जेष्ठ नेते एके काळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसशी व तिच्या राष्ट्रीय चळवळीशी संबंधीत असे नेतें होत. डॉ. मुंजे, डॉ. खरे, डॉ. हेडगेवार, शामप्रसाद मुखर्जी, रॉय वाजपेयी आदी नेते काँग्रेंसच्या राष्ट्रीय चळवळीत सहभागी झाले व नंतर त्यानी आपल्या स्वतंत्र संघटना अस्तित्वात आणल्या. काँग्रेसशी मतभेद होऊन अनेकजण हिन्दु महासभेत आले.

हिंदुवादाच्या सिद्धांतातील लवचिकता –

हिंदु महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि काही अंशी जनसंघ या संघटना हिंदुवादाचे समर्थन करणाऱ्या संघटना म्हणून ओळखल्या जातात अर्थात हया तिन्ही संघटनाच्या नेत्याच्या हिंदुवादाकडे पाहण्याचा दृष्टीकोन काही प्रसंगी व काही परिस्थितीत भिन्न स्वरुपाचा असल्याचे निदर्शनास येते, परंतु हिंदुवादाच्या मूलभूत तत्वासंबंधी या तिन्ही संघटनामध्ये फार भोठे तात्विक मतभेद नाहीत व जे काहीं तात्विक मतभेद आहेत किंवा असण्याची शक्यता आहे ते मतभेद सार्वजनिक व्यासपीठावर चर्चेला येत नाहीत. हिंदुवाद ही एक पोथीनिष्ठ विचारप्रणाली म्हणून तिचा आग्रह धरणारे हिंदुत्ववादी या तिन्ही संघटनेत असले तरी ज्यावेळी या विचारप्रणालीचा पुरस्कार एखाद्या राजकीय पक्षाच्या व्यासपीठावर होतो त्यावर राजकीय संघटनेचे नेते एक राजकीय विचारप्रवाह म्हणून हिंदुवादाकडे पाहतात. हिंदुवाद व राष्ट्रवाद याचा मेळ घालण्याचा प्रयत्न करतात व हिंदु राष्ट्रवादाच्या भिन्न दृष्टीकोनातून आपला आशय व्यक्त करतात. उदाहरणार्थ बॅ. सावरकरानी हिंदुवाद व आधुनिक राष्ट्रवादाची मूलभूत तत्वे याची सांगड घालतांना धर्मावर अधिष्ठीत समान इतिहास, समान भाषा, समान भूप्रदेश, समान संस्कृती आणि समान निष्ठा याचा विचार

केला आहे. अर्थात हिंदुवाद या सर्व राष्ट्रीय घटकाना जोडणारा दुवा आहे हे त्यानी स्पष्ट केले.

राजकीय व्यासपीठाची गरज –

हिन्दु राष्ट्रवादाचा राजकीय व्यासपीठावरून प्रचार करणारी संघटना राजकीयदृष्ट्या निष्प्रभ झाल्यानंतर व राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर महात्मा गांधीच्या वधानंतर बंदी घातल्यानंतर संसदच्या व्यासपीठावर व राजकीय आघाडीवर हिन्दुवादाचे संरक्षण करण्यासाठी शामाप्रसाद मुखर्जी व त्यांचे सहकारी यानी जनसंघाची स्थापना केली. जनसंघाच्या संघटनेत हिन्दुतर लोकांना प्रवेश राहील हे सूचित करण्यात आले व हिन्दुवादासाठी एक नवे व्यासपीठ अस्तित्वात आले जनसंघाचे व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संबंध हे पक्ष व दबाव गट याच्यातील संबंधासारखे आहे जनसंघाला राजकीय आघाडीवर अधूनमधून सहकार्य देण्याचे कार्य संघातील लोक करतात अर्थात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ एक सांस्कृतिक संघटना असल्यामुळे सर्व राजकीय पक्षातील हिंदुना संघात प्रवेश दिला जातो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील सदस्य कोणत्याही राजकीय पक्षात प्रवेश मिळवू शकतात अर्थात हिंदुत्ववादी विचारसरणीचे पक्ष व संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील सदस्याना जवळच्या वाटल्यास आश्चर्य करण्यासारखे काही नाही.

हिन्दुवादातील हिंदु राष्ट्रवादाचा पुरस्कार व प्रचार करणाऱ्या कोणत्याही संघटना राष्ट्रीय जीवनापासून सांस्कृतिक अंग अलग करू शकत नाहीत. राष्ट्रीय एकतेचा आधार म्हणून हिंदु राष्ट्राचा विचार करणाऱ्या संघटना राजकारणापासून विभक्त राहू शकत नाहीत व त्यानी विभक्त राहण्याचा प्रयत्नही करू नये. उदाहरणार्थ राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर ज्यावेळी गांधी वधानंतर बंदी घालण्यात आली त्यावेळी राजकीय व्यासपीठाचे संरक्षण लाभावे म्हणून या संघटनेच्या काही सदस्यानी जनसंघाची स्थापना करण्यासाठी पुढाकार घेतला. एखाद्या राजकीय संघटनेच्या साहाय्याशिवाय विरोधी शक्तीना तोंड देता येणार नाही हे त्यावेळच्या संघातील सूज्ञ नेत्यानी ओळखले. १९७५ साली ज्यावेळी इंदिरा गांधीनी पुन्हा राष्ट्रीय स्वयसेवक संघावर बंदी घातली त्यावेळी जनता पक्षाला १९७७ च्या निवडणुकीत

पाठिंबा देऊन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आणिबाणीतील अधिकारशाही विरुद्ध संघटित झालेल्या शक्तीना आपले सामर्थ्य व साहाय्य प्रदान केले. सारांश, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रत्यक्ष राजकारणापासून दूर राहिला तर प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे परिस्थितीनुरूप संघाला राजकारणात ओढण्यात आले. संघ राजकारणात ओढला गेला. प्रत्यक्ष राजकारणात संघाची भूमिका संघाचे वरिष्ठ नेतृत्व ठरविले. श्री. गोळवलकर गुरुजीचा कल आध्यात्माकडे व हिंदु संस्कृतीकडे जास्त असल्यामुळे त्यांनी सतत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला राजकारणापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला व त्यात त्यांना यशही आले परंतु गेल्या काही वर्षात राष्ट्रातील राजकीय परिस्थिती अशी होती की, श्री. बाळासाहेब देवरस सारखे नेते, आपल्या स्वाभाविक राजकीय दृष्टीकोनामुळे राजकीय क्षेत्रात गोवले गेले. संघाच्या व्यासपीठावरुन राजकीय वक्तव्य करण्याचा मोह त्यांना आवरत नाही. परिणामतः राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आता राजकारणाबाहेर राहून राष्ट्रीय ऐक्य व हिंदु संस्कृतीचे संवर्धन व संरक्षण करण्यात गुंतला आहे असे श्री देवरसाना आपल्या कृतीतून व उक्तीतून सूचित करणे अवघड जात आहे. श्री गोळवळकर गुरुजी व श्री. बाळासाहेब देवरस याच्या भिन्न व्यक्तीमत्वाचा छाप भिन्न स्वरुपात संघाच्या संघटनेत व कार्यपद्धतीत पडलेला दिसून येतो.

हिंदुवादाची पिच्छेहाट –

स्वातंत्र्यपूर्व काळातील हिंदुवाद व त्यातील एक विचारप्रवाह 'सावरकरवाद' लोकप्रीय बनला नाही. याला काही परिस्थितीजन्य, व्यक्तिगत व राजकीय कारणे जबाबदार आहेत. सावरकर यांच्या जहाल व क्रांतीवादी धोरणामुळे सर्वसाधारण जनता व सनदशीर राजकारणाचे पुरस्कर्ते पक्ष हिंदुवादी जहाल राजकारणापासून दूर राहिले.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मुस्लिम राष्ट्रवादाविरुद्धची धार्मिक राजकीय प्रतिक्रिया म्हणून हिंदु महासभाने पुकारलेला हिंदु राष्ट्रवाद संप्रदायवादाचाच एक प्रकार आहे असा गैरसमज निर्माण झाला. राष्ट्रीय आंदोलनातील मुस्लिम लिगची राजकीय भूमिका व त्यावरील हिंदू राष्ट्राभिमानी हिंदु महासभेची प्रतिक्रिया यामुळे

जनमानसात हिंदुवादी चळवळ ही एक प्रतिक्रियात्मक चळवळ आहे की काय या बाबत संभ्रम निर्माण झाला.

हिंदु महासभेने काँग्रेसच्या मुस्लिम धार्जिण्या धोरणावर सतत टिका केली तसेच ब्रिटिशानी हिंदु मुस्लिम समाजात दुहीचे राजकारण निर्माण करण्याचा जो पर्यंत केला त्यावर ही हिंदु महासभेचे नेते टीका करत त्यामुळेच हिंदु महासभेचे राजकारण मुस्लिम विरोधी राजकारण आहे हें स्पष्ट झाले व त्याचा परिणाम म्हणून हिंदु महासभा व तिची हिंदुत्ववादी विचारसरणी संप्रदायवादी ठरली.

स्वातंत्र्यपूर्वकाळात हिंदु मुस्लिम प्रश्नातून निर्माण झालेला संप्रदायवाद हिंदु महासभेचा प्रभाव काही ठिकाणी वाढण्यास कारणी-भूत ठरला असे सर्वसाधारणपणे म्हटले जाते. अर्थात हे एक पूर्ण सत्य नाही. हिंदु मुस्लिम संघर्षात हिंदुवादाची भावना काही हिंदु लोकांना आकर्षक वाटली व भावनाक्षोभाच्या वातावरणात हिंदुवादी चळवळीला तात्कालिक प्रतिसाद जनतेकडून मिळाला परंतु हा प्रतिसाद सर्वसाधारण जनतेकडून हिंदुवादाला व हिंदु महासभेला मिळू शकला नाही. कारण हिंदु महासभा उच्चभ्रु सवर्ण लोकांचीच एक संघटना म्हणून कार्य करत राहिली. समाजातील सर्व स्तरात नेते व कार्यकर्ते निर्माण करुन संघटना उभारण्यात हिंदु महासभेला अपयश आले. म्हणूनच स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसच्या तुलनेत हिंदु महासभा सर्व दृष्टीने निष्प्रभ ठरली. हिंदुमहासभेचा ' हिंदुवाद ' हिंदु पुनरुज्जीवनवादावर भर देण्याऐवजी हिंदु संघटनेवर अधिक भर देत होता. भारतातील उज्वल भूतकालीन परंपरेवर अधारित हिंदु राष्ट्रवाद हा सर्वत्र लोकप्रीय होऊ शकला असता परंतु हिंदु संघटना उभारण्याचे ध्येय समोर ठेऊन पुरस्करलेला हिंदु राष्ट्रवाद भारतातील अल्पसंख्यक लोकसमूहात अकारण गैरसमज निर्माण करण्यास कारणीभूत ठरला व सरते शेवटी संप्रदायवादाचा कंलक हिंदुवादाला (हिंदु महासभा प्रणित हिंदुवादाला) लागला ही दुर्दैवाची गोष्ट होय.

हिंदुवाद आणि इहवाद –

हिंदुवाद व निधर्मवाद किंवा इहवाद परस्पर विरोधी आहे. हिंदुवाद व धर्मनिरपेक्षवाद परस्पराशी सुसंवाद साधू शकणार नाही

असे म्हणता येणार नाही. या उलट हिंदुवादाचा उदारमतवादी आशय निधर्मीवादाला वा इहवादाला पुरक आहे. क्षात्रधर्म आणि ब्राम्हणधर्म भिन्न आहे असे मानणारी हिंदु संस्कृति, राजधर्मात धार्मिक हस्तक्षेपाला मान्यता देणार नाही. सर्व धर्मसमूहाना धार्मिक स्वातंत्र्य देताना धार्मिक सहिष्णुता हिंदुवादाइतकी कोणत्याही धर्म संप्रदायात नाही. हिंदुवादाचे बहुजिनसी स्वरुप धर्मसत्ताक राज्याच्या विकासास पोषक नाही, उलट ते धर्मसत्ताक राज्याच्या मार्गात अडथळा ठरणारे आहे. एकाच धर्म-गुरूंना आणि धर्म ग्रंथासी केंद्रीत अशा निष्ठाचा अभाव हिंदु धर्मात असल्यामुळे व विविध श्रद्धा विविध धार्मिक निष्ठा यांना हिंदुधर्मात वाव असल्यामुळे लोकशाहीला पोषक अशी बहुजिनसी मनोवृत्ती निर्माण करण्यास हिंदुवाद कारणीभूत ठरला आहे. म्हणून इस्लाम धर्म समूहा-पेक्षा हिंदु बहुसंख्य समूहात लोकशाही मनोवृत्तीचा उगम व विकास चांगल्या प्रकारे होऊ शकला. भारतातील निधर्मीवादाला किंवा इहवा-दाला इस्लाम धर्मातील शक्तीने जे आव्हान दिले त्याचा विचार करता हिंदुवाद इहवादाला साहाय्यक ठरला असा निष्कर्ष काढावा लागेल.

हिंदुवाद व धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद –

'हिंदुवादा' संबंधी बरेच समज व गैरसमज भारतीय लोकात आहेत. 'हिंदुझम' ही धर्माशी नव्हते तर राष्ट्रवादाशी संबंधित अशा विचारसरणी आपण मानली तर हिंदुवादाला जे अनेक सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक पदर आहेत त्यात धर्म व प्राचीन हिंदुस्थानातील संस्कृति हे हिंदुझम मधील अनेक घटकापैंकी दोन घटक ठरतात. 'हिंदुझम' मध्ये स्पष्ट करण्यात आलेली हिंदु राज्याची कल्पना एका हिंदुस्थानमधील राष्ट्रकाची अस्मिता दर्शविते. ती धर्मसत्ताक राज्याची कल्पना नाही परंतु हिंदु म्हणवून घेणाऱ्या भारतातील सर्व धर्मपंथातील बहुमतवाल्या राष्ट्रकाशी तिचा तर्कसंगत संबंध जोडला जाते. भारता-सारख्या बहुधार्मिक व बहुराष्ट्रीय समाजात ही विचारसरणी राजकीय दृष्टचा स्वीकारणे योग्य ठरते का हा प्रश्न वेळोवेळी उपस्थित केला जातो. हिंदुस्थानातील भूमीत ज्याच्या सर्व श्रद्धा व निष्ठा केंद्रीत झालेल्या आहेत अशा हिंदु समाजातील लोकातही 'हिंदुवाद' ही विचारसरणी सर्वमान्य व स्वीकारणीय का ठरत नाही? याची कारण

मीमांसा करणे योग्य ठरते.

धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद –

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने आकारास आणलेली धर्मनिरपेक्ष व धर्मातीत अशी राष्ट्रवादाची कल्पना समधर्मातील व पंथातील लोकांना राष्ट्रीय पातळीवर एकत्रित आणण्यास साहाय्यक ठरेल ही वैचारिक भूमिका काही काँग्रेस नेत्यांनी घेतली. पाश्चिमात्य शिक्षण घेतलेल्या काही काँग्रेस नेत्यानी पाश्चिमात्य धर्तीचा राष्ट्रवाद येथे आकारास आणण्याचा प्रयत्न केला. स्वाभाविकच ' हिन्दुत्व 'वादी विचारसरणी स्वातंत्र्य आंदोलनाच्या विचारसरणीत एक स्वतंत्र विचारप्रवाह म्हणून अस्तित्वात राहिली.

विविध धर्मपंथातील काँग्रेसचें नेते दादाभाई नौरोजी, पंडित जवाहरलाल नेहरू, अब्दुल कलम आझाद, लाला लजपत रॉय, महात्मा गांधीह यांनी हिंदु-मुस्लिम एकतेंवर आधारलेल्या स्वतंत्र राष्ट्राची संकल्पना उराशी बाळगली. या राष्ट्राच्या संकल्पनेला विरोधी करणाऱ्या व बहुधार्मिक राष्ट्रात पक्षपाती ठरणाऱ्या कोणत्याही राष्ट्रवादी विचार-सरणीला काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय आंदोलनात समर्थन व साहाय्य प्राप्त होऊ शकले नाही. परिणामतः हिंदुवादाचा पुरस्कार करणारे काही नेते काँग्रेसमधून फुटून बाहेर पडले व त्यानी हिंदुमहासभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या दोन संघटना उभारल्या. तेव्हापासून आजतागायतपर्यंत काँग्रेसप्रणीत उदारमतवादी व धर्मनिरपेक्ष राष्ट्र-वादाशी भिन्नत्व दर्शविणारी हिंदुमहासभेची व मुस्लिम लिगची राजकीय विचारसरणी याच्यातील वैचारिक संघर्ष चालू आहे. राजकीय हेतुने केलेल्या आरोप प्रत्यारोपामुळे या विविध विचारसरणीबद्दल खरे खोटे समज व गैरसमज निर्माण झाले किंवा हेतुपुरस्पर निर्माण केले. स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकारणाच्या पार्श्वभूमीवर या विचारसरणीचे विश्लेषण करणे आवश्यक ठरतें.

हिंदुवादाचे भवितव्य –

भारतासारख्या बहुजिनसी समाजात बहुस्पर्शी निधर्मी प्रादेशिक आणि राष्ट्रीय समान आकाक्षावर आधारलेला राष्ट्रवाद सर्व प्रकारच्या समूहांना – धार्मिक समूह, वांशिक समूह, जातीय समूह, भाषिक समूह

च सांस्कृतिक समूह याना राष्ट्रीय जीवन स्त्रोतात समावून घेऊ शकेल. बहुसंख्य हिंदु-समूहाच्या हिताला प्राधान्य देणारा व एका धार्मिक संस्कृतीशी परंपरेने निगडित झालेला हिंदु–राष्ट्रवाद हा इतर धार्मिक गटाना आपलासा वाटत नाही. हिंदु–संस्कृतीची व्यापक व्याख्या करूनही व भारतीय संस्कृतीची संमिश्र स्वरुप स्पष्ट करूनही हिंदुवादाकडे इतर धार्मिक समूह आकर्षित करणे एक अवघड व जटील काम आहे. कोणतीही हिंदुत्ववादी संघटना हे कार्य यशस्वी रीतीने करुन दाखविल असा विश्वास वाटत नाही, खात्री देता येत नाही.

स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळापासून आजपर्यंत हिंदुवादाला राजकीय शक्तीच्या रूपात वावरताना भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या निधर्मी अथवा धर्मनिरपेक्ष विवेकवादी राष्ट्रवादी शक्तीशी संघर्ष द्यावा लागत आहे. हिंदुमहासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि जनसंघ या हिंदुत्ववादी संघटनाना एका बाजूने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसशी व दुसऱ्या बाजूने धर्मनिरपेक्ष डाव्या शक्तीशी संघर्ष द्यावा लागला, अजूनही द्यावा लागणार आहे जनमानसाचा सहानुभूती व सहाय्य जोपर्यंत या हिंदु संघटनेला लाभणार नाही तोपर्यंत तिला दोन्ही आघाडीवर यश प्राप्त करता येणार नाही. समारोप व स्वातंत्र्योत्तर काळातील हिंदु राष्ट्रवाद जर वास्तववादाशी सुसंवाद साधू शकला नाही तर हिन्दु राष्ट्रवाद एक स्वप्नरंजन ठरण्याची शक्यता आहे. विशेषत: सावरकर प्रणीत हिंदु राष्ट्रवाद हिंदु संघटन, आक्रमक राष्ट्रवाद, लष्करी सामर्थ्याचा ध्येयवाद आणि भूतकालीन हिंदु इतिहासाचे रोमँटिक उदात्तीकरण यावर आधारलेला होता. हिन्दु राष्ट्रवादाच्या या वैचारिक प्रेरणा वास्तववादापासून दूर आहेत व त्यांचे मूल्य संशयास्पद आहे व त्यांचे परिणामही व्यवहारात फारसे राष्ट्रहिताच्या दृष्टीने फायदेशीर नाहीत. म्हणूनच हिंदु राष्ट्रवादाला नवा आशय प्राप्त करून देणे व या राष्ट्रवादाला व्यवहार्य बनविण्यासाठी एक नवी वैचारिक चौकट निर्माण करणे आवश्यक आहे स्वातंत्र्योत्तर काळात पूर्वीच्या हिंदु राष्ट्रवादात सुधारणा विशेषत: व्यवहार्य सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे. याची जाणीव हिंदुवाद्याना हळूहळू होत आहे परंतु पोथीनिष्ठ हिंदु राष्ट्रवादात वैचारिक फेरबदल करण्याचे बौद्धिक धाडस

विद्यमान काळातील हिन्दुवादाचे पुरस्कर्ते दाखवत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

भारतीय फाळणी ही दुर्दैवी घटना आहे, पण ते एक ऐतिहासिक सत्य आहे. एक राजकीय कटू सत्य आहे. ही वास्तवता मान्य करूनच 'अखंड भारताचे' स्वप्नरंजनाला पूर्णविराम दिला पाहिजे. विविध धार्मिक संप्रदायाचा मिळून बनलेल्या बहुजिनसी भारतीय समाजात, हिंदु संघटन हे राष्ट्रीय संघटनाचा आधार आहे व राष्ट्रीय संघटनेत सर्व धर्माच्या समूहाना स्थान आहे असा विश्वास विविध हिंदु संघटनानी निर्माण केला पाहिजे. म्हणजे हिंदुराष्ट्रवादाचा आग्रह धरणाऱ्यावर संप्रदायवादाचा आरोप इतर धार्मिक संघटनाना करता येणार नाही. बहुधार्मिक राष्ट्रातील अल्पसंख्याक धार्मिक समूहाचे स्थान व त्याचे हित यांचा राष्ट्राच्या स्थानाशी व हिताशी समन्वय साधणें व राष्ट्र हिताशी सुसंगत ठरेल अशा पद्धतीने अल्पसंख्याक धार्मिक समूहाचे प्रश्न सोडविणे हाच यावर तोडगा ठरू शकतो.

भारतातील हिंदु राष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्या संघटना जर प्रामाणिकपणे आणि सत्याची कास धरून, येथील राष्ट्राबाहेर निष्ठा ठेवणाऱ्या व राष्ट्रहिताच्याविरोधी कार्य करणाऱ्या अल्पसंख्याक समूहाच्या कार्यावर प्रकाश टाकत असतील व देशात राष्ट्र जागृती निर्माण करत असतील तर त्यांचे हे कार्य राष्ट्रविरोधी कसे ठरु शकेल? उलट हे कार्य राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने उपयुक्तच ठरु शकेल असेच म्हणावे लागेल.



८. समारोप

आधुनिक भारतातील विचार प्रणालीचा अभ्यास करताना, तत्वज्ञाचा व तत्वज्ञानाचा एकत्रित अभ्यास करणे आवश्यक झाले आहे. तत्ववेत्याच्या जीवन प्रणालीचा त्याच्या विचार प्रणालीशी असलेला संबंध स्पष्ट केल्यावरच जीवंत प्रज्ञेचा प्रत्ययकारी अविष्कार मूळ स्वरुप घेऊ शकतो व त्यातून उदात्त जीवनाचा आत्मानुभव घेण्याची प्रेरणा मिळते. स्वामी दयानंदाची जीवन प्रणाली व त्यांची विचार प्रणाली ह्यात विलक्षण सुसंवाद साधला गेला आहे. त्याच्या उक्तीतून व कृतीतून व्यक्त झालेले विचार व आचार त्याच्या ध्येयवादाशी सुसंवाद साधतात. म्हणूनच समाज सुधारक, धर्म सुधारक व तत्वज्ञ या नात्याने त्याच्या कार्याचे मूल्यमापन करतांना, त्याच्या कृती मागील तत्वे आणि जीवन कार्यामागील तत्वप्रणाली समजून घ्यावी लागते. त्यांनी मांडलेल्या धार्मिक व सामाजिक विचारप्रणाली मागील धार्मिक व नैतिक प्रेरणा लक्षात घ्याव्या लागतात. धर्म सुधारक व समाज सुधारक म्हणून त्यांनी केलेल्या कार्यात विचार व वर्तन या संबंधीची मूलभूत सुसंगती आढळते. या उलट इतर भारतीय सुधारक विचारवंताच्या कृती व त्याची विचार प्रणाली ह्यात कधी सुसंगती दिसते तर कधी विसंगती प्रत्ययास येते. कारण इतर विचारवंतानी बदलत्या कार्याशी व कार्यपद्धतीशी जूळणारे विचार मांडले; वेळोवेळी आपल्या भूमिका बदलल्या व त्यानुरूप विचार

व्यक्त केले. त्यातून विविधतेने नटलेली परंतु विस्कळीत व विसंगतीपूर्ण विचारप्रणाली आकारास आली. कारण हया विचारवंतानी तत्वचिंतनापेक्षा कार्यातून साध्य होणाऱ्या उद्दिष्टाना अधिक महत्व दिले. दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक व महात्मागांधी हयाच्या विचारप्रणालीतील विसंगती जाणवते. अर्थात तत्वज्ञ राजनितीज्ञ म्हणून त्यांनी तत्वचिंतनापेक्षा जीवन कार्याला अधिक महत्व दिले.

विचार सरणीची ऐतिहासिक प्रक्रिया –

भारतीय विचारप्रणालीच्या प्रदीर्घ विकासाच्या प्रक्रियेतून तात्विविक सुसंगती व सुडौल बांधणीचे तत्वज्ञान आकारास येऊ शकले नाही असे टीकाकाराचे मत आहे. अर्थात या मतामध्ये सत्यांश आहे. तात्विक सुसंगतीने परिपूर्ण विचारसरणी मांडण्यात आधुनिक भारतीय विचारवंताना फारसे यश मिळू शकले नाही. कारण आधुनिक भारतीय विचावंतानी त्या दृष्टीने फारसा जाणीवपूर्वक प्रयत्नही केलेला नाही. विशेषत: अर्वाचिन काळातील भारतीय विचारवंताना तत्कालिन परिस्थिती व घटना यावर आपले विचार व्यक्त केले त्यातून आधुनिक भारतीय विचार प्रणाली प्रस्थापित झाली. म्हणून आधुनिक भारतीय राज्य विचाराचा अभ्यास प्रस्तुत विचाराच्या ऐतिहासिक विकासाच्या संदर्भात करणे आवश्यक व उपयुक्त ठरते. भारतीय समाजात घडलेल्या घटना, या समाजाच्या समस्या या समाजाची विशिष्ट परिस्थितीतील अवस्था लक्षात घेऊन भारतीय विचार प्रणालीचे विश्लेषण करणे योग्य ठरते. कारण राजाराम मोहन रॉय, स्वामी दयानंद ते विनोबा भावे, जयप्रकाश नारायण हयांची विचार सरणी समस्यानूगामी विविध घटनाशी सुसंवाद साधणारी आहे. विशिष्ट कालखंडातील घटनाशी व समस्याशी ही विचार सरणी संबंधीत आहे म्हणून भारतीय विचारवंताच्या विचारसणीचा अभ्यास ऐतिहासिक संदर्भाशिवाय करणे योग्य ठरत नाही. सर्व भारतीय विचारवंतानी विविधकालखंडात उद्भवणाऱ्या समस्यावर आपले विचार व्यक्त केले आहे. विशिष्ट परिस्थितीत घडणाऱ्या घटनावर त्यांनी आपली वैचारिक प्रतिक्रिया व्यक्त केली व त्यातूनच त्यांची विचार सरणी आकारास आली.

विचारसरणीतील संदिग्धता –

आधुनिक भारतीय विचारसरणीचे मूळ पाश्चिमात्य तत्वज्ञानात किंवा वैदोक तत्वज्ञानात आढळते. आधुनिक भारतीय विचारवंतानी विचाराची उसणवारी पाश्चिमात्य तत्वज्ञानातून केली. त्याचप्रणाणे भारतातील प्राचीन ग्रंथातून विचार घेऊन त्यातून नवा आशय स्पष्ट करण्याचा प्रयत्न कांही भारतीय विचारवंतानी केला असल्याचे दिसून येते. म्हणूनच भारतीय विचारवंतावर पाश्चिमात्य विचारवंताचा व प्राचीन काळातील भारतीय विचारवंताचा कसा व किती प्रभाव पडला आहे याचे विश्लेषण करणे आवश्यक ठरते. प्रमुख विचारवंताच्या विचाराचे मूल्यमापन करताना एकाच वेळी विचारवंताच्या काळाची ऐतिहासिक पार्श्वभूमी तत्कालिन घडामोडी व त्यांच्या विचाराची तात्विक बैठक याचा तुलनात्मक, चिकित्सक व विश्लेषणात्मक अभ्यास करणे उपयुक्त ठरते. भारतातील राजकीय जागृती मागील राजकीय तत्वज्ञान व सामाजिक जाणीव मागील सामाजिक विचारसरणी लक्षात घेतल्या शिवाय आधुनिक भारतातील विचार प्रवाहाची दिशा समजू शकणार नाही. त्यासाठी राजकीय व सामाजिक आंदोलनाची वैचारिक बैठक समजून घेणे उपयुक्त ठरेल. अर्थात भारतातील सामाजिक व राजकीय सुधारणेच्या चळवळीचा तात्विक दृष्टीकोणातून विष्लेषण करणे एकागी व काही वेळा दिशाभूल करणारे ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. केवळ पोथीनिष्ठ ध्येयवादी विचार प्रणालीची झापड लावून विविध विचार प्रवाहाचे स्पष्टीकरण करणे योग्य नाही. राजकीय व सामाजिक क्षेत्रातील घडामोडी व विविध विचारप्रवाह याचा कार्य कारण संबंधाची मीमांसा व्यवहार्य दृष्टिकोणातून करणे आवश्यक आहे. कारण आधुनिक काळातील भारतीय विचारवंत तात्कालिक घटना व समकालीन समस्या त्यानी प्रभावित व प्रेरित झाले. त्यावर त्यांनी भाष्य केले. काही भारतीय विचारवंतानी आपले विचार व दृष्टिकोण विविध प्रश्नावर वेळोवेळी बदलली आहेत. म्हणूनच त्यांच्या विचारसरणीत निश्चीतता व सुसंगती राहिलेली नाही.

विचारप्रणालीचे आध्यात्मिक अधिष्ठान –

अर्वाचिन भारतीय प्रबोधनातील विचारप्रणालीला आध्यात्मिक

अधिष्ठान देण्याचे कार्य रामकृष्ण परमहंस, राजाराम मोहनरॉय, महर्षि दयानंद सरस्वती, अरविंद घोष, विवेकानंद, महात्मा गांधी व विनोबा भावे यांनी केले. भारतीय विचारप्रणालीतील आध्यात्मिक परंपरेचा वारसा टिकवून सामाजिक व राजकीय विचारसरणी मांडण्याचे कार्य त्यांनी केले. मानवाच्या अंतिम कल्याणाचा व सत्याचा विचार करताना आध्यात्मिक मूल्ये त्यांनी व्यापक अर्थाने स्वीकारली आहेत. भारतीय प्रबोधनातील धर्म भावनेत ' सर्वं खलु इंद्र ब्रम्ह ' या वेदातील तत्वातून विश्व धर्माचा आशय व्यक्त केला.

ब्रह्माची उपासना करणाऱ्या ब्राह्मो समाजाची व वेदांची उपासना करणाऱ्या आर्य समाजाची तात्विक बैठक मुळातच आध्यात्मवादी आहे. रामकृष्ण परमहंस व विवेकानंद यांची परंपरा पुढे चालविणारे अरविंद घोष प्रकृतीचे दैवीकरण करुन पृथ्वीवर ईश्वरी राज्य स्थापन झाले पाहिजे. या मताच्या आग्रहासाठी सामुहिक योग साधनेचा संदेश देतात तर, महात्मा गांधी राजकारणाचे शुद्धीकरण करून राम राज्य स्थापन करण्याचे ध्येय जनतेसमोर ठेवतात. कवी रविन्द्रनाथ टागोर व विनोबा भावे विश्व मानवाची संकल्पना मांडतात. दयानंद, टागोर व अरविंद घोष राष्ट्र धर्माकडून विश्व धर्माकडे वाटचाल करण्याचा संदेश देतात राष्ट्र धर्म हा विश्व धर्माकडे नेणारी एक अवस्था आहे हे स्पष्ट करताना राष्ट्रधर्म व विश्वधर्म यातील संबंध कार्यकारण भावाप्रमाणे आहेत. हेच मत आध्यात्मिक विचारसरणीतून राजकीय तत्वप्रणाली मांडणाऱ्या विचारवंतानी पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. विश्व मानवाला केन्द्रस्थानी मानून विश्व कल्याणाचे चिंतन करण्याची परंपरा भारतीय आध्यात्मवादाचे वैशिष्टच स्पष्ट करणारी आहे.

वैदिक तत्वज्ञानाचा प्रभाव –

भारतातील सामाजिक, आर्थिक व राजकीय विचाराचा प्रारंभ वेदकालापासून झाला. हे वेद प्राचीन काळातील ग्रंथ म्हणून ओळखले जातात. या वेद काळातच वैदिक तत्वज्ञानाने आकार घेतला. समाज, राज्य व शासन, धर्म या संबंधीचे व्यक्तीचे जीवन हा वैदिक तत्वज्ञानाचा विषय असल्यामुळेच भारतीय विचारप्रणालीत धर्मनिरपेक्ष राजकीय विचारसरणीचा उगम प्राचीन काळात होऊ शकला नाही.

राज्य, शासन व समाज यात वैदिक तत्ववेत्यानी भेद मानला नाही म्हणूनच व्यक्तीविरूद्ध समाज, समाजविरुद्ध राज्य, राज्यविरुद्ध व्यक्ती हे द्वैत भारतीय विचारप्रणालीत आढळत नाही. शासन समाज जीवनाचे अंग मानले गेले व समाज जीवनाचे व्यक्ती जीवन अंग समजले गेले. व्यक्ती जीवनाच्या सर्व पैलूचा साकल्याने विचार करण्याच्या प्रवृतीतून वैदिक काळात जीवनाच्या तत्वज्ञान उदयास आले हे तत्वज्ञान सामाजिक आर्थिक, धार्मिक नैतिक व राजकीय जीवनाला स्पर्श करणारे होते हा तत्वज्ञानाने सर्व ममावेशक रूप धारण केले हया तत्वज्ञानाचा आशय चार वेदातून व्यक्त झाला आहे स्वामी दयानंदानी हा सर्वव्यापी तत्वज्ञानावर मौलिक भाष्य लिहिले व मानवी जीवनाच्या सर्व समस्या-वर उपाय म्हणून वैदिक ज्ञान भांडार उपयुक्त ठरेल असा विश्वास व्यक्त केला. दयानंदानी मानवी जीवनातील सर्व क्षेत्राच्या समस्याचा एकत्रित विचार केला हा समस्या सोडविण्यास वेदाचे संपूर्ण ज्ञान कसे उपयुक्त ठरेल याची कारण भीमांसा केली.

वैदिक तत्वप्रणालीचे पुनरुज्जीवन –

भारताच्या राष्ट्रीय आदोलनाला आणि स्वातंत्र्य चळवळीला तात्विक अधिष्ठान प्राप्त करुन देणाऱ्या विचारवंतापैकी काही जण पाश्चिमात्य राजकीय तत्वज्ञानाचे पुरस्कर्ते होते. रानडे गोपाळकृष्ण गोखले, पंडित नेहरु डॉ. आंबेडकर गांधी एम. एन. राय आदि विचा-रवंत राजनितीज्ञाच्या नांवाच्या येथे उल्लेख करता येईल. या उलट राष्ट्रीय आंदोलनाला भारतीय संस्कृतीच्या आस्मितेचे अधिष्ठान देणाऱ्या विचारवंतानी वैदिक तत्वज्ञानाचा आधार घेतला व स्वातंत्र्य चळवळीत सास्कृतीक राष्ट्रवादाचा नवा आशय ओतला. स्वामी दयानंद, लोकमान्य टिळक, अरविंद घोष हयांनी भारतीय पुनरूज्जीवनवादाच्या प्रेरणेने भारतीयाचा राष्ट्रीय अभिमान जागरूक ठेवला. स्वदेशी चळवळ स्वदेशाचा संदेश हे त्याच्या कार्याची प्रमुख उद्दिष्टचे बनली. या विचारवंतानी तत्कालीन समस्या सोडविण्यासाठी प्राचीन ग्रंथातील ज्ञानाचे मार्गदर्शन उपयुक्त ठरते हें निदर्शनास आणून दिले. विविध राजकीय व सामाजिक सुधारणा लोकांच्या गळी उतरविण्यासाठी पुनरुज्जीवनवादी विचारवंताच्या गटाने प्राचीन ज्ञान भांडाराचा ठेवा

नव्याने भारतीय जनतेसमोर ठेवला. स्वामी दयानंद सरस्वतीचें वेदावरील भाष्य याच कार्याचा शुभारंभ होता असें म्हणता येईल. वैदिक राष्ट्रवादाचा संदर्भ राष्ट्रीय चळवळीच्या प्रेरणेला पोषक व सहाय्यक ठरला हे आर्य समाजाच्या राष्ट्रीय चळवळीतील योगदानाने स्पष्ट झाले आहे. आधुनिक भारतीय विचार प्रणालीचा अभ्यास करताना या विचार प्रणालीशी संबंधीत असलेल्या तत्वज्ञानाचा एकत्रित अभ्यास करणे उपयुक्त ठरते.

महर्षि दयानंदाची दृष्टी समतोल विधायक, चिकित्सक वारसा जपणारी होती. वैदिक संस्कृतीच्या भव्य वारशाविषयी चिकित्सायुक्त आदरभाव बाळगणारे व जगात जे नव्याने अस्तित्वात आले त्याचे महत्व ओळखून त्याचा स्वीकार करण्याची वृत्ती असणारे महर्षि दयानंद भूतकालाविषयी अंध गौरवाची अथवा मिटया अहंतेची भूमिका घेत नाही. भूतकाळातील उणीवा व दोष यावर त्यानी प्रकाश टाकला. त्याच बरोबर भूतकाळातील वैदिक जीवन पद्धतीतील मर्गदर्शक तत्वाचे महत्व त्यानी नव्याने स्पष्ट केले. स्वसंस्कृतीचा वारसा गमावून बसलेल्या व वर्तमान काळात दिशाहिन वनलेल्या समाजाला स्वत्वाची जाणीव पुन्हा करून द्यावी म्हणून त्यांनी वेदाच्या प्रचाराचे व प्रसाराचे कार्य हाती घेतले.

परंपरावाद –

कोणत्याही सुधारणावादी चळवळीचा विचार परंपरावादापासूनच सूरू होतो. जून्या परंपरा बदलून नव्या परंपरा प्रस्थापित करणे तसेच जूने विचार टाकून देऊन नवे विचार स्वीकारणे सुधारणावादी चळवळीचे कार्य होय. म्हणूनच भारतीय परंपरेच्या अभ्यासाशिवाय भारतीय सुधारणावादाची दिशा समजू शकत नाही. भारतातील समाज सुधारकांनी व राजकीय सुधारकांनी जुन्या परंपराच्या दोषावर प्रकाश टाकला व त्यात बदल घडवून आणणे आवश्यक का झाले आहे याची कारण मीमांसा केली. महर्षि दयानंदापासून ते विनोबा भावे पर्यंत सर्व सुधारकांनी भारतीय परंपरेतील बऱ्यावाईट गोष्टींची चिकित्सा केली आहे. सामाजिक बदल ही जर उत्क्रांतित्मक प्रक्रिया असेल तर नव्या जून्या परंपराचा साधा जोडतच सुधारणेच्या ध्येया

कडे वाटचाल करणे योग्य ठरते. जुन्या परंपरा व जुन्या संस्था यामध्ये सुधारणा करतांना चांगल्या परंपराचे सातत्य टिकवून त्यात बदल करावा लागतो. जुन्या नव्या ग्रंथाची देवाण घेवाण करावी लागते. भारतातील सुधारकानी पौर्वात्य परंपरामधील आदर्शवाद स्वीकारला व पाश्चिमात्य देशातील नव्या परंपरा येथे रुजविण्यास प्रारंभ केला. भारतातील लोकशाही परंपरा उदारमतवादी परंपरा पाश्चिमात्य देशातून भारतात आणली गेली. जुनी कृषिप्रधान व परंपरागत अर्थव्यवस्थेत औद्योगिक अर्थव्यवस्थेचा आशय ओतण्यात आला व आर्थिक क्षेत्रात स्पर्धा व सहकार्यावर आधारलेली तंत्रज्ञ प्रधान व औद्योगिक आर्थिक परंपरा येथे रूजविण्यात आली. दादाभाई नौरोजी, रानडे, जवाहरलाल नेहरू, मानवेन्द्रनाथरॉय आदि प्रभृती नव्या आर्थिक परंपराचा व नव्या आर्थिक विचाराचा पुरस्कार करीत होत्या तर महात्मा गांधी ग्रामीण अर्थव्यवस्थेतील जून्या परंपराचा सांधा कल्याणकारी अर्थव्यवस्थेच्या नव्या प्रथेशी जोडण्याचा प्रयत्न करीत होते. साराश आधुनिकवाद हा परंपरेला तोडणारा नसतो तर सुधारणारा असतो हे भारतीय उदाहरणावरून प्रत्ययास येते

ब्रिटिशांचा प्रभाव –

ब्रिटिश राजवटीला ईश्वरी वरदान मानणारे व ब्रिटिशाच्या सानिध्याचे व प्रभावाचे फायदे मान्य करणारे आधुनिक भारतातील विचारवंत ऐतिहासिक दृष्टिकोनातून ब्रिटिश राजवटीने प्रस्थापित केलेल्या मजबूत मध्यवर्ती सत्तेचे महत्व राष्ट्रीय एकीकरणाच्या दृष्टिकोनातून मान्य करतात त्याचप्रमाणे जातीव्यवस्थेमुळे सामाजिकदृष्ट्या विभागलेला व सामर्थ्यवान मध्यवर्ती राष्ट्रीय शासन नसल्यामुळे राजकीयदृष्ट्या अराजकतेच्या संघर्षात गुंतलेल्या भारतीय समाजात ब्रिटिशांनी कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित केली. तसेच ब्रिटिश शासनाने येथे नियमावर आधारलेले प्रशासन व सुस्पष्ट कायद्यावर आधारलेली न्यायदान पद्धती प्रस्थापित केली व चांगल्या शासनाचा निकष भारतीयाना दाखवून दिला याचे आकर्षण भारतीय विचारवंताना अधिक वाटले ब्रिटिश राजवटीच्या प्रभावामुळे पाश्चात्य देशातून नव्या विचाराचा प्रवाह भारतात आला व विचारसरणीच्या सामर्थ्यावर

मध्यवर्गीय समाजाने सामाजिक व राजकीय जागृती करण्याचा प्रयत्न केला व सरतेशेवटी ब्रिटिश राजवट विविध प्रकारच्या धार्मिक, सामाजिक व राजकीय सुधारणा घडवून आणण्यात साहाय्यक ठरू लागली. म्हणूनच राजाराम मोहनरॉय, दादाभाई नौरोजी, मेहता, गोखले, रानडे सारख्या प्रभूतीनी ब्रिटिश राजवटीची उपयुक्तता स्पष्ट केली. राष्ट्रवादी चळवळीतील ही मवाळ प्रवृत्ती सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात उपयुक्त व प्रभावी ठरली.

उदारमतवाद –

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आर्य समाजाने व ब्राह्मोसमाजाने धर्मसुधारणा व सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी जनजागृती व जन संघटन करण्याचा प्रयत्न केला व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात राजकीय सुधारणेला महत्व प्राप्त झाले. शासकीय पातळीवर 'संविधानवाद' व राजकीय क्षेत्रात 'उदारमतवाद' मूळ धरू लागला. संविधानिक शासनाकडून लोकशाही शासनाकडे टप्याटप्याने वाटचाल सुरु झाली. राजकीय क्षेत्रात मतदान हक्क, शासनातील जनतेची भागीदारी, प्रतिनिधीक शासन, संघ शासनावर वृत्तपत्राचे स्वातंत्र्य, नागरी स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्य, सामाजिक व आर्थिक समता आदि तत्वाचा पुनरुच्चार व्यासपिठावरून होऊ लागला. महात्मा गांधीनी या उदारमतवादाचा आशय पुढीलप्रमाणे व्यक्त केला आहे ते म्हणतात 'मी असा भारत निर्माण करण्याचा प्रयत्न करीन की गरिबातल्या गरिबाला तो आपला देश आहे असे वाटेल व तो निर्माण करण्यात त्याच्या मताला किंमत असेल, ज्या भारतात लोकांमध्ये उच्च व नीच हे भेद नसतील, त्या भारतात सर्व जमाती गुण्यागोविंदाने एकत्र नांदतील . . . . . अशा भारतात अस्पृश्यतेचा शाप अस्तित्वात नसेल . . . स्त्रियांना पुरूषासारखे अधिकार असतील . . . माझे भारताविषयीचे स्वप्न असे आहे !"

मवाळ पंथातील उदारमतवादी विचारवंतानी विशेषत: फिरोजशहा मेहता, दादाभाई नौरोजी, गोखले, न्यायमूर्ती रानडे आदि सुधारकानी ब्रिटिशाकडे संविधानिक सुधारणेसाठी १) मागण्या पुढे मांडल्या. २) ब्रिटिश शासनाच्या जूलमी कारभाराविरुद्ध सौम्य शब्दात

निषेध केला. ३) ब्रिटिशाकडून घटनात्मक सुधारणा करुन घेण्यासाठी विनंती अर्ज केले अशा प्रकारे मवाळ पंथातील सुधारकांनी मागण्याचे, निषेधाचे आणि अर्ज विनत्याचे राजकारण केले.

अशा तऱ्हेने त्यांनी ब्रिटिशाकडून मूलभूत हक्कावर आधारलेल्या संविधानिक शासनाचे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न केला. त्यात त्यांना काही अंशी यश आले. १९०९ सालची मार्ले मिटो सुधारणा १९१९ ची द्विदल शासन पद्धती व १९३५ चा कायदा ही संविधानिक चळवळीची पुलश्रुती होय.

विवेकवाद –

आधुनिक भारतीय तत्वज्ञानात निर्मळ बुद्धिवादाला स्थान देण्यात आले. निर्भेळ बुद्धिवाद आणि स्वातंत्र्य या दोन्ही तत्वाना प्राधान्य देणारा उदारमतवादामध्ये प्रागतिक व परंपरावादी विचार-प्रणालीचा समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न भारतीय विचारवंतानी केला. राजाराम मोहनरॉय, स्वामी दयानंद अरविंद घोष, लोकमान्य टिळक, रानडे, महात्मा गांधी, विनोबा भावे ह्यानी मांडलेल्या तत्वप्रणालीत भारतीय परंपरावादाशी सुसंवाद साधारण उदारमतवाद व विवेकवाद व्यक्त झाला आहे. या उलट ना. गोखले, आगरकर लोकहितवादी, पंडित नेहरू डॉ. अंबेडकर ह्यांच्या तत्वप्रणालीत पुरोगामी विचार सरणीशी जुळणारा पाश्चिमात्य उदारमतवाद साकार झाला आहे. बुद्धिप्रमाण्यवादी विचारवंतानी सत्याची कास धरली म्हणून आगरकर म्हणतात. " विपरीत मताबद्दल प्रथम तुमचा छळ होईल " पण तुमच्या मतात सत्य असेल व लोककल्याणाची तळमळ असेल तर अंति तुमचा विजय होईल " आपल्या विवेक बुद्धिवर विश्वास ठेऊन इष्टानिष्ट विवेकाकडे वळा असा संदेश स्वामी दयानंद सरस्वती ह्यांनी दिला. अर्थात लोकमान्य टिळकांनी बुद्धिवादाबरोबर मानवी श्रद्धा व लोकपरंपराची शक्ती लक्षात घेतली म्हणून लोकमान्य टिळक म्हणतात, ' धर्मदृष्टचा आगरकर केवळ बौद्धिकवादी होते आणि तोच पंथ सामाजिक बाबतीतही निदानपक्षी आपल्या लेखात त्यानी स्वीकारला होता.. सुधारणा नको असे ' केसरी ' चे म्हणणे केव्हाही नव्हते पण केवळ बौद्धिकदृष्टचा किंवा तर्कदृष्टचा सुधारणेचा विचार करण्यास 'केसरी'

तयार नव्हता ".

पाश्चिमात्य तत्वज्ञानाने भारावून गेलेल्या सुधारकांनी स्पेन्सर, मिल आदि पाश्चात्य विचारवंताच्या विचाराची उसनवारी केली व या उसन्या विचाराच्या आधारे भारतीय संस्कृती व परंपरा यावर टीका केली. प्राचीन भारतीय वाङमयात त्याना उदारमतवादी, बुद्धिवादाची व सत्यान्वषणाची प्रेरणा सापडली नाही, ही दुर्देवाची गोष्ट आहे. स्वामी दयानंदानी वैदिक तत्वज्ञानातील ज्ञान भांडारातूनच बुद्धिवादावर आधारलेली सत्यान्वेषणाची प्रेरणा जनतेला नव्याने समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, ' स्वधर्म चिकित्सा ' हे त्याच्या चिकित्सक बुद्धिवादाचे सुत्र होते.

बद्धिवादी व धार्मिक प्रेरणा –

भारतीय प्रबोधन काळात होऊन गेलेल्या विचारवंतानी प्राचीन विचारप्रणालीतील विवेकनिष्ठ श्रद्धाचा पाश्चिमात्य विचारप्रणालीतील शास्त्रीय विवेकबुद्धिशी असलेल्या साम्याचा निर्देश केला. उदाहरणार्थ, हिंदु पुनरूज्जीवनवादी पंथातील विचारवंतानी पाश्चिमात्य विचारसरणील आधुनिक मूल्ये, तत्वे व बुद्धिवाद प्राचीन वाङमयात कशा स्वरूपात व्यक्त झाली आहेत हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. वेदामध्ये सर्व ज्ञानाचा बीज रुपाने समावेश झाला आहे. सत्यान्वषणाच्या प्रेरणा व शास्त्रीय तर्कवाद हया गोष्टी भारतीय तत्वज्ञानाला नवीन नाहीत असे मत मांडणाऱ्या पुनरूज्जीवनवादी पंथातील विचारवंतानी प्राचीन व्यवस्थेतील श्रद्धा व आधुनिक युगातील विवेकबुद्धिवाद परस्परापासून भिन्न नाही तर परस्पराना पुरक आहे असे मत प्रतिपादन केले धर्म शास्त्रातील श्रद्धा भौतिक शास्त्रातील बुद्धि ज्ञानसाधनाची दोन मार्ग असून त्यामुळे अनुक्रमे आध्यात्मिक व भौतिक प्रगती साधता येईल ही पाश्चिमात्य जगातील मध्ययुगीन विचारप्रणाली धर्म सुधारक व धार्मिक विचारवंत मांडीत होते. धार्मिक मनोवृत्तीचे प्राबल्य असलेल्या समाजात धार्मिक श्रद्धाचा आधार घेऊन बुद्धिवादावर आधारलेल्या सुधारणावाद जनतेच्या गळी उतरावा लागते हे आधुनिक भारतातील सुधारक विचारवंतानी ओळखले होते. राजाराममोहनरॉय, महर्षि दयानंद लो. टिळक, अरविंद, महात्मा गांधी त्याच प्रमाणे सर सैद महमंद इकबाल, मौलाना

आझाद आदि मुस्लिम विचारवंतानी सनातनी धर्माचे आधुनिकीकरण करून समाज सुधारणेसाठी धर्माधि जनतेची मनोभूमिका निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जून्या–नव्याचा सांधा जोडून सुधारणेच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्राचीन व आधुनिक विचारप्रणालीचा समन्वय साधणे आवश्यक आहे असे प्रबोधन काळातील विचारवंताच्या विचारसरणीवरुन स्पष्ट होते. म्हणूनच प्राचीन काळातील धर्माधिष्ठित विचारप्रणालीचा त्याग करुन निखळ धर्मनिरपेक्ष अथवा निधर्मी विचारप्रणाली प्रबोधन काळात विकसित होऊ शकली नाही. धर्म श्रद्धाचा अव्हेर करुन केवळ शास्त्रीय विवेकबुद्धीचा स्वीकार करणे बहुसंख्य भारतीय विचारवंताना जमले नाही. त्याला अपवाद फक्त पंडित नेहरु व मानवेन्द्रनाथरॉय ह्याचा सांगता येईल. त्यांनी धर्मसापेक्ष विचारप्रणालीचा त्याग करुन पूर्णपणे भौतिक दृष्टिकोनातून निधर्मी विचारप्रणालीचा पुरस्कार केला.

राजकारणातील धर्माचे स्थान कोणते? राजकारणात धर्माचा वापर साधन म्हणून करणे योग्य की अयोग्य? या प्रश्नाचा मुस्लिम व हिंदु राष्ट्रवाद्यांनी फारसा खोलात जाऊन विचार केला नाही. तत्कालिक धार्मिक भावनाचा राजकीय उद्दिष्टासाठी वापर करण्यातील धोके त्यांनी ओळखले नाही म्हणूनच धार्मिक व राजकीय विचारसरणीत मध्ययुगीन प्रवृत्ती प्रभावी ठरल्या. परिणामत: विशुद्ध धर्माची व विधायक राजकारणाची हानी झाली.

जुन्या–नव्याचा संगम –

आधुनिक भारतीय विचारवंतापुढे एक समस्या होती. ती म्हणजे जुन्या विचाराचा स्वीकार करावयाचा की नव–विचाराचा स्वीकार करावयाचा. या समस्यावर निश्चित भूमिका घेण्यात अपयशी ठरलेले विचारवंत द्विधा मन:स्थितीत सापडले. उदाहरणार्थ राजाराम मोहनरॉय, महात्मा गांधी, लाला लजपतरॉय, टिळक, सावरकर ह्यानी विविध सामाजिक व राजकीय प्रश्नावर संदिग्ध अशी वैचारिक भूमिका घेतली. काही भारतीय विचारवंतानी पौर्वस्त्य व पाश्चात्य विचारसरणीचा समन्वय घडवून आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. उदा. अरविंद घोष, रानडे, रविन्द्रनाथ टागोर, विवेकानंद ह्यानी भारतीय

तत्वज्ञानावर श्रद्धा ठेऊनही पाश्चिमात्य तत्वज्ञानातील उदारमतवादी विचाराचा वारसा स्वीकारला या उलट ना. गोखले, पंडित जवाहरलाल नेहरु, मानवेन्द्रनाथ रॉय व डॉ. आंबेडकरानी नव्या विचाराचा बुद्धिनिष्ठ-भूमिकेतून स्वीकार केला व या विचाराचा प्रसार व प्रचार केला. स्वामी दयानंदानी मात्र वैदिक तत्वज्ञानावर श्रद्धा ठेवली. त्याच्या वैचारिक बैठकीचे अधिष्ठान वेद हेच होते. निरनिराळ्या प्रश्नावर त्यांनी निर-निराळ्या भूमिका घेतल्या. कालप्रसंगानुरुप दृष्टिकोन बदलले परंतु त्यांनी आपली वैदिक तत्वज्ञानाशी संबंधीत वैचारिक बैठक कधिच बदलली नाही. स्वामी दयानंदाचा अपवाद वगळता भारतीय विचार-वंताच्या विचारात अंतविरोध जाणवतो. काही विचारवंताची विचार-सरणी आधुनिकता व कर्मठपणा या दोन टोकामध्ये लंबकाप्रमाणे झुलत राहते. महात्मा गांधीच्या विचारसरणीचा या संदर्भात उल्लेख करणे योग्य ठरेल. पारंपारिक तत्वज्ञानाचे जोखड मानेत अडकवून घेतल्यामुळे पाश्चिमात्य धर्तीचा निधर्मीवाद, उदारमतवादी सुधारणा-वादी यांचा श्रद्धाविहिन अशा बुद्धिवादाच्या आधारे त्यांनी स्वीकार करणे कठीण गेले. भारतीय परंपरेशी असलेले नाते तोडून नव्या पाश्चि-मात्य विचारप्रणालीशी समरस होणे अनेक भारतीय विचारवंताना जमले नाही. नव्या जून्याचा समन्वय साधण्याची तारेवरची बौद्धिक कसरत करण्याशिवाय दूसरा असा पर्यायच काही भारतीय विचारवंता-समोर नव्हता.

दिशाभूल करणारे वर्गीकरण –

आधुनिक भारतीय विचारवंताची १) भारतीय पुनरूज्जीवन-वादी व पाश्चिमात्य उदारमतवादी तसेच जहाल मतवादी व मवाळम-तवादी अशी गटवार विभागणी करण्यात येते. अशा प्रकारे वर्गीकरण दिशाभूल करणारे तसेच सभ्रमात टाकणारे ठरते. वस्तुतः भारतीय पुनरुज्जीवनवादी व पाश्चिमात्य उदारमतवादी विचार प्रवाह व जहाल-मतवादी व मवाळमतवादी विचार प्रवाह याचा संबंध जोडता आला तरी प्रत्येक पुनरूज्जीवनवादी विचारवंत जहाल संप्रदायातील होता किंवा मवाळपंथातील विचारवंत केवळ पाश्चिमात्य उदारमतवादाचा पुरस्कार करीत होता असा निष्कर्ष काढणे चूकीचे ठरेल. उदाहरणार्थ,

राजाराम मोहनरॉय, रविन्द्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद ह्याच्या विचार प्रणालीत पाश्चिमात्य व पौर्वात्य तत्वप्रणालीचा समन्वय साधला गेला आहे. तर स्वामी दयानंदानी वैदिक तत्वज्ञानाचा पुरस्कार केला व त्यातील नवा आशय उलगडून दाखविला. दादाभाई नौरोजी प्रथम मवाळ पंथीय म्हणून ओळखले जात नंतर त्यांनी ब्रिटिश राजवटीवर टिका केली. व जहाल पंथीयांना प्रीय असलेले 'स्वराज्य' हे ध्येय घोषीत केले एकेकाळी दादाभाई नौरोजी जहाल व मवाळ पंथाच्या सिमेरेषेवर होतें. न्या. रानडे, गोपाळ गणेश गोखले मवाळ पंथिय व पाश्चिमात्य विचार प्रणालीने प्रभावित झाले होते. या उलट लोकमान्य टिळक, व बिपीन चंद्र पॉल, लाला लजपतरॉय जहाल पंथीय व भारतीय पुनरूज्जीवनवादाकडे झुकणारे होते. अरविंद घोष ह्याचाही समावेश जहाल पंथात करता येईल परंतु विवेकानंदाप्रमाणे त्यानीही भारतातील अध्यात्मिक परंपरेचा वारसा पुढे चालविला स्वामी दयानंद, विवेकांनंद व योगी अरविंद भारतीय पुनरुज्जीवनवादी व अध्यात्मिक जीवनाचे नेते ठरले. त्यांची राजकीय विचारप्रणाली कमी अधिक प्रमाणात प्रभावी ठरली. योगी अरविंदानी जहाल राजकारणात सक्रीय भाग घेतला तसा भाग स्वामी दयानंदानी व विवेकानंदानी घेतला नाही. धर्म सुधारक व समाज सुधारणा हेच या सन्ताचे कार्य होते.

परस्पर विरोधी विचारप्रवाह –

भारतीय विचार प्रणालीत परस्पर विरोधी विचारांचा समावेश झाल्याचे दिसून येतो. राजा राममोहनरॉय पासून विनोबा भावे पर्यंतचा भारतीय विचाराचा इतिहास लक्षात घेतल्यानंतर या परस्पर विरोधी विचारसरणीचा प्रत्यय येतो. जहाल विरुद्ध मवाळ, सनातनी विरूद्ध सुधारक भूतकालाचे पूजक विरूद्ध आधुनिक काळाचे समर्थक धर्मवादी विरुद्ध इहवादी अशा विचारवंतानी भारतीय विचारसरणी समृद्ध केली आहे. अर्थात भारतीय विचारवंताची गटवार वर्गीकरण करता येणार नाही. जहाल व मवाळ विचारवंतामध्ये देखील विचारवंत सामाजिक व राजकीय क्षेत्रात अनुक्रमे जहाल व मवाळ भूमिका घेतात काही विचारवंत समाज सुधारणेच्या बाबतीत पुरोगामी आहेत तर राजकीय सुधारणेच्या क्षेत्रात प्रतिगामी ठरले आहेत. तर काही विचारवंत समाज

सुधारणेच्या क्षेत्रात प्रतिगामी आहेत तर राजकीय सुधारणेच्या क्षेत्रात पुरोगामी दृष्टीचे आहेत. काही विचारवंत कट्टर इहवादी आहेत तर काही धर्मवादी आहे. काही विचारवंताच्या विचारसरणीत धार्मिक व इहवादी विचाराचे मिश्रण झाल्याचे दिसून येतें. काही विचारवंत परंपरावादी होते. परंतु जुन्या परंपरामध्ये नव्या संदर्भात नव्या अर्थाचा संदर्भ देण्याचा त्याचा प्रयत्न होता. काही विचारवंत परंपरावादाचा अव्हेर करून आधुनिकवादाचे समर्थन करा असा संदेश देत होते.

सुधारकांच्या कर्तृत्वावरील मर्यादा –

समाजाची आर्थिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक अंगोपागाची जडण घडण करणाऱ्या ऐतिहासिक घडामोडी व त्या घडामोडीचा ओघ विशिष्ट दिशेने वाहण्यास हातभार लावणारे सुधारणावादी नेते, उपलब्ध संधी, आपली गुणसंपदा व शक्ती यांच्या बळावर इतिहास घडवितात तर प्रसंगी इतिहासातील घडामोडी मागील शक्ती इतक्या प्रभावी ठरतात की कोणताही प्रतिभासंपन्न व सामर्थ्यवान नेता त्यावर नियंत्रण ठेवून त्या शक्तीना आपल्या काबूत ठेवू शकत नाही. सरतेशेवटी विधिलिखित अथवा दैववाद यावर हवाला ठेऊन इतिहासातील घडामोडीचे समर्थन करणारा युक्तिवाद केला जातो.

भारतातील प्रबोधन काळात समाजाची नव्यानें घडी बसविण्याचा व समाजात मूलगामी बदल घडवून आणण्याचा प्रयत्न राजाराम मोहनरॉय, महर्षि दयानंद सरस्वतीपासून तें थेट महात्मा गांधी व विनोबा भावेपर्यंत सर्व तत्वचिंतक–सुधारकानी केला. या तत्वचिंतकाची दुर्दम्य इच्छाशक्ती, गुणसंपदा व सामर्थ्य ह्यामुळे इतिहासातील घडामोडीना कलाटणी मिळाली. घडामोडीचा ओघ विशिष्ट दिशेने वाहू लागला. परंतु या काही घटना या नेत्याच्या नियंत्रणाबाहेर गेल्याचे काही उदाहरणे दाखवून देता येईल. अंधश्रद्ध भारतीय समाज, जातीयवादी प्रवृत्ती व परंपरावादी दृष्टिकोण यामुळे आपत्तीत सापडलेल्या भारतीय समाजाला संपूर्णपणे बाहेर काढणे तत्कालीन समाज सुधारकाना पूर्णपणे जमले नाही एकोणिसाव्या शतकातील समस्यानी ग्रासलेला हा समाज पुर्णपणे सुधारलेला नाही. समाजाची घडी नव्याने बसविण्याचे क्रांतीकारी कार्य समाजातील एका सुधारकाच्या पिढीमध्ये पूर्ण होऊ

शकले नाही. प्रतिगामी शक्ती, फुटीर प्रवृत्ती व अंधश्रद्धाळू वृत्ती यांना प्रतिकार करीत नवा समाज घडविण्याचें स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न भारतातील सुधारकांनी केला. परंतु त्याच्या शक्तीच्या नियंत्रण बाहेर असलेल्या काही अनिष्ठ व अपरिहार्य शक्तीप्रवाह सरतेशेवटी समाजाचे ' प्रस्थापित रुप ' घडवित गेले. जातीय वादावर आधारलेला ' मुस्लिम विभक्तवाद ' विभाजनास कारणीभूत ठरला. या विभक्तवादी शक्तीचे नियंत्रण करणे तत्कालीन राजकीय .सुधारकाना जमले नाही. हिंदु समाजाच्या ऐक्याला सुसंगत लावणारा जातीयवाद संपुर्णपणे नष्ट होऊ शकला नाही. संप्रदायवादाच्या शक्तींचा प्रभाव कमी झाला असला तरी या संप्रदायवादी शक्ती नष्ट झाल्या नाहीत. सारांश इतिहास घडविणारे महापुरुष प्रसंगी नियतीच्या हातातील बाहुले बनतात. नवा समाज घडविण्याचे स्वप्न उराशी बाळगणारे सुधारक प्रस्थापित विचारप्रणालीशी व शक्ती प्रवाहाशी जुळते घेऊन सामाजिक व राजकीय चळवळीत क्रांतीकारी भूमिकेपेक्षा तडजोडवादी भूमिका अपरिहार्य व व्यवहार्य म्हणून स्वीकारताना दिसून येतात.

REFBK-0023000

संग्रहालय शाखे
२८२०
२३००
शिवाजी
(स्थळ प्रत)

संदर्भ ग्रंथ

डॉ. गावडे, प्र. ल.	सावरकर एक चिकित्सक अभ्यास
गोळवलकर मा. स.	'विचार धन' मराठीअनुवाद (बंच ऑफ थॉट)
जावडेकर आचार्य	आधुनिक भारत
तळवलकर गोविंद	नवरोजी ते नेहरू
पंडित नलिनी	महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास
फडके य. दि.	शोधबाळगोपाळाचा
भोळे लक्ष्मण भास्कर	आधुनिक भारतातील राजकीय विचार
फाटक न. र.	आदर्श भारत सेवक
डॉ. सिंह विजेन्द्रपाल	भारतीय राष्ट्रवाद एवं आर्यसमाज आंदोलन
दाते शंकर रामचंद्र	महाराष्ट्र हिंदुसभेच्या कार्याचा इतिहास

संदर्भ ग्रंथ

Appadorai, A	: Indian Political Thinking From Nauroji to Nehru. Documents on Political Thought in Modern India volume I. G. Appadorai.
Bamford, P. C.	: Histories of the Non – Co-operation and Khilafat Movement.
Baldev,	: India, Pakistan and Muslim Politics.
Dalwai, Hamid	: Muslim Politics in India.
Desai, A R.	: Social Background of Indian Nationalism.
Malhotra, S L.	: Social and Political Orientation of Neo–Vedantism.
Karunakaran, K. P.	: Religion and Political Awakening in India.
Savarkar, V. D.	: Hindutva.
Dr. Sarma, G. N. & Dr. Moin, Shakir	: Politics & Society (Ram-Mohan Roy to Nehru.)
Shakir, Moin	: Khilafat to Partition.
Home Dept, Govt. of India.	: Terrorism in India. (1917 – 1936)
Varma, V. P.	: Modern Indian Political Thought.